

शनिवार
११. सप्टेंबर १९७१
पन्नास पैसे

# माणूस

| | | | |
|---|---|---|---|
| माणूस | शनिवार | ११ सप्टेंबर १९७१ | पन्नास पैसे |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | पंधरा | पंचवीस रुपये | पंचेचाळीस रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे


## सप्रेम नमस्कार...

▫ आपल्या १५ ऑगस्ट अंकातील पाटीलवाडी, पाडळदे, शहादे हा लेख वाचला. अतिशय बोलका व आदिवासींवर होणाऱ्या भयंकर अन्यायाचे सत्यदर्शन देणारा असा आहे.

मी ज्या भागात व्यवसाय करतो तो पेठ भाग पूर्णपणे आदिवासी असा आहे. फक्त पावसाळी शेती येथे होते. ती पण जमीन अत्यंत खराब, चढउताराची अशी आहे. ह्या भागातील गरीब आदिवासी मंडळींची आर्थिक, सामाजिक परिस्थिती अत्यंत खालावलेली आहे. गेल्या दहा वर्षांत विकास योजनेच्या रूपाने जवळजवळ ४० लाख रुपये खर्च झाले. परंतु सर्व परिस्थिती जैसे थेच आहे. ह्या भागात स्वातंत्र्योत्तर २४ वर्षांत एकही बारमाही रस्ता झाला नाही. अन्नधान्याचा, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत बिकट होत आहे. ह्या भागाकडे मोठी समाजवादी मंडळी जाणून बुजूनच दुर्लक्ष करीत असावीत, असे राहून राहून वाटते. आदिवासींतील पुढाऱ्यांना वैयक्तिक स्वार्थापलीकडे काही दिसत नाही. गरीब ह्या अधिक गरीब करणे किंवा गरीब हटवणे हाच त्यांचा उद्देश आहे काय ?


खरंच ! सामाजिक विषमतेतूनच शेवटी क्रांती होते हेच खरे ! असल्या विषमतेतून नक्षलवाद उफाळणार नाही तर दुसरे काय होणार !

२३ ऑगस्ट, १९७१ — विजय बिडकर, पेठ (नाशिक)


साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.



# ग्रामायन

श्री. ग. माजगावकर

---

गणपत महादू चव्हाण. वय वर्षे अठ्ठावीस.

मुक्काम गंजाड. डहाणू तळासरी रस्त्यावरील एक गाव.

जव्हारच्या राजाने भूदानात दिलेल्या जमिनीचे दहाजणात वाटप झाले. त्यातील ७ एकर ८ गुंठे जमीन गणपतच्या वाट्यास आली.

लक्ष्मीचंद मारवाडी या सावकाराने गणपतच्या वडिलांना पाचशे रुपये कर्ज दिलेले होते.

गेली दहा वर्षे गणपत या भूदान जमिनीतून पिकवलेले धान्य पाचशे रुपये कर्ज-फेडीपोटी सावकाराकडें नेऊन देत आहे. या धान्याची अंदाजे वर्षाकाठी होणारी किंमत दोनशे ते तीनशे रुपये.

या जमिनीपैकी काही भाग गवत कापणी यंत्रासाठी व साठवणीसाठी एकाला भाड्याने दिलेला आहे. या जागेचे वार्षिक पन्नास रूपये भाडे परस्पर लक्ष्मीचंद याचेकडे जमा होत आहे.

पाचशे पेंड्यांची एक गंजी. अशा पंचवीस गंज्या गवत लक्ष्मीचंदला गणपत सालोसाल देत आहे.

गणपत आपली गाय घेऊन गेल्यावर्षी लक्ष्मीचंदकडे गेला. गाय घ्या आणि हिशोब मिटवून टाका असे त्याने लक्ष्मीचंदला सांगितले.

लक्ष्मीचंदने गाय घेतली. पण बाकी काढली रुपये तीनशे!

तीन ते चार हजार रुपये मालरूपाने किंवा रोख सावकाराकडे पोचते झाले. पण गणपतचे पाचशे रुपयांचे कर्ज आठ-दहा वर्षे उलटली तरी फिटलेले नाही.

गणपतला जमीन मिळाली. तो ती राखू शकला नाही. दहा वर्षापूर्वी तो जसा

आणि जिथे होता तसा आणि तिथेच आज तुकडे मोडीत जगतो आहे.

गणपत सारखाच तो राह्या वनशा कोल्हा.

वनशा वायेडा ! हाच नमुना.

आणि असे इतर अनेकजण.

लाल बावटयाचे हे एक वर्चस्वक्षेत्र आहे. गोदावरीबाई परुळेकरांचे कार्य चालू असलेला हा भाग आहे. वारली-आदीवासी-भूमिहीनांना जमिनी मिळवून देण्यासाठी आजही या भागात लहानमोठी आंदोलने सुरू आहेत.

या आंदोलनांमुळे आदिवासी-भूमिहीनांना जमिनीही मिळत आहेत.

प्रश्न आता पुढचा आहे –

एकदा मिळालेल्या जमिनी पिढयानुपिढया गुलामीची सवय असलेल्या या समाजाच्या हातात कायम कशा राहू शकतील ?

या समाजातील वैमनस्यांचा, हेव्यादाव्यांचा, अज्ञानाचा, गरिबीचा, व्यसनासक्तीचा फायदा उठवून त्याचेजवळील जमिनी बहुधा पुन्हा लुबाडल्या जातात. हे थांबले नाही तर भूदानाचा किंवा जमीन बळकाव आंदोलनाचा तरी उपयोग काय ?

प्रलोभनांना हा समाज चटकन् बळी पडतो. यावर उपाय काय ?

सातपुडा भागात तर असे जमिनींचे हस्तांतर सारखे चालूच आहे. भूदानामार्फत किंवा सरकारतर्फे आदिवासींना जमिनी मिळाल्या, पण आदिवासी त्या सांभाळू शकला नाही, सावकाराकडे त्या या नाही त्या मार्गाने परत गेल्या, हा प्रकार तिकडे फार. याला कसा आळा घालता येईल ?

शिवाय प्रश्न भांडवलीखर्चाचाही आहे. समजा जमिनी मिळाल्या. जंगलजमिनी, खडकाळ जमिनी लागवडीखाली आणणे हे फार खर्चाचे, दीर्घमुदतीच्या कष्टाचे काम असते. कालपर्यंत शेतमजूर असलेला आदिवासी हे ओझे पेलू शकत नाही. बँकेकडे पत नाही. अशा स्थितीत सावकाराचे पाय धरणे त्याला भाग पडते. सावकार थोडाच जमीन लिहून घेतल्याशिवाय व्यवहार करणार ? म्हणजे पुन्हा आदिवासी भूमिहीन तो भूमिहीनच.

सातपुड्यातील किंवा ठाणे जिल्ह्यातील भूमिहीन आदिवासींची चळवळ आज या खिंडीत अडकलेली आहे. जे भूमिहीन जमिनी राखू शकतात अशांसाठी विकास कर्जाची सोय पाहाणे, जे राखू शकत नाहीत अशांसाठी एखादा सहकारी पर्याय निवडणे, हे या खिंडीतून पुढे सरकण्याचे मार्ग आहेत. कुठला पर्याय कुठे लागू करायचा हे अर्थात स्थानिक परिस्थिती, कार्यकर्त्यांचे बळ यावर अवलंबून राहील. थोडीफार जागृती असलेल्या ठाणे जिल्ह्यातील वारली-आदिवासींना वैयक्तिक शेतीचा पर्याय अधिक आकर्षक वाटेल. अशा नवकिसानांसाठी विकासकर्जेलढे संघटित करण्याचे कार्य लवकरच हाती घ्यावे लागेल. पतपुरवठा संस्थांवर मोर्चे न्यावे लागतील. तर जागृतीचे प्रमाण कमी असलेल्या सातपुड्यातील भिल्ल–आदिवासीं-

पुढे एखादा सामुदायिक शेतीचा, सहकारी संघटनेचा पर्याय ठेवणं अधिक श्रेयस्कर ठरेल. पर्याय असा हवा की जमिनींचे हस्तांतर थांबेल, नव्या तंत्राचा वापर करणे भूमिहीनांना शक्य होईल.

ग्रामदान पर्यायाचाही विचार या संदर्भात पुन्हा व्हायला हरकत नाही. ओरिसातील कोरापुट जिल्ह्याचा व इतर ठिकाणचा अनुभव फार वाईट आहे हे गृहीत धरूनही असे म्हणता येईल, की या पर्यायात दडलेल्या नवनिर्माणाच्या शक्यता खूप आहेत. पर्यायी ग्रामसत्तांचे तळ या चळवळीतून उभे राहू शकतील, जर तिची मांडणी व हाताळणी व्यवस्थित झाली तर. यासाठी सरकारी कृपाछत्राचा मोह तिला प्रथम सोडावा लागेल. अध्यात्माचे फाजोल महत्त्व कमी करावे लागेल. विचारांचेही संपूर्ण आधुनिकीकरण घडवावे लागेल. ग्रामस्वराज्याची स्थापना हे औद्योगिक साम्राज्यशाही व समाजवादी नोकरशाही या दोन्हींविरुद्ध पुकारलेले एक मुक्तियुद्धच ठरले पाहिजे. ग्रामदानी गावांच्या तळांवरून हे मुक्तियुद्ध खेळले गेले पाहिजे. कुठल्याही मुक्तियुद्धासाठी जी किंमत मोजावी लागते ती सर्व मोजण्याची तयारी ठेवली पाहिजे. औद्योगिक संस्कृतीपुढे पराभूत ठरलेल्या जुन्या ग्रामव्यवस्थेच्या पुनरुज्जीवनाचा दुबळा प्रयत्न, हे आजच्या गांधी-विनोबाप्रणीत ग्रामस्वराज्य विचारांचे स्वरूप आहे. हे बदलले पाहिजे. औद्योगिक व समाजवादी संस्कृतीच्या यशापयशाचा संदर्भ या विचारांना जोडला पाहिजे. यंत्रयुगाला भिऊन पळायचेही नाही, त्याला डोक्यावर घेऊन नाचायचेही नाही. या युगावर स्वार व्हायचे आहे. असा आधुनिक आणि लढाऊ दृष्टिकोण असेल तरच नक्षलवादाला—माओवादाला ग्रामदान-ग्रामस्वराज्यवाद पर्याय ठरू शकेल. नाहीतर त्याचे मरण अटळ आहे. कोरापुटला जे घडले, बिहारमध्ये जे आज घडत आहे तेच ठाणे-सातपुडा भागात पुन्हा घडेल, इतकेच. भीती अपयशाची नाही, अपयशापासून योग्य तो बोध न घेण्याच्या प्रवृत्तीची आहे. असा बोध घेऊन पुढे जायचे असेल तर सातपुडा-ठाणे भागातील भूमिहीन आदिवासींचा प्रश्न हाताळत असता, इतर अनेक पर्यायांप्रमाणेच ग्रामदानाचा एक पर्यायही अवश्य डोळ्यांसमोर ठेवला जावा. हा सर्वोत्तम पर्याय आहे. पण याची किंमतही जबरदस्त आहे, हे मात्र विसरले जाऊ नये.

सर्वोदयी ही जबरदस्त किंमत मोजण्यासाठी पुढे येतील किंवा न येतील. भारतीय जनतेला ही किंमत आज नाही उद्या मोजल्याशिवाय मिळालेले राजकीय स्वातंत्र्य उपभोगता येणार नाही, जागतिक पातळीवर आपल्या व्यक्तिमत्त्वाचा वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटविता येणार नाही, एक दुय्यम दर्जाचे राष्ट्र म्हणून कुणा ना कुणा बड्याच्या मदतीवर व मेहेरबानीवर जगण्यावाचून गत्यंतर उरणार नाही, हे निर्विवाद आहे. बहुतेक नवस्वतंत्र राष्ट्रांना आपले व्यक्तिमत्त्व सिद्ध करण्यासाठी हा मुक्तिसंग्राम, हे दुसरे स्वातंत्र्ययुद्ध या नाही त्या स्वरूपात आजवर खेळावे लागलेले आहे. ज्यांनी

हा खेळ नाकारला, मैदानातून पळ काढला, स्वकीय शक्तिसंपादनाऐवजी परकीय मदतीवर आपल्या देशाचा विकास साधण्याची सोयीस्कर सुखवाट पत्करली त्यांच्या कपाळावरचे हे दुय्यम दर्जाचे राष्ट्रीयत्व आजवर चुकलेले नाही. कितीही प्रगती झाली, विकासाचा वेग वगैरे वाढला तरी प्रगत व अप्रगत ही विभागणी कायमच राहाते, विषमतेची दरी कधीही कमी होत नाही. मागासलेपणाचा शिक्का पुसला जात नाही. या मागास समजल्या जाणाऱ्या गरीब राष्ट्रांवर अधिक सामर्थ्यसंपन्न बड्या राष्ट्रांची आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक दडपणे विविध प्रकारांनी येत राहतात. नवस्वतंत्र देश राजकीयदृष्ट्या जरी स्वतंत्र असले तरी या दडपणांपुढे त्यांना मान तुकवणे भाग पडते. मान तुकवण्याचा प्रकार फारतर प्रत्येकाचा वेगवेगळा असू शकतो. कुणाला आपल्या चलनाचे अवमूल्यन करावे लागते, कुणाला मैत्रीच्या तहात स्वतःला बांधून घ्यावे लागते तर आणखी कुणाला राजवटी बदलणेही भाग पडत असेल. परकीय बड्या राष्ट्रांची ही दडपणे झुगारल्याशिवाय नवस्वतंत्र देशांचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व सुरक्षित नसते, कुठल्या ना कुठल्या बड्या राष्ट्रांचे मांडलिक म्हणून वावरण्याशिवाय या देशांना पर्याय नसतो, एवढे निश्चित आहे. कालपरवापर्यंत आपल्यावर अमेरिका दबाव टाकीत होती. आज अमेरिकेबरोबर रशियन दबावाचे संकट आपल्यासमोर उभे आहे. यजमान असा सारखा बदलत राहील, जोवर याचक आपली याचनावृत्ती सोडत नाही तोवर. ही याचनावृत्ती सोडून गरीब पण स्वायत्त शक्ती म्हणून भारताने जागतिक पातळीवरील आपली प्रतिमा सिद्ध करावी असा त्या दोन वर्षांपूर्वीच्या अन्नस्वतंत्रता संचलनाचा सर्व रोख होता. अन्नस्वतंत्रतेची गरज आज उरलेली नाही हे खरे ! पी. एल्. ४८० करार जवळ जवळ संपुष्टात आलेला आहे. भारत अन्नधान्याबाबत स्वयंपूर्णच नाही तर निर्यातक्षमही झालेला आहे. पण भारताचे मांडलिकीकरण, परावलंबन यत्किंचितही कमी झालेले नाही. आपल्या अलिप्ततेच्या धोरणाचा आता पूर्णपणे बळी दिला गेलेला आहे. अन्नस्वतंत्रतेचा प्रश्न मिटला आहे; पण अर्थस्वतंत्रता अद्याप दूर आहे. राष्ट्र परतंत्रता कायम आहे.

अन्नस्वतंत्रतेत एक उणीव होती. ती फक्त नकारात्मक बाजू होती. परदेशी मदत नको, अन्न नको, वर्चस्व नको एवढेच या संचलनात सांगितले गेले. आता स्वदेशी काय हवे, ते कसे प्राप्त करून घ्यायचे हेही तितक्याच आवेशाने सांगण्याची निकड आहे. समजा, उद्या सर्व परदेशी मदत आपण झुगारली, निदान वर्चस्व गाजविणारे परकीय तळ तरी उखडून टाकण्याचे ठरविले, तर आपली अंतर्गत पुनर्घटना, मांडामांड आपण कशी करणार आहोत ? आपल्याच साधनसामग्रीवर आपल्याला विसंबून राहायचे आहे, हे एकदा स्पष्ट झाल्यावर या साधनसामग्रीची फेरमांडणी, पुनर्घटना करणे ओघानेच येते. जे करण्याचे आपण गेली पंचवीस वर्षे टाळत आहोत तेच परिस्थितीच्या दबावामुळे करणे क्रमप्राप्त ठरणार आहे. पैसा कमी पडल्यावर

परदेशी पळता येणार नाही. स्वदेशातच दडलेला पैसा उकरून काढावा लागेल. सैन्य सीमारक्षणापुरतेच ठेवणे परवडू शकणार असल्याने देशांतर्गत अस्थिरता व असंतोष वाढू न देण्याची खबरदारी घ्यावी लागणार आहे. यासाठी ग्रामीण व शहरी भागातील सत्तेच्या व संपत्तीच्या न्याय्य वाटपाचा प्रश्न प्रथम धसास लावावा लागणार आहे. देश गरीब आहे तेव्हा समाजव्यवस्था पोखरलेली, विषमतेने ग्रासलेली आणि समतोल ढळलेली ठेवून प्रगती साधता येणार नाही, बलाढ्य राष्ट्रांच्या मालिकेत स्थान मिळणार नाही, हे आपण ओळखून विरोधाची आणि विकासाची दोन्ही पाती सारखी धारदार ठेवली पाहिजेत. क्षुद्र भेदाभेदांना मूठमाती देऊन, क्षुल्लक मतभेद विसरून ही देशांतर्गत आघाडी मजबूत केल्याशिवाय नवस्वतंत्र देशांना पुढे येण्याचा पर्याय नसतो. हे पुढे येणे हाच मुक्तिसंग्रामाचा दुसरा अर्थ आहे.

विधायक कार्य व राजकारण याची आपल्याकडे एक चुकीची फारकत झालेली आहे. मुक्तिसंग्राम प्राथमिक अवस्थेत असल्याचे हे एक लक्षण आहे. पूर्वी टिळकयुगात अगोदर सामाजिक सुधारणा की राजकीय स्वातंत्र्य असा एक वाद होता. त्याचीच ही नवी आवृत्ती आहे. गांधीजींच्या काळात हा वाद मिटला व सामाजिक सुधारणा व राजकीय स्वातंत्र्य या दोन्ही आघाड्या एकमेकांना पूरक आहेत असा समन्वय साधला गेला. आजही विधायक कार्य व राजकारण यांचा सांधा असाच जुळून येणे अवश्य आहे. विधायक कार्यकर्ते राजकारणापासून दूर आहेत, तर राजकीय संघर्षवाल्यांना जनतेची नैतिक व सांस्कृतिक पातळी उंचावण्याच्या कार्यक्रमात रस उरलेला नाही. ही फूट गरीब देशाला परवडण्यासारखी नाही. गरीब व मागासलेल्या देशांत राजकारणाचे टोक एकच असू शकते. ते म्हणजे पुढारलेल्या राष्ट्रांचे वर्चस्व झुगारून देणे. साम्राज्यशक्तींच्या जोखडातून नवस्वतंत्र स्वदेशाला मुक्त करणे. जागतिक सत्तावाटपातील आपला न्याय्य वाटा हस्तगत करणे. पण देशांतर्गत पुनर्घटनेशिवाय हे राजकारणाचे टोकही बोथट राहाते. विधायक कार्य या पुनर्घटना कार्यक्रमाचे एक अंग म्हणून यासाठी जोपासावे लागते. अगदी माओला सुद्धा येनानच्या कसोटीच्या काळात जनतेच्या हाती काही काळ चरखा द्यावा लागलेला होता हे विधायक कार्याची टिंगल करणाऱ्या शूर (?) क्रांतिकारकांनी विसरू नये. तळ म्हणून ही विधायक कार्यांची क्षेत्रे उपयोगी पडतात. भावी पुनर्घटना कार्यक्रमाच्या प्रयोगशाळा म्हणूनही हे उपक्रम फार मौलिक ठरतात. नवा ध्येयवाद जनतेपर्यंत पोचविण्याचे, त्यागासाठी, कष्टासाठी तिला प्रवृत्त करण्याचे महत्कार्य या तळांच्याद्वारे साधता येते. राजकारणाला सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक पुनर्घटनेचा असा आशय आपण दिला पाहिजे व विधायक पुनर्घटना करीत असतानाही अंतीम राष्ट्रीय मुक्तिलढ्याशी या कार्याचे सतत अनुसंधान राखले पाहिजे. अशी जोड जमली नाही तर राजकारण हा देशातील सत्ताबाजांचा एक खेळ ठरतो व विधायक कार्य हे म्हाताऱ्याकोताऱ्यांचे

उदरनिर्वाहाचे एक ठिकाण बनून राहते.

अशी जोड जमवू पाहाणारे, अन्नस्वतंत्रता आंदोलनात सहभागी असलेले काही कार्यकर्ते नुकतेच विचारविनिमयासाठी एकत्रित जमलेले होते. पी. एल्. ४८० करार संपुष्टात आल्याची भारत सरकारची अधिकृत घोषणा झाल्यामुळे अन्न-स्वतंत्रता समितीचे या विचारविनिमय बैठकीत अधिकृतपणे विसर्जन करण्यात आले. या चळवळीचा एक शेवटचा टप्पा म्हणून ज्या कार्यकर्त्यांनी सरकारी प्राप्ती-कर न भरून वैयक्तिक असहकाराचा मार्ग स्वीकारलेला होता त्यांनी यापुढे प्राप्तीकर भरून हा विषय समाप्त करावा, असा निर्णयही या बैठकीत करण्यात आला. अन्नस्वतंत्रता समितीऐवजी 'ग्रामायन समिती' या नावाने यापुढे कार्य करावे असे ठरले. प्रचलित आर्थिक विकास प्रक्रियेमुळे ग्रामीण भागांचे शोषण वाढत जाणार व गावे ही शहरांच्या वसाहती होणार हे स्पष्ट दिसत असल्यामुळे ग्रामायन समितीने शक्यतो ग्रामीण भागांशी संपर्क वाढवावा, या क्षेत्रातील असंतोषाला दिशा लाभावी म्हणून प्रयत्नशील राहावे, भिन्नभिन्न ठिकाणी चालू असलेल्या विधायक कार्यांचा व कार्यकर्त्यांचा एकमेकांशी मेळ जमवावा, हा प्राथमिक दृष्टिकोन बहुतेकांना या बैठकीत मान्य झाला. त्या दृष्टीने शहादे तालुक्यातील पाटील-वाडी—म्हसावद प्रकरणाची पाहाणी झाली व यासबंधीचा एक विस्तृत लेख नुकताच 'माणूस'मध्ये येऊनही गेला. हा लेख प्रसिद्ध झाल्यानंतर ग्रामायन समितीचे कार्यकर्ते पुन्हा एकत्र जमले व या बैठकीत पाटीलवाडी प्रकरणात अधिक लक्ष घालावे अशा निर्णयाप्रत सर्वजण आले. या प्रकरणी सुमारे शंभर जणांवर शासनातर्फे खटले भरण्यात आलेले आहेत. आरोपी बहुतेक सर्व सातपुडा भागातील गरीब भूमिहीन व आदिवासी आहेत. खटल्याचे कामकाज शहादे—धुळे येथील न्यायालयात लवकरच सुरू होईल. त्यावेळी न्यायालयाच्या कामकाजाशी कार्यकर्त्यांनी संबंध ठेवावा, भूमिहीन गरीब आदिवासींना न्यायाचे संपूर्ण संरक्षण मिळावे म्हणून खटपट करावी, या खटपटीत इतर संस्था-संघटनांच्या समानविचारी कार्यकर्त्यांना व सर्वसाधारण लोकांनाही सामील करून घ्यावे असेही या बैठकीत ठरविण्यात आले. मुख्य अडचण निधीची आहे. आदिवासींची बाजू लढविण्यासाठी उत्तम वकीली मदत मिळणे आवश्यक आहे. गुन्हेगारांना प्रोत्साहन देण्याचा उद्देश नाही. पण उगाच नक्षलवाद नक्षलवाद म्हणून गोरगरीबांना डांबण्याचे कारस्थानही हाणून पाडणे अवश्य आहे. यासाठी 'सातपुडा सर्वोदय मंडळ' या संस्थेच्या नावावर निधी जमा करावा असे तूर्त ग्रामायन समितीच्या कार्यकर्त्यांनी ठरविले आहे. गेली दहा-बारा वर्षे ही संस्था या भागात शिक्षणाचे व आर्थिक विकासाचे कार्य करीत आहे. या खटल्यात गोवला गेलेला नसला, तरी अनेकांचा ज्याच्यावर संशय आहे व जो खटल्यातील आरोपींना सर्व तऱ्हेची कायदेशीर मदत पोचविण्याची प्रथमपासून खटपट करीत आहे तो अबरसिंग सुरतवंसी हा या भागातील प्रख्यात सर्वोदयी कार्यकर्ता या संस्थेचाच एक

सभासद व काही काळ पदाधिकारीही असल्यामुळे सातपुडा सर्वोदय मंडळाने या शंभर आदिवासी आरोपींना न्यायाचे संरक्षण देण्याचे कार्य पत्करणे, यात गैर असे काहीच नाही. निधी किती लागेल हे आज सांगणे कठिण आहे. प्राथमिक अंदाज दहा हजार रुपयांचा आहे. यापैकी एक चतुर्थांश तरी हिस्सा मुंबई-पुण्याने ताबडतोब जमवून द्यावा असे ठरले व त्याप्रमाणे अबर्रासग किंवा सातपुडा सर्वोदय मंडळाचे कुणी कार्यकर्ते या भागात येतील तेव्हा त्यांच्या स्वाधीन हा हिस्सा करण्याची व्यवस्थाही पूर्ण झाली आहे. मदतीची आणखी गरज अर्थातच आहे. मात्र ही मदत सातपुडा सर्वोदय मंडळाकडे यापुढे परस्पर पाठविली जाणे अधिक श्रेयस्कर व सोईचें आहे.

अशाच प्रकारच्या खटल्यात अडकलेले माणूस साप्ताहिकाचे एक लेखक श्री. अनिल बर्वे यांच्या येरवडा तुरुंगातून आलेल्या एका पत्राचाही या संदर्भात विचार झाला. पत्रात अनिल बर्वे यांनी लिहिले आहे: 'केवळ राजकीय सूडबुद्धीने, आकसाने तसेच फार मोठी चेन सापडेल या अपेक्षेनें मला या प्रकरणात गोवण्यात आले. माझ्या घरी काहीही मिळाले नाही वा माझेविरुद्ध काहीही पुरावा नाही. परंतु मी एकटा पडल्याने मी स्वतःला डिफेंड करू शकत नाही....मला लीगल ॲडव्हाईसची फार आवश्यकता आहे'.. इत्यादी. सातपुड्यातील आदिवासींप्रमाणेच पुण्यातील एका संतप्त युवकालादेखील घटनेने दिलेले अधिकार उपभोगता आले पाहिजेत, न्यायाचे योग्य संरक्षण त्याला लाभले पाहिजे अशी याबाबत ग्रामायन कार्यकर्त्यांची भूमिका आहे. अनिल बर्वे यांच्यासोबत अटक झालेले छापखान्याचे मालक श्री. पायगुडे यांनाही हीच भूमिका लागू आहे. आरोप सिद्ध होत असेल तर शिक्षा अवश्य असावी. पण आरोपींच्या असहाय्य अवस्थेचा गैरफायदा घेतला जाऊ नये. यासाठीही निधीचा प्रश्न आलाच. प्राथमिक अंदाज दीड-दोन हजार रुपयांचा आहे. ही जबाबदारी 'माणूस'ने आपल्या वाचकांच्या सहकार्याने पार पाडावी अशी अनेकांची अपेक्षा दिसली. त्याप्रमाणे 'अनिल बर्वे-पायगुडे न्याय संपादन सहाय्यता समिती' या नावावर हा निधी 'माणूस'तर्फे जमा करण्याचे काम लवकरच सुरू होईल. अंदाजापेक्षा निधी जास्त जमा झाला तर खर्चवजा जाता उरलेली सर्व रक्कम म्हैसाळच्या 'श्री विठ्ठल संयुक्त सहकारी शेती सोसायटी लि.' या संस्थेला मदत म्हणून पोचवली जाईल. यासंबंधीचा सर्व हिशेब 'माणूस' अंकातून एकदा प्रसिद्ध करण्यात येईल व प्रकरण 'समाप्त' म्हणून निकालात काढले जाईल. म्हैसाळ येथील हरिजनांनी चालविलेल्या श्रीविठ्ठल संस्थेची माहिती यापूर्वी माणूस अंकातून वाचकांपुढे आलेलीच आहे.

पाच वर्षांपूर्वी महाराष्ट्रात दुष्काळ पडला असता स्थापन झालेल्या 'माणूस प्रतिष्ठान'चा उल्लेखही जाता जाता करण्यास हरकत नाही. १५ ऑगस्ट १९६६

पृष्ठ ६१ वर

# हे सारं आश्चर्यकारकच आहे !

सार्वजनिक क्षेत्रातील कारखान्यांची प्रगती असमाधानकारक आहे, याचे एक महत्वाचे कारण राजकारणी आणि कारखान्याचे अधिकारी आहेत – आश्चर्य वाटलं ना ?

दिल्लीचे अर्थतज्ञ के. पी. एम्. सुंदरम् मात्र तसं अगदी ठासून सांगतात. पुरावा म्हणून मोहन कुमार मंगलम् आणि के. डी. मालवीय यांच्याकडे बोट दाखवितात.

सार्वजनिक क्षेत्रातील प्रत्येक कारखाना म्हणजे एक संस्थान झाले आहे. कुणीही यावे मन मानेल तितके दिवस तेथे रहावे, दुसरीकडं संधी मिळताच हातातील जबाबदारी टाकून निघून जावे अशी परिस्थिती आहे. सरकारी नोकरीत किंवा अन्यत्र पैसा व मानमरातब मिळण्याची सीमा गाठली की हे वरिष्ठ अधिकारी सार्वजनिक क्षेत्रात डायरेक्टर किंवा अशाच बड्या जागांवर आपली नेमणूक करवून घेतात. पुन्हा दुसरीकडे नवे प्रलोभन दिसले की तिकडे पळतात.

तसंच पुढारी मंडळींचं. निवडणूकीत आपटी खाल्ली आणि राज्यपालपदासारख्या जागा शिल्लक नसल्या की त्यांचा मोहरा अशा कारखान्यांकडे वळतो. एक वेळ तर अशी होती की एका कारखान्यात असे आठ अधिकारी आणि सात पराभूत राजकारणी होते. याचा अर्थ ते सर्व या जागांसाठी नालायक होते असे नाही, पण त्यांचे मूळ ध्येय सार्वजनिक क्षेत्राचा विकास वगैरे नव्हते. केवळ 'हवा बदल' म्हणून ते इकडे आले.

हेवी इंजिनिअरिंग कॉर्पोरेशनचे चेअरमन म्हणून के. डी. मालवीय फक्त एक वर्ष होते. निवडणुकीत तिकिट मिळाले आणि त्यांनी ही जागा सोडली. तीच गोष्ट मोहन कुमारमंगलम् यांची.

–" सार्वजनिक कारखान्यांच्या विकासाला खीळ बसायला दिल्लीतील मंत्रालयेसुद्धा कारणीभूत आहेत '–सुंदरम् म्हणाले– पुरावा म्हणून पब्लिक अंडरटेकिंग्ज् कमिटीचा पासष्टावा अहवाल पाहा :

कमिटी म्हणते, ' माईनिंग ॲण्ड अलाईड मशिनरी कॉर्पोरेशन लि. दिवसाला

२·२० लाख रुपयांचा तोटा सहन करीत होती. (अहवाल सादर करण्यापूर्वी.) कमिटीचे असे मत आहे की चुकीची अवास्तव योजना, अयोग्य व्यवस्थापन आणि उत्पादनाच्या पद्धती अंमलात आणण्यातील उणीवा व सरकारची उदासीनता यामुळे हा तोटा होत असतो. योजनेत वारंवार फेरबदल करून, योजनेच्या अंदाजपत्रकाला मंजुरी देण्यात दिरंगाई करून...सरकार कारखान्याच्या विकासाला अडथळा आणते. याच कारखान्याच्या बाबतीतील एक गोष्ट निदर्शनाला आणली की मुद्दा स्पष्ट होईल. या कारखान्यासाठी ३१ मार्च १९६९ पर्यंत ३८·१० कोटी रुपये खर्च झाला, पण एप्रिल ७० पर्यंत योजनेचे अंदाजपत्रक संबंधित मंत्रालयाकडून मंजूर झाले नव्हते.'

पब्लिक सेक्टरमधील अपयश अनेक अंशी सरकार दरबारचा अननुभव आणि अकार्यक्षमता यातून आलेले असते.

यानंतरचे कारण सरकारी क्षेत्रातीलच निरनिराळ्या कारखान्यात असलेली असहकाराची वृत्ती. म्हणजे असं, बोकारोच्या कारखान्यातून माल घ्यायचा असला तर हिंदुस्थान इंजिनिअरिंग कमी किंमत मागत राहील. उलट बोकारो म्हणेल अशाच मालाला रशियातून भारतात आणीपर्यंत आलेल्या खर्चापेक्षा साठ टक्के जास्त किंमत आम्हाला मिळाली पाहिजे. तर हिंदुस्थान स्टील लि. या मारामारी-पासून दूर राहाणेच पसंत करते. या सगळ्यांचा एकत्रित परिणाम बोकारो प्रकल्पाला उशीर होण्यास झाला, अजूनही होतो आहे. केंद्राने धैर्य दाखवून ठाम निर्णय घेईपर्यंत हे असेच चालत राहील.

नंतर कामगार आणि त्यांच्या संघटना : समाजवादाच्या बड्या घोषणा करीत करीत ही मंडळी संप, बंद, मोर्चा, घेराव असे अनेक प्रकार करून कारखान्याच्या कारभारात अडथळे आणतात. पुन्हा दोन कामगार संघटनांतील वैमनस्य आहेच. खाजगी कारखान्यावर नियंत्रण आणून सार्वजनिक क्षेत्राचा विकास करावा असा आग्रह धरणारा कामगारवर्गच उद्योगविकासाच्या आड मोठ्या प्रमाणावर येतो, हा दुर्दैवाचा भाग !

या क्षेत्रात काम करणाऱ्यांना 'आपले कोण काय वाकडे करणार आहे ?' अशी पक्की खात्री असते. नुकसान झाले तरी कुणी बोलत नाही. त्याबद्दल शिक्षा नसते. चांगले काम केल्यास इनसेंटिव्ह नाही. फायदा झालाच तर तो सरकारात जमा होईल – मग आपल्याला काय घेणे आहे ?

आणखी एक मुद्दा. या कामगार अधिकारी – वर्गासाठी वसाहती बनविण्यात येतात. हॉस्पिटल, बाग, शाळा, सुरेख रस्ते. चांगली गोष्ट आहे. पण याची वाईट बाजू अशी की या भपकेबाज गोष्टींवरचा खर्च उत्पादनखर्चात मिळविण्यात येतो. एवढे परवडते का ?

□

## फक्त सव्वालाख !

स्वातंत्र्यदिनाच्या मुहूर्तावर केंद्रीय मंत्र्यांनी पगारात दहा टक्क्यांपर्यंत कपात करण्याचे जाहीर करून राष्ट्रप्रेम किंवा समाजवादाचा उद्घोष केला आहे.

एका तलाठ्याची गोष्ट सांगतात : फंड, विमा, अशा मासिक कपातीबरोबरच त्याला शिक्षा म्हणून अगदी थोडा पगार मिळत होता. शेवटी त्याने विनापगार काम करण्याचीसुद्धा तयारी दर्शविली. कारण विचारलं तर नुसते डोळे मिचकावून हसायचा !

तात्पर्य उघड आहे.

मंत्र्यांनी पगारात कपात केली, तरी सगळ्यांची मिळून बचत सव्वा लाखाच्या घरात जाईल. फक्त सव्वा लाख !

त्याऐवजी मंत्र्यांनी अनावश्यक खोल्या, बागबगीचे, फर्निचर, एअरकंडिशनर, फ्रीझ, अनावश्यक दौरे इत्यादींवरचा खर्च कमी केला, आपल्या जागेच्या जोरावर नातेवाईकांना नोकऱ्या किंवा इतर फायदे देणे बंद केले, तर त्यातून काहीतरी साधू शकेल.

पण प्रत्येकवेळा भारतीय मंत्र्यावरच टीका करण्यात अर्थ नाही, हे मात्र खरे. कारण अमेरिकेचा लंडन आणि पॅरिसमधला वकील मूळात श्रीमंतच असावा लागतो म्हणे – ! कारण सरकार देत असलेला पगार अशा बड्या जागेवरच्या साहेबांना पुरणं अशक्य असतं !

¤

## नवी नेमणूक

दिल्ली पोलीस खात्याने तक्रार नोंदवून घेण्याचे काम यापुढे पुरुष क्लार्क ऐवजी स्त्री क्लार्ककडे सोपविण्याचे ठरविले आहे.

सध्याचे कारकून तक्रारी नोंदवून घेत नाहीत, उद्धटपणा करतात असा आरोप सारखा होत असतो. (बहुधा सर्वत्र होत असावा. मग ते मुंबई असो पुणे असो किंवा कलकत्ता असो.) तेव्हा इथल्या पोलीस कमिशनरांचे मत असे की इथे एखादी स्त्री नेमली तर ती नाजुक हसत, माना वेळावत – उद्धटपणा न करता – तक्रारी नोंदवून घेईल. (कदाचित त्यामुळे तक्रारींची संख्या वाढेल, तक्रार करणाऱ्यांच्या खेपा वाढतील, त्यामुळे पोलिसांना जादा काम पडेल) असा होरा असावा.

पोलीस कमिशनरांना असे का वाटावे कळत नाही. स्त्री कमी उद्धट असते, ती गोड बोलून तक्रार करण्याचा राग कमी करते असा त्यांचा भ्रम कसा झाला ?

सिव्हिल हॉस्पिटलमधील नर्सशी साहेब बोलले नसावेत किंवा टेलिफोन एक्स्चेंजमधील ऑपरेटरचे 'हं, बोला' असे 'काय ताप आहे' अशा अर्थाचे स्वागत त्यांना लाभले नसावे.

¤

सीनेटर केनेडींनी राजधानीला जिंकले. आल्या आल्या 'या भीषण आपत्तीची अनुभूती घेण्यासाठी भारतात आलो असताना आग्र्याचा ताजमहाल पाहणार नाही' अशी घोषणा त्यांनी केली. भारताच्या सहनशीलतेची, धोरणाची त्यांनी प्रशंसा केली आणि पाकिस्तानला सुनविले. लोकप्रियतेसाठी आणखी काय हवे ?

देखणे व्यक्तिमत्व असलेला हा अमेरिकन तरुण पूर्व सीमेवर चिखलातून निर्वासित कॅम्पातून फिरला, छत्री नाकारली या बातम्या वाचून उत्सुकता होती, ती अनाठायी नव्हती.

पत्रकारांना तो आवडला, तो त्याच्या स्पष्ट बोलण्यामुळे. कुठेही संदिग्धता, अस्पष्टपणा नव्हता.

एका बंगाली पत्रकारानेच फक्त शंका व्यक्त केली, 'पाकिस्तानला शस्त्रपुरवठा केल्यामुळे, किसिजरच्या चीन भेटीमुळे भारतात अमेरिकाविरोधी वातावरण निर्माण झाले आहे, ते निवळविण्यासाठी निक्सननेच त्याला पाठविले असेल.'

इंदिराबाईच्या भेटीनतर सिनेटर केनेडीने त्यांचे वर्णन 'चार्मिग लेडी' अशा शब्दात केले. जॉन केनेडीबरोबर जॅकेलिन केनेडी भारतात आल्या होत्या, तेव्हा नेहरूंनी एडवर्डच्या या वहिनीचे वर्णन अगदी याच शब्दात केले होते, 'चार्मिग लेडी'.

### थोडं विषयांतर :

मोहन धारिया मंत्री झाल्यापासून केंद्र सरकारचा कारभार अगदी काटेकोरपणे समाजवादी, लोकाभिमुख मार्गावरून चाललेला दिसतो.

नाहीतर धारियांनी इंदिराबाईंना धारेवर नसतं का धरलं ? जरा आठवा बरं गेल्या निवडणुकीआधीची मोहनभाईंची भाषणं !

नलिनी अंबाडे

# मुलाखत-एका विद्यार्थ्याची-अन्नामलाई युनिव्हर्सिटीचा!

त्या दिवशी ह्यांचे एक मित्र घरी चहाला आले. ह्यांनी मित्राची ओळख करून देताना मला सांगितले. ' हे अन्नामलाई युनिव्हर्सिटीचे विद्यार्थी बरं का ' त्यावर तो छद्मीपणाने जणू हसला अन् म्हणाला, ' आता पुन्हा कुणाला अशी ओळख करून देऊ नको. प्लीज ! '

' कारे बाबा ?'

' नाहीतर काय, युनिव्हर्सिटी अशी कुणालाही डिग्र्या वाटू लागली तर ?'

' मला नाही समजलं '–माझी शरणागती.

' अगं, तू वाचलं नाहीस का ?' हे मला सांगू लागले. ' परवा तिथे तर विद्यार्थ्यांनी दंगल केली–लाठीमार झाला. कॉनव्होकेशन समारंभावर बहिष्कार टाकला आणि एकजण मेला–तळ्यात प्रेत सापडलं–विद्यापीठाला टाळे लावलेय–'

' हा ! हा ! ! आठवलं. तो तमीळ पेपरात प्रेताचा फोटो आला होता खरा. '

' हां, तर भाभीजी ते प्रेत सापडलं २४ जुलैला. आज महिना होत आलाय. सर्वजण म्हणतात तो उदयकुमार म्हणून फायनल बिएस्सीचा स्टूडंट आहे. आमचं डीएमके सरकार म्हणतंय तो दुसराच कुणी आत्महत्यावाला आहे. '

मी चहा टाकायला आत आले. बाहेर दोघांच्या गप्पा–खरं म्हणजे भांडणच–चालल्या होत्या. थोडंसं तमीळ, मध्येच इंग्लिश अन् हिंदी ! हे म्हणत होते त्याला–

' ते अन्नामलै कुठ आहे ? नकाशात मला नाही दिसलं. '

बोलता बोलता, रेल्वेटाईमटेबलातला नकाशा टेबलावर पसरला गेला.

हे मद्रास–खाली चिंगलपेट–त्याखाली विल्लीपुरम–त्याच्याही खाली हे पहा चिदंबरम्–मिटरगेजवरचं बेताचं स्टेशन आहे. '

' तेथून अन्नामलै कुठं न् किती ?'

' चिदंबरम् म्हणजेच अन्नामलै. स्टेशनवर उतरलात ना की, एका प्लॅटफॉर्मवर पाटी आहे चिदंमबरम्, तर समोरच्यावर आहे अन्नामलै. आपले मुंबईचे दादर, कुर्ला कशी दोन्ही बाजूला आहेत तशी. चिदंबरम प्रसिद्ध आहे त्या नटराज देवस्थानासाठी अन् अन्नामलै युनिव्हर्सिटीसाठी. '

' नटराज म्हणजे शंकर ना ?' मी मध्येच विचारलं. मान हलवित तो मित्र सांगू लागला, ' ती कथा ठाऊकय का ? एका क्षूद्राने शंकराची उपासना केली. पण

चिदंबरमला दर्शनाला त्याला मालक सोडीना. हा त्याचेकडे शेतावर राखोळीस होता. मालक म्हणायचा. ' आत्तातर भात पेरलंय–मोठं होवू दे. कापणी झाली की जा. अन् तुला देवळात तिथं कोण सोडणार रे ' हा बिचारा रडत रडत शेतावर राखणीस परतला व शंकराचं नाव घेतघेतच झोपला. सकाळी उठून पाहातो तो शेतातलं पीक रातोरात कापणीइतकं वाढलेलं. मालकानं ह्याला लगेच रजा मंजूर केली. पण चिदंबरमला ह्याला देवळात कुणी सोडीना. पुन्हा रडत बसला धर्मशाळेत जावून. त्या रात्री पुजाऱ्याच्या स्वप्नात शंकर भगवान आले. म्हणाले, माझ्या भक्तास सोड आत ! ' पण कर्मठ सनातनी लोक ऐकेनात. मग ठरले की, सीतेने जशी अग्निदिव्य परीक्षा दिली तशी ह्याने–हा, त्याचं नाव नंदना–द्यावी. नंदना खरा भक्त होता. तयार झाला अन् प्रत्यक्ष अग्नीतून तो चालत मूर्तीपर्यंत गेला–तो परतलाच नाही–म्हणजे शंकरात विलीन झाला. '

' चहा गार होतोय ' मी मध्येच थांबवलं.

' बर, ती युनिव्हर्सिटी कुठं आहे ?' ह्यांनी विचारलं.

' स्टेशनच्या कंपौंडापासूनच म्हणा की ! अहो, ते एक लहानसं स्वतंत्र संस्थानच आहे म्हणा ना ! सगळी कॉलेजें, वसतीगृहे, लायब्ररी, खेळायची मैदाने एकाच आवारात. पॉलीटेक्निक्, सायन्सची लॅबोरेटरी, वर्कशॉप, स्टोअर्स, मुलांच्या जेवायच्या मेसेस सगळं तिथंच !'

' हे कसं ? त्या जिल्ह्यातली कॉलेजें, त्या युनिव्हर्सिटीकडेच असतील ना ' माझी शंका, कारण विद्यापीठाला अनेक कॉलेजे जोडलेली असतात.

' हेच तर अन्नामलैचं वैशिष्ट्य. लॉ आणि मेडिकल सोडून बाकी सगळी कॉलेजे तिथेच. अगदी वेदपठण, म्यूझिकदेखील. '

' म्यूझिक ?'–ह्यांनी मध्येच विचारलं.

' हो ना ! अन्नामलैचा म्यूझिक–डिप्लोमा म्हणजे सिलोन अन् मलेशियात, फॉरीन-रिटर्नड् डिग्री समजतात. '

' अस्सं ?'

' असं बघा, जवळ जवळ चारशेपाचशे मुली असतील तर त्यांतल्या शंभर दीडशे तरी, सिलोनी अन् म्यूझिकसाठी आलेल्या. तशी आर्टस, कॉमर्सकडे मुलींची गर्दी कमी. पण फॉरीन मंडळी म्हणजे आफ्रिका, मलेशिया, जावा, इथलीच. शेतकी कॉलेजला तर आंध्रा केरळातले विद्यार्थी नुसते मरतात अॅडमिशनसाठी. '

' खरंच ? एकूण किती विद्यार्थी असतील एका वेळेस. '

' असतील साडेतीन चार हजार. त्यातले दोन हजाराचेवर तरी होस्टेलवर राहाणारे. प्रत्येक कॉलेजचं होस्टेल निरनिराळं, प्रचंड लायब्ररी. तिचे नाव ' सर सी. पी. रामस्वामी अय्यंगार लायब्ररी '–अरे, पुस्तकं काय विचारता ? म्हाताऱ्याने रक्ताचं पाणी करून एकेक पुस्तक जमवलं बरं ! '

'ते कोण होते ?—मला वाटतं ते मागेच गेलेत ना !'

'हं, ते वारले. पण तीन-चारदा ते व्हाईस चॅन्सेलर म्हणून निवडून आले होते, ना !'

'अन् अन्नामलाई कसे नाव ? की गावाचे नाव युनिव्हर्सिटीला ?'

'इथं उलटं आहे. अन्नामलाई म्हणून एक दानशूर चेट्टीयार होवून गेला. श्रीमंती-मुळे लोक त्याला 'राजा' म्हणू लागले. त्याचं शेत होतं हे. जवळच एक इंजि-नियरींग कॉलेज होतं. अन्नामलैला राष्ट्रीय शिक्षणासाठी काहीतरी मदत करण्याची खूप आकांक्षा होती. ते दिवस १९३०—३५ चे असावेत. बस्स, त्याने ते हजारभर एकरांचं शेत तर दिलंच पण इमारतीही दिल्या बांधून. सरकारला 'रेडीमेड युनिव्हर्सिटी' मिळाली. इतके दिवस युनिव्हर्सिटीचं स्टॅण्डर्ड होतेही उत्तम. अन्ना-मलैचा ग्रॅजूएट म्हणजे नोकरी इंटरव्ह्यूच्या आधीच पक्की ?'

'अस्सं ?'—ह्यांनी विचारले.

'पण अलिकडे ह्या पॉलीटिक्सनी शिक्षणात माती कालविली. राजकारण युनि-व्हर्सिटीत घुसले—सत्तेचा गैरवापर. तुमच्या महाराष्ट्रात परवा त्या ॲग्रिकल्चर युनिव्हर्सिटीत गडबड घेराओ कशाला झाले ओ ?'—त्याने प्रथमच आम्हाला प्रश्न विचारला. मी मदतीसाठी मिस्टरांकडे पाहू लागले, तर ते आढ्याकडे पाहात त त प प शब्द जुळवू लागले. तोच पुढे मग म्हणाला.

'झालं ना तोंड बंद ? मग जे तिथं झालं त्याचीच मोठ्ठी आवृत्ती इथे २३ जुलैला झाली. मोठ्या आवृत्तीस किंमतही अर्थात अधिकच द्यावी लागली. एका गरीब शाळामास्तराचा फायनल बी. एससी. चा मुलगा बळी पडला.'

'पण ती तर म्हणे कुणी आत्महत्या....'

'शट्प् !' त्याने मध्येच ह्यांना थांबविले. 'त्याला घरी बायको होती. म्हणजे आहे...अन् आत्महत्या करायला तळंच कशाला ? मोठ्ठा समुद्र होता ना जवळच. अन् जीव द्यायला त्याला नेमका पोलीसांच्या लाठीहल्ल्याचाच मुहुर्त मिळाला काय ? अगदी २२ जुलैच्याच रात्री !'

क्षणभर सारेच गप्प झालो. शून्यपणे एकमेकांकडे पाहात राहिलो. पाण्याचा घोट घेवून, ह्यांनी विचारले—

'पण विद्यार्थ्यांनी दगडफेक केली म्हणूनच पोलीसांनी लाठीहल्ला केला ना ?'

'आणि विद्यार्थ्यांनी...' मी सुरुवात केली अन् आपणहोऊनच गप्प झाले. कारण चारचौघात चर्चा करण्यासारखं ते कृत्य नव्हतं. विद्यार्थ्यांनी म्हणे कुत्र्यांच्या पाठीवर 'डॉ. करुणानिधी' अक्षरे रंगवली. समारंभाचे वेळी मग पोलिसांना कुत्री हाकलण्याचं काम करावं लागलं. काळी निशाणे दाखविली, पत्रके छापून वाटली, पदवीदानसमारंभावर बहिष्कार घातला येथवर क्षम्य होतं. पण काही विद्यार्थी

पृष्ठ ६० वर



# डोकं दुखतंय् ? ॲनासिन

**घ्या नि वेदनांपासून आराम मिळवा**
**ते प्रभावी नि सुरक्षित असल्याने उत्तम ठरते**



हॉटेल मालक श्री. दत्ता कदंब म्हणतात, "मला ॲनासिनपासून त्वरित आराम मिळतो. मी ते घरात नेहमी ठेवतो."

जगभर डॉक्टर्स ज्या वेदनाशामकाची शिफारस करीत असतात ते ॲनासिनमध्ये भरपूर प्रमाणात असल्याने ॲनासिन **प्रभावी** असते. ॲनासिन घेतल्याने वेदनांपासून जलद आराम मिळतो.

ॲनासिन **सुरक्षित** ही असते—कारण, डॉक्टरांच्या निर्धोक मिश्रणाप्रमाणेच त्यात अनेक औषधी घातलेल्या असतात. मुलांनाही ते बिनधोकपणे देता येते—इतर औषधांसाठी तुम्ही डॉक्टरांचा सल्ला घेता त्याप्रमाणेच मुलांना किती ॲनासिन द्यायचे यासंबंधी त्यांना विचारा.

सर्दीपडसे, फ्लू, डोकेदुखी, पाठदुखी, स्नायुदुखी आणि दातदुखी यांवर ते अतिशय प्रभावी असते.

**ॲनासिन**
भारताचे अत्यंत लोकप्रिय वेदनाशामक




Regd. User of TM : Geoffrey Manners & Co., Ltd.

# देव तेथेचि जाणावा

देवीदास बागूल

महाराष्ट्रात तुकारामाला लोक मानतात काय ? असा प्रश्न विचारला तर लोक प्रश्न विचारणाऱ्याला उत्तर देण्याऐवजी वेड्यातच काढतील. कारण तुकाराम हा लोकांना आईइतका जवळचा वाटतो. म्हणून तर ते 'ज्ञानेश्वर माऊली। ज्ञानराज माऊली तुकाराम' असा उल्लेख करतात. लोकांना तुकारामाबद्दल फार आदर आणि भक्ती वाटते हेच त्या उद्गारातून दिसते.

पण प्रत्यक्ष तुकारामाला जर विचारले की, ह्या लोकांचे तुझ्यावर प्रेम आहे, तुझा शब्द हे लोक मानतात, असे तुला वाटते का ? तर काय उत्तर मिळेल ? एखादा खलनायक नायिकेवर त्याच्याशरीने अपार प्रेम करतो, पण नायिकेला मात्र त्याच्या प्रेमाचा दिलासा वाटत नाही. तुकारामाचा एक अभंग जर वाचला तर तुकारामालाही लोकांबद्दल असाच बेभरवश्याचा अनुभव आलेला असावा असे वाटते. एखाद्या माणसाचे काहीच ऐकायाचे नाही, पण तोंडाने मात्र म्हणायचे की तुम्ही आम्हाला आदरणीय वाटता, तर त्या नात्यात काय अर्थ राहिला ?

तुकारामाने आपली ही झाकली मूठ एकदा चांगलीच उघडून दाखवली आहे. तो म्हणतो,

देव घ्या कोणी, देव घ्या कोणी । आयता आला घर पुसोनी ॥१॥
देव नलगे, देव नलगे । साठवणेचे रुधले जागे ॥२॥
देव मंदला, देव मंदला । भाव बुडाला काय करूं ॥३॥
देव घ्या फुका, देव घ्या फुका । नलगे रुका मोल काही ॥४॥
दुबळा तुका भावहीन । उधारा देव घेतला ऋण ॥५॥

तुकारामाला आलेला हा अनुभव अतिशय चमत्कारिक आहे ! तो लोकांना देव द्यायला गेला तर लोकांनी तो घेण्याचे चक्क नाकारले ! असे कसे झाले ? यात

चूक कोणाची झाली ? तुकारामाची की लोकांची ?

वास्तविक लोकांना देव नको असतो काय ? छे, छे ! असे स्वप्नातही घडणार नाही. जो देव संकटाला धावून येतो, नवसाला पावतो, अक्षय्य सुखाची प्राप्ती करून देतो, आत्म्याला शांती देतो, जन्ममरण्याच्या फेऱ्यांतून वाचवतो, तो देव नको कोणाला असणार ? खरे सांगायचे म्हणजे तुकाराम जेव्हा देव वाटायला निघाला तेव्हासुद्धा लोक अगोदरपासूनच देव जवळ बाळगून होते. तो देव कोणाच्या मूर्तीत होता, तर कोणाच्या हृदयात होता. जो तो आपापल्या परी त्या सर्व शक्तीमान देवाची कायावाचामने पूजाअर्चा करीतच होता. देव अशा प्रकारे सगळीकडे सुलभपणे लोकांना उपलब्ध असताना तुकाराम ' देव घ्या कोणी देव घ्या कोणी ' असे पुकारत कशाकरता निघाला असेल ?

तो कशाकरता निघाला होता हे त्यावेळच्या लोकांनी चाणाक्षपणे ओळखलेले दिसते. त्यांनी तुकारामाला सरळसरळच नकार दिला. खुद्द तुकारामानेच त्या लोकांचे उग्दार उद्धृत केले आहेत. लोक म्हणाले की, ' देव नलगे, देव नलगे । ' कारण काय, तर ' साठवणेचे रुधले जागे ।। ' देव घेऊन ज्या ठिकाणी साठवून ठेवायचा त्या सर्व जागा आगोदरच गच्च भरल्या आहेत, रुधल्या म्हणजे व्यापलेल्या आहेत. देवळात आहे, देवघरात आहे, जळी, स्थळी, काष्टी, पाषाणी, थोडक्यात म्हणजे सर्व चराचरात देव आहेच की ! मग तुकारामाने दिलेला देव लोकांनी ठेवायचा तरी कुठे ? त्यापेक्षा तुकारामाला सरळ नकार दिलेला बरा !

तरीसुद्धा तुकाराम नाऊमेद न होता आपला हेका पुढे चालू ठेवीत म्हणतो की, " देव घ्या फुका । न लगे रुका मोल काही ।।." देव फुकट घ्या, काही दिडकीसुद्धा देऊ नका. पण लोक तुकारामाचे बारसे जेवलेले होते. त्यांनी ओळखले असावे, की एरवीचा देव परवडला, पण तुकारामाचा देव फुकटातसुद्धा नको. कारण एकदा का तुकारामाचा देव घेतला तर ' भीक नको पण कुत्रा आवर ' अशी आपली स्थिती होईल अशी लोकांना भीती वाटत असावी. एरवी, देवासाठी हपापलेले लोक तुकारामाचा देव का नाकारतील ?

तुकारामाचा देव लोकांनी नाकारावा असे काय होते तुकारामाच्या देवात ?

अगदी खरे सांगायचे म्हणजे तुकाराम ' देव घ्या देव घ्या ' असे जरी बोलत होता, तरी प्रत्यक्षात मात्र तो लोकांना स्वतःच देव बनायला सांगत होता. तुकाराम म्हणतो की,

> जे का रंजले गांजले । त्यांसि म्हणे जो आपुले ।।
> तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।।

एवढेच नव्हे तर

> तुका म्हणे सांगू किती । तोचि भगवंताची मूर्ती ।।

म्हणजे सगळेच प्रकरण उलटेपालटे दिसते. लोकांना सवय होती उद्धारकर्त्या

देवाची, तर तुकाराम म्हणतो की लोकांनीच उद्धारकर्ते व्हावे, म्हणजे तेच देव होतील आणि उद्धारकर्ते व्हायचे कसे? तर जे लोक रंजलेले, गांजलेले असतील, दीनदुबळे असतील, परित्यक्त असतील त्यांना आपले म्हणा, त्यांना जवळ करा. रंजलेल्यांना जवळ करण्याचा वसा घेणे म्हणजेच देव घेणे असा तुकारामाचा रोख आहे.

ह्या गांजलेल्या लोकांना आपले म्हणायचे म्हणजे नुसते त्यांचा आत्मा आणि आपला आत्मा एक आहे असे म्हणून हात झटकणे नव्हे. तर त्या गांजलेल्या लोकांना स्वत:सारखीच वागणूक देणे. तुकाराम त्याच अभंगात ही गोष्ट स्पष्ट करतो. तो म्हणतो की, ' दया करणे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ।। '

आध्यात्मिक क्षेत्रातील समानता अशाप्रकारे दैनंदिन सामाजिक क्षेत्रात आणणारी ही देवकल्पना कोणाला परवडणार? त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे देव हा दुसरा कोणीतरी असण्यात जे फायदे असतात ते गमावून आपणच देव होऊन दुसऱ्यांना मदत करीत राहण्यात कोणाला रस वाटणार आहे? एकदा का 'गांजलेल्यांना मदत करणारा माणूसच देव असतो' असे स्वीकारले म्हणजे मग आपण नवससायास तरी कोणाला करायचे? संकटकाळात हाक तरी कोणाला मारायची? कारण एकदा का तुकारामाचा देव घेतला तर मग दुसरा देव झूटच ठरतो. कारण तुकाराम निक्षून सांगतो की, ' देव तेथेचि जाणावा ' there and only there. जळी, स्थळी, काष्टी, पाषाणी, वगैरे फापटपसारा अजिबात नको. देव फक्त एकाच ठिकाणी आहे. म्हणजे गांजलेल्यांना जो मदत करतो त्याच्याच ठिकाणी फक्त देव आहे. दुसरीकडे अजिबात नाही. पारंपरिक देव श्रीखंड्या होऊन पाणी भरतो, पण केव्हा? जेव्हा त्या देवाची भक्ती कराल तेव्हा! पण तुकारामाचा देव कुठे असतो, तर जो रंजल्यागांजल्यांना आपले म्हणतो तिथेच देव असतो. म्हणजे पाणी भरण्यासाठी त्या त्या लोकांनी भक्ती करण्याची तुकारामाचा देव वाट पाहत बसत नाही, किंबहुना गांजलेल्या लोकांना भक्ती सुचणार तरी कशी? अशी काळजी तुकारामाचा देव करतो. खरोखर हा खराखुरा भौतिक देव! आणि हा भौतिक देव त्या अद्‌भुत देवापेक्षा माणुसकीचे खरेखुरे रक्षण, पालन, पोषण आणि संगोपन करील.

आणि जर पृथ्वीवरील रंजलेगांजलेले लोक सुखीसमाधानी झाले तर मग खुशाल 'आत्मापरमात्मा एक आहे, भौतिक सुखापेक्षा आत्मिक सुख श्रेष्ठ आहे, सर्व चराचरात देव आहे' अशा गोष्टी करा. पण जोपर्यंत पृथ्वीवर एक जरी रंजलेला-गांजलेला असेल तोपर्यंत मात्र देव एकाच ठिकाणी, फक्त एकाच ठिकाणी आहे. आणि ते ठिकाण म्हणजे रंजलेल्यागांजलेल्यांना आपले म्हणून वागणाऱ्या माणसातच. सर्व चराचरात देव आहे अशा गोष्टी तोपर्यंत बाष्कळच ठरणार आहेत!

प्रचलित देवकल्पनेला तुकारामाने दिलेला हा धक्का इतका प्रचंड होता की लोकांनी तुकारामाच्या ' देव घ्या कोणी । देव घ्या कोणी ' ह्या विणवणीला अगदी

घाटाण्याच्या अक्षता लावल्या. आणि ते पुन्हा पारंपारिक देवपूजा करीत म्हणू लागले की, 'वदतु कतिपय सोऽहं सोऽहं । परि हे भगवन तव दासोऽहं' हे परमेश्वरा, कोणी काही म्हणोत की तो देव म्हणजे मीच, परंतु मी मात्र तुझा दासच आहे !


आणि तुकारामाचा माणुसकी ओळखणारा आणि पाळू पाहणारा देव एकाकीच राहिला. त्याला अनुयायी मिळालेच नाहीत.

अनुयायी मिळाले नाहीत ते नाहीतच, उलट अनुयायी मिळू नयेत म्हणून त्याच्या त्या अभंगातील 'देव' ह्याचा अर्थ बदलून टाकायला नंतरच्या प्रवचनकारांनी मागेपुढे पाहिले नाही. ह. भ. प. सोनोपंत दांडेकरांनी तर वरील अभंगाचा अर्थ लावताना देव म्हणजे 'ज्या सत्तेने हे विश्व चालते व ज्याच्या प्रकाशाने ते प्रकाशले जाते' ती वस्तू म्हणजे देव असे अवजड, अगडबंब प्रतिपादन केले.

अरेरे ! लोकांनी देवकल्पनेला जे निरनिराळे फाटे फोडले होते ते सर्व छाटून टाकून तुकारामाला एकाच ठिकाणी, फक्त एकाच ठिकाणी देव आहे असे सांगायचे होते. 'देव तेथेचि जाणावा' असे त्याने निक्षून सांगूनसुद्धा काही उपयोग झाला नाही. लोक सर्वत्र देव पाहायला मोकळे झाले आणि रंजले-गांजलेले लोक उपेक्षितच राहिले.

नाही म्हणायला गाडगेबाबा नावाच्या एका माणसाने तेवढा तुकारामाचा देव घेतला, आणि रंजलेल्या गांजलेल्यांची शेवटपर्यंत सेवा केली.

गाडगेबाबानंतर मात्र रंजलेल्या गांजलेल्यांना आपले म्हणणारा कोणी निघाला नाही. म्हणून तुकारामाचे 'देव घ्या कोणी, देव घ्या कोणी' हे आवाहन आजही आक्रंदन करते आहे असे वाटते.



हैद्राबाद
मुक्तिसंग्रामातील
एक विजयपर्व

# ऑपरेशन उमरी बँक



सुधाकर डोईफोडे

**३० जानेवारी १९४८**

त्या दिवशी कातरवेळी झाडलेल्या चार गोळयांनी मानवतेचा बळी घेतला !

महात्माजींच्या वधाचा तो दिवस. भारताच्या इतिहासातील एक काळाकुट्ट दिवस.

परंतु त्याच दिवशी, त्याचवेळी, भारताच्या दुसऱ्या भागात आणखी काही गोळया झाडल्या गेल्या व या गोळीबाराने संस्थानी प्रजेच्या लढयाचा इतिहास निर्णायक-रीत्या बदलला याची फारच थोडयांना जाणीव आहे.

हैद्राबाद संस्थानातील उमरी बँकलुटीचे प्रकरण त्याक्षणी घडले. सुमारे २१ लाखांची प्रचंड लूट झाली आणि त्याच क्षणापासून हैद्राबाद मुक्तिसंग्रामाला एक वेगळेच वळण लागले. याचमुळे उमरी बँकप्रकरण हे निजाम संस्थानाच्याच नव्हे-

तर भारतीय संघराज्याच्या इतिहासातील एक सुवर्ण टप्पा मानावा लागेल. दुर्दैवाने या घटनेची साग्रसंगीत हकीगत फारच थोड्यांना ठाऊक आहे. त्या वेळेची गंभीर राजकीय परिस्थिती, सशस्त्र दहशतवादी कृत्य व लुटमारीसारख्या ' गुन्ह्या 'ची बाब यामुळे की काय त्याबाबत आजवर बरीच गुप्तता पाळली गेली. यामुळे हे प्रकरण अधिकच गूढ होत गेले आणि त्यापासून बऱ्याच शंकाकुशंका व समजुतींना वाव मिळाला. या प्रकारातील लोक सुशिक्षित व जबाबदार तसेच प्रसिद्धिपराङ्मुख. याचमुळे या घटनेची नीटशी माहिती जवळच्या लोकांनाही नाही. हे कसे घडले तेही फारच थोड्यांना ठाऊक आहे.

हे असे घडले !

भारताचे स्वातंत्र्य निश्चित होताच संस्थानी प्रजेत एक प्रकारची अस्वस्थता निर्माण झाली. इंग्रजांनी संस्थानिकांना त्यांचे सार्वभौमत्व परत केले होते. यामुळे हैद्राबाद रिसायतीसारख्या आकाराने, स्थानाने व शक्तीनेही मोठ्या असलेल्या संस्थानाच्या आकांक्षांना पंख फुटल्यास नवल नाही. त्यातच शासक मुसलमान. अस्वस्थ झालेला मुस्लिमसमाज आपल्या दैवी हितसंबंधांच्या संरक्षणासाठी रझाकार संघटनेद्वारे एकत्र येत होता. लोकशाहीविरूद्ध हुकुमशाही हे स्वरूप जाऊन हिन्दू-विरुद्ध मुसलमान असे स्वरूप या लढ्याला येऊ लागले होते.

अशा वातावरणात स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसने लढा सुरू केला.

' हिंदी युनियनमे सामील होना ही पडेगा, ' ' जिम्मेदाराना हुकुमत (जबाबदार राज्यपद्धती) लेके रहेंगे ' या त्यावेळी घोषणा होत्या.

या चळवळीचे स्वरूप तसे मोठे व्यापक होते.

महात्माजींच्या आदेशाप्रमाणे केवळ अहिंसात्मक सत्याग्रह एवढेच त्याचे स्वरूप नव्हते. जंगल सत्याग्रह, साराबंदी चळवळ याचबरोबर सशस्त्र संघर्षही नेत्यांनी अवैध मानला नाही.

या ठिकाणी हेही सांगितले पाहिजे, की निजाम संस्थानातील सर्वच प्रजा स्वातंत्र्योत्सुक होती खरी; परंतु खरा व तेजस्वी लढा झाला तो मराठवाड्यातच. हैद्राबाद स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्वही प. पू. स्वामिजींच्या मार्गदर्शनाखाली, श्री. दिगंबरराव बिंदु, गोविंददास श्रॉफ, श्रीनिवासराव बोधनकर, बाबासाहेब परांजपे आदि प्रामुख्याने महाराष्ट्रीयांनीच चालविले होते. मराठवाड्याच्या भूमीत किसान दलाच्या रूपाने सशस्त्र संगराला प्रारंभ झाला होता.

१५ ऑगस्ट १९४७ चा हिन्दी संघराज्याचा स्वातंत्र्यदिन निजाम संस्थानात प्रजेने साजरा केला. संघराज्याचा चक्रांकित तिरंगा ध्वज आपला आहे असे जाहीर करून हैद्राबादी प्रजेने तो घरोघर फडकावला आणि एका भीषण लढ्याला तोंड लागले. अटक, लाठीमार, रजाकारांचे हल्ले, यांना ऊत आला. जनतेच्या असंतो-

याला व्यापक व विधायक वळण लावण्यासाठी स्टेट कॉंग्रेसने सत्याग्रहाची घोषणा केली.

पाहाता पाहाता रियासती जेल भरू लागले. हजारो सत्याग्रही रोज स्वतःला अटक करवून घेऊ लागले.

आजच्या सत्याग्रहावरून तरुण पिढीने त्यावेळेच्या सत्याग्रहाची कल्पना करू नये. इंग्रजी राज्यातील जनतेलाही येथील परिस्थितीची व जनमताची कल्पना येणार नाही. गोव्यातील जनता कदाचित् हे हाल समजू शकेल. अशा प्रसंगी सत्याग्रह हेही फार मोठे शौर्य होते. जंगल सत्याग्रह किंवा साराबंदी हातर राजद्रोहाचाच जणू गुन्हा होता. हैद्राबादेतील शिंदीच्या झाडांचा लिलाव करून येणारे उत्पन्न हा सरकारच्या खजिन्यातील मोठा भाग होता. जंगल सत्याग्रहींनी प्रामुख्याने शिंदीची (व त्या खालोखाल सागाची) हजारो झाडे तोडून शासनाच्या नाकात दम आणला. जंगल सत्याग्रहींना निजामी सत्तेने कडक शिक्षा ठोठावल्या.

एकीकडे हिंदी संघराज्यात सामील होण्याची मागणी होत असतानाच दुसरीकडे कासीम रजवी, मुख्यप्रधान लायक अल्ली आदि लोक आजाद सल्तनतीची स्वप्ने पाहू लागले. आज चार मिनारवर फडकणारा पिवळा असफजाही झेंडा लाल किल्ल्यावर लहेरविण्याचे ख्वाब त्यांना दिसत होते. दररोज अत्याचारांना ऊत आला. रियासतीत निजामाची सत्ता आहे की कासीम रझवीची तेच समजेनासे झाले!

इकडे सरदार वल्लभभाई पटेल सर्व परिस्थिती बारकाईने पाहात होतेच. निजामी घोडा ठाणबंद करण्याच्या दृष्टीने त्यांनी डावपेच सुरू केले.

बऱ्याच दडपणानंतर निजामी संस्थानाचा हिंदी संघराज्याशी करार झाला. त्या-योगे इंग्रज सरकारचे अधिकार संघराज्याकडे आले. थोडक्यात संरक्षण, परराष्ट्र-संबंध व अर्थ हे तीन विषय रियासतीने संघराज्याकडे सोपविले. हाच करार 'जैसे थे करार' (stand still agriment) म्हणून प्रसिद्ध आहे. स्टेट कॉंग्रेसने हा करार म्हणजे तात्पुरती व्यवस्था आहे असे मानले व आपली संपूर्ण सामिलीकरणाची चळवळ तीव्र केली.

येथे हैद्राबाद मुक्तिचळवळीचा एक टप्पा पूर्ण होतो.

प्रत्येक आंदोलनात कुंपणावरील नेत्यांचा एक वर्ग असतोच. स्टेट कॉंग्रेसमधील बी. रामकृष्णराव, काशीनाथराव वैद्य, रंगा रेड्डी, चेन्ना रेड्डी आदि महाभाग या वर्गात मोडू शकतात.

स्टेट कॉंग्रेसने जैसे थे करार मान्य करून चळवळ थांबवावी आणि हिंदू-मुस्लिम ५०।५० टक्के या पद्धतीने स्थापन होणाऱ्या मंत्रिमंडळात जावे असा प्रचार ही मंडळी करू लागली. सत्तेच्या स्वीकाराची या लोकांनी घाई झाली होती हे उघडच होते. मात्र बहुसंख्य कार्यकर्त्यांना ते मान्य नव्हते. चळवळ जोरात चालवून सामिली-करण पूर्ण करावे असा त्यांचा आग्रह होता.

## शहाळं खाण्याची ही एक पद्धत

## पण ही त्यापेक्षांही चांगली



भारतातील सर्वोत्कृष्ट नारळांच्या कुरकुरीत स्वादिष्टपणाची मधुर चव तुम्हांला ब्रिटानिया नाईस बिस्किटांत आढळेल. ती उत्तम स्वादाची नि कुरकुरीत असून त्यांवर उत्तम प्रकारची शुभ्र साखर पसरलेली असते. ब्रिटानिया नाईस. वैशिष्ट्यपूर्ण स्वादाची वैशिष्ट्यपूर्ण बिस्किटे.




# ब्रिटानिया नाईस बिस्किटे

भारतातील सर्वोत्कृष्ट बिस्किटे ब्रिटानिया

परंतु कोणत्याही चळवळीला एक मर्यादा असते.

निजामविरोधी लढ्यात बिनीचे नेते व जिल्हापातळीवरील धडाडीचे कार्यकर्ते जेलमध्ये अडकले होते. बरेचसे भूमिगत झाले होते. कोणी रानोमाळ भटकत होते. काही सरहद्दीवर राहून निजामी हद्दीत वरचेवर हल्ले करीत तर काही आत राहून भूमिगतदले संघटित करीत होते. निजामी शासनाला रोकडी प्रचिती दाखविण्याचे मनसुबे रचले जाऊ लागले. प्रशासनावर हल्ले चढवून त्याला भयचकित करणे व आतवर घुसून हल्ले चढविण्याइतपत आपले सामर्थ्य वाढले आहे हे सर्वांच्या नजरेस आणून देणे आवश्यक होते. पण या सर्वांचे अधिष्ठान जो पैसा तो कमी पडू लागला. म्हणून कुठूनतरी पैसा उभा करणे आवश्यक होते. त्याचबरोबर काही तरी दिव्य-भव्य करण्याचीही गरज होती. विचारविनिमय सुरू झाला, डोक्यावर डोकी घासली जाऊ लागली. भूमिगत चळवळ्यांच्या वारंवार बैठकी होऊ लागल्या. काय करावे? कुठून पैसा आणावा? की कुठे डाका घालावा? डाका...हो डाकाच!

ठरले. डाकाच घालायचा. चला लागा तयारीला!

डाका घालायचे ठरले. पण तो कुण्या शेठ सावकाराच्या पेढीवर नव्हे तर चक्क शासनाच्या खजिन्यावर. हैद्राबाद स्टेट बँकेवर. उमरी येथील स्टेट बँकेच्या शाखेवर.

येथे हे सांगितले पाहिजे की उमरी बँकेवर छापा घालण्याची मूळची कल्पना आर्य समाजातील एका गटाची. हैद्राबादेत आर्यसमाजाचाही लढा चालू होता. हा लढा स्टेट काँग्रेसशी प्राय: सुसंगत असाच होता. बरेच आर्यसमाजी नेते स्टेट काँग्रेसचे सदस्य होते. पंडित नरेंद्रजी हे त्यांपैकी प्रमुख.

बीदर-उस्मानाबाद जिल्ह्यात आर्य समाजीयांचा चांगलाच जोर होता. नांदेड जिल्ह्यातील उमरी हेही आर्य समाजाचे चांगले केंद्र होते. धनजी पुरोहित नावाचे पंजाबी व्यापारी, श्री. दिगंबरराव पतेवार, मोहनलाल शर्मा, शंकरलाल शर्मा हे लोक आर्य समाजाचे काम करीत. धनजींचा संबंध काँग्रेसशीही होता. गृहस्थ खरा त्यागी. मध्यंतरी काँग्रेसच्या कार्याला पैसे कमी पडले, तेव्हा त्यांनी स्वत:चे घर गहाण ठेवून ५० हजार रुपये दिले.

उमरी येथे रझाकारांचे अत्याचार वाढले होते. श्री. दिगंबरराव उत्तरवार यांच्या वडील बंधूंचा रझाकारांनी खून केला होता. जवळच धर्माबादनजीक श्री. गोविंदराव पानसरे यांना रझाकारांनी ठार केले होते. या सर्व प्रकरणाची तीव्र प्रतिक्रिया उमरीत उमटत होती. श्री. पतेवार यांच्या खुनाचा बदला घेण्यासाठी आर्यसमाजी कोणतेतरी निमित्त शोधत होते. त्यातून उमरी बँकलुटीची कल्पना मूळ धरू लागली. परंतु त्याला आवश्यक असे बळ त्यांच्याजवळ नव्हते. यासाठी प्रारंभी त्यांनी कम्युनिस्टांशी संपर्क साधला असे म्हणतात. परंतु त्यापक्षाचे इकडील स्थान नगण्य असल्याने त्यांना ही योजना पूर्ण करण्याचे धैर्य दाखविता



रझाकारांचे अत्याचार
वाढू लागले

आले नाही. तसे पाहाता आर्य समाजीयांना स्टेट कॉंग्रेस परकी नव्हतीच. सहाजिकच धनजींच्या मुखाने ही कल्पना कॉंग्रेस कार्यालयात दाखल झाली.

नांदेड जिल्ह्यांतील कॉंग्रेसचे नेते त्यावेळी एक तर जेलमध्ये होते अथवा बॉर्डर-बाहेर होते. सर्वश्री भगवानराव गांजवे, विनायकराव डोईफोडे, जीवनराव बोधनकर तुरुंगात. श्यामराव बोधनकर सोलापूर कँपवर, तर गोपाळशास्त्री देव उमरखेड बॉर्डर कॅम्पवर होते. कॉंग्रेसचे उघड आंदोलन संपले होते. आता उरला होता तो भूमिगत लढा. या लढ्याची नांदेड जिल्ह्यातील सूत्रे श्री. अनंतराव भालेराव यांच्याकडे होती. त्यांना श्री. रघुनाथराव रोचणीकर, नागनाथ परांजपे, साहेबराव देशमुख आदि धाडसी तरुणांचे साह्य होते. अनंतराव हे धीरगंभीर विवेकी गृहस्थ, तर रघुनाथराव हे सैन्यात नोकरी केलेले अनुभवी सैनिक. साहेब-राव, परांजपे आदि उत्साही अवखळ परंतु अनुशासनबद्ध तरुण त्यांच्या दिमतीला.

आता उमरी बँक लुटीचा सारा तपशील अगदी बारकाईने ठरविला जाऊ लागला. एखाद्या सैनिकी मोहिमेप्रमाणे प्रत्येक बाब पारखून ठरू लागली. मोहिमेची लुटूपुटूची प्रात्यक्षिके होऊ लागली.

लुटीसाठी उमरीचीच निवड का झाली? यासाठी त्यावेळेच्या हैद्राबादचा इतिहास-भूगोल, त्याचप्रमाणे क्रांतिकारकांच्या मनोवृत्तीचा विचार केला पाहिजे. त्यावेळी नांदेड जिल्ह्यात दोन-तीन ठिकाणीच हैद्राबाद स्टेट बँकेच्या शाखा होत्या.

उमरी हे त्यांपैकी एक ठिकाण. उमरी ही कापसाची पेठ असल्याने तेथे दररोज लाखो रुपयांची उलाढाल होत असे. त्यावेळी नांदेडलाच टेलिफोनची सोय नव्हती, मग उमरी दूरच राहिले. उमरीला जोडणारी पक्की सडक नव्हती (ही स्थिती ७ वर्षांपूर्वीपर्यंत कायम होती.) दळणवळणाचे एकमेव साधन म्हणजे रेल्वे. मनमाड-काचीगुडा (हैद्राबाद) फाटयावरील उमरी हे एक स्टेशन. दुपारी एकदा गाडी गेली, की दुसरे दिवशी सकाळी २ वाजेपर्यंत गाडी नव्हती. एकूण छापा घालण्याला ते आदर्श ठिकाण होते. छापेवाल्यांच्या मानसिक दृष्टिकोणातून पाहाता उमरी हेच ठिकाण निवडण्यास सबळ कारण होते. श्री. दिगंबरराव पतेवार यांच्या बंधूंचा खून झाल्याने पतेवार व त्यांचे सहकारी स्थानिक रझाकारांवर सूड उगविण्याची प्रतिज्ञा करून होते. दुसरे कारण असे, की बॉर्डरवर राहून निजामी मुलुखात सरहद्दीजवळ छापे घालणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांनी निजामशाहीने भुरटयांची उपमा दिली होती. त्यामुळे खोलवर हल्ला करून आपली आघात क्षमता प्रभावीपणे निजामच्या ध्यानात आणून देण्यास ते उत्सुक होते. उमरी हे वऱ्हाडातील उमरखेड कँपपासून चांगलेच आतवर म्हणजे काकमार्गाने ६० मैल दूर होते.

धनजीभाई, पत्तेवार आदि व्यापारी दररोजच बँकेत जात असत. तिथल्या रचनेची त्यांना चांगली माहिती होती. हा विचार शिजत होता तो नोव्हेम्बर १९४७ चा महिना असावा. कापसाचा हंगाम जोरात चालू होता. उमरी बँकेत लाखोनी पैसा येत होता. पावसाळयात तेथे ६०–७० लाख रुपये तरी जमले असावेत. एवढे मोठे घबाड हाती लागले तर...रकमेच्या नुसत्या आकडयांनीच कटवाल्यांचे मस्तक फिरू लागले. लूट मोठी तेव्हा हल्लाही विचारपूर्वक व धाडसाने झाला पाहिजे. किमान सव्वाशे जणांची तरी त्यासाठी आवश्यकता होती. ऑपरेशनचे नेतृत्व श्री. अनंत भालेराव यांचेकडे होते, तर सेनापतीपद रघुनाथरावांकडे होते. हळुहळू लोक जमू लागले. कामे वाटली जाऊ लागली. डिसेंबरच्या शेवटच्या आठवडयांत छापा घालण्याचे ठरले. 'ऑपरेशन उमरी बँक'चा प्लॅन तयार झाला. शस्त्रास्त्रे जमा झाली. सर्व वीरांचे बाहू स्फुरण पाऊ लागले.

परंतु घात झाला... बँक लुटीचा कट सरकारच्या कानावर गेला ! !

ही वातमी कशी फुटली हे आज नक्की सांगता येणार नाही. मात्र ती सरकारला समजली हे खरे. या मोहिमेत निदान १००–१२५ जणांचा समावेश होता. चर्चा होताना आणखी काहीजण उपस्थित असत. हे सर्वच समजदार होते असे नव्हे. काहीनी उत्साहाच्या भरात इष्टमित्रांना किंवा घरीदारी वाच्यता केली असण्याची शक्यता आहे. कटाची माहिती असणाऱ्या एका निकटवर्तीयाने पोलिसाना एक सांकेतिक तारच दाखविली होती असेही म्हणतात. खरेखोटे काहीही असो. सरकारला कटाचा सुगावा लागला एवढे सत्य आहे. सरकारच्या तावडतोब हालचाली सुरू झाल्या. उमरीला पोलिसांची संख्या वाढविण्यात आली. बँकेवर सशस्त्र

पोलिसांचा पहारा बसला. त्यांच्या जोडीला अरबांचे एक खाजगी पथक तैनातीला देण्यात आले. अरबांना या भागात चाऊस म्हणतात. ही चाऊस मंडळी दडपशाही करीत गावातून फिरू लागली. संशयित कार्यकर्त्यांना पोलीसठाण्याच्या वाऱ्या कराव्या लागू लागल्या. लोक हैराण होऊन गेले. कटवाल्यांचा प्लॅन उधळला गेला. यावेळी हे लोक उमरी जवळच्या डोंगरात जमले होते. त्यांनी ऑपरेशन स्थगित करण्याचा निर्णय घेतला आणि जड मनाने लोक पांगले.

सरकारचा बंदोबस्त एवढ्यावरच थांबला नाही. क्रांतिकारकांचा तळ मध्यप्रांतातील उमरखेडनजिकच्या देवसरीला असल्याचे त्यांना माहीत होते. लुटालूट झालीच तर लुटारूलोक देवसरीच्या दिशेनेच पळणार हे त्यांनी हेरलें होते. त्याला तोंड देण्यासाठी उमरी ते देवसरी दरम्यान घोडदलाची पथके पेरण्यांत आली. उमरीची सर्वबाजूंनी कोंडी करण्यात आली. याप्रकाराने वातावरण कमालीचे तंग झाले. कित्येक व्यापाऱ्यांनी घाबरून बँकेतून रकमा काढून घेतल्या.

झाल्या प्रकाराचा क्रांतिकारकांनी योग्य तो बोध घेतला. त्यांनी आपल्या सर्व हालचाली एकदम थांबविल्या. ते जागच्याजागी गप्प झाले. बरेच दिवस लोटले आणि बँक लुटीची बातमी केवळ अफवाच असावी अशी सरकारची खात्री होऊ लागली. त्याचा परिणाम म्हणून पहाऱ्यात ढिलाई पडू लागली. बरेच सशस्त्र पोलीस काढून घेण्यात आले. कार्यकर्त्यांवरील नजर कमी झाली. मात्र उमरी ते देवसरी दरम्यानचो घोडदलाची गस्त चालूच राहिली.

वातावरण शांत होताच बँक लुटीची योजना पुन्हा तपासून पाहाण्यात येऊ लागली. वर सांगितल्याप्रमाणे आनंदराव हे धीरगंभीर गृहस्थ होते. तर रघुनाथराव रांजणीकर सेनापती. त्यांना नागनाथराव परांजपे, साहेबराव यांच्यासारख्या तरुणांची जोड. श्री. आबासाहेब देशमुखांकडे आज पाहिले तर त्यांनी कधी शस्त्र हाती घेतले असेल असे वाटणार नाही एवढा त्यांचा स्वभाव सौम्य व मृदु आहे. त्यांच्याखेरीज धनजीभाई, दिगंबरराव पतेवार, शंकरलाल व मोहनलाल शर्मा, ही मंडळी तागडी टाकून तलवार हाती घेऊन सिद्ध होती. किशोर शहाणे, रघुनाथ, जगदीश बाबूराव कुंटुरकर आदि पोरवयाची मंडळीही होती.

कार्यक्रमाची आखणी अशी होती :

कार्यक्रम : ऑपरेशन उमरी बँक.

स्थळ : उमरी, स्टेट बँक ऑफ हैद्राबाद शाखा.

उद्देश : बँक लुटणे, आडवे येणाऱ्यांना ठार करणे, पैसा सरहद्दपार पोचविणे.

तारीख : सोमवार दिनांक ३० जानेवारी १९४८.

वेळ : सायंकाळी ४।। वाजता.

पद्धती : एकूण सहा तुकडयात १७२ सैनिक. यांपैकी ३ तुकड्या उमरीत व ३ तुकड्या बाहेर.

**तुकडी पहिली :** उमरी बँकेवर हल्ला. एकूण सैनिक २१. त्यांतील १२ जणांनी मोंढयाच्या मोक्याच्या जागा रोखाव्यात व बाकीच्यांनी बँकेवर धाड घालावी. या तुकडीत अनंतराव, आबासाहेब, साहेबराव, किशोर, बन्सीलाल तोलगीवाले, धनजीभाई, रघुनाथ यांचा समावेश असेल.

**तुकडी दुसरी :** पोलीस स्टेशनवर हल्ला. एकूण सैनिक १५. त्यांचे नेतृत्व श्री. रघुनाथराव रांजणीकर, नागनाथ परांजपे, भीमराव लहानकर इत्यादींचा समावेश.

**तुकडी तिसरी :** रेल्वेस्टेशनवर हल्ला करणे. तीत १५ जणांचा समावेश असेल. नेतृत्व श्री. बाबूराव कुंटुरकर यांचेकडे. त्यात श्री. मोहन शर्मा, जगदीश हैद्राबादी, मनोहर विरसणीकर यांचा समावेश असेल.

**तुकडी चौथी :** कामगिरी शहराबाहेर. नेतृत्व श्री. राजाराम देशमुख बारडकर. एकूण संख्या ५१. उद्देश-उमरी ते धर्माबाद रेल्वे, तार व इतर दळणवळण तोडणे.

**तुकडी पाचवी :** एकूण सैनिक ३५. उद्देश उमरी ते नांदेड दळणवळण तोडणे.

**तुकडी सहावी :** एकूण सैनिक ३१. नेतृत्व श्री. लक्ष्मण पाटील लोहगावकर. उद्देश-उमरी ते बिलोली संपर्क तोडणे.

याखेरीज श्री. काशीनाथ शेट्टी यांनी निरोप्याचे काम करावे.

ऑपरेशन पद्धती. प्रथम सहावी नंतर पाचवी...शेवटी पहिली तुकडी या क्रमाने कामगिरीपूर्ण करावी.

ऑपरेशनचा कार्यक्रम याप्रमाणे काटेकोरपणे आखण्यात आला. सर्व लूट नेत्यांच्या देखरेखीत जमा झाली पाहिजे असे ठरविण्यात आले होते. सर्वांनी प्रामाणिकपणाच्या शपथा घेतल्या होत्या. कुणी कुचराई केली तर दुसऱ्याने त्याला सरळ गोळी घालावी असे ठरले होते.

आता एक उपप्रकरण निर्माण झाले. ते म्हणजे पलायनाच्या मार्गावर असलेल्या घोडदलाचे लक्ष विचलित कसे करावयाचे हे. त्यासाठी दोन छोटयाशा मोहिमा हाती घेण्याचे ठरले. या मार्गाच्या पश्चिमेस हदगाव तालुक्यात तळणी हे जहागिरीचे गाव आहे. तेथील लोकांना लेव्ही वसुलीच्यानिमित्ताने फार त्रास देण्यात येत होता. म्हणून या गावावर हल्ला करण्याचा बेत आखण्यात आला. हा हल्ला मुख्य ऑपरेशनच्या ५।६ दिवसाआधी करण्याचे ठरविण्यात आले. या हल्ल्याची जबाबदारी स्वत: श्री. रघुनाथराव रांजणीकर ऊर्फ नायबराव यांनी घेतली. नागनाथ परांजपे, साहेबराव आणि आणखी एक व्यक्ती असे चौघेजण तळणीला रवाना झाले. नागनाथरावांजवळ स्टेनगन होती. तर इतराजवळ रायफली. सायंकाळच्या कातरवेळी त्यांनी पोलीस ठाण्याजवळील एका उंचवटयाच्या जागी मोर्चा बांधला व इशारा मिळताच एकदम गोळीबार सुरू केला. खाना पकविण्याच्या गडबडीत असलेल्या पोलिसांवर आकस्मात झालेल्या हल्ल्याने ते गडबडून गेले. पहिल्या वर्षावातच ४।५ जण खाली कोसळले. त्यातले मेले किती व केवळ जखमी झाले

किती ते मात्र समजले नाही. पाच मिनिटे भडिमार करून हल्लेखोर अंधारात पसार झाले.

सगळीकडे एकच गोंधळ उडाला. तोबा तोबा, गनिम इधरसे आया, किधर गया ? धावाधाव सुरू झाली. तोवर ही तुकडी सुरक्षित जागी पोचली होती. अंधारात परतताना नायबरावांच्या पायाला ज्वारीचे धसकट लागले. वेगळया प्रकारे जखमी झालेले हे वीर पेणगंगा पार करून कँपवर सुरक्षित पोचले.

यानंतर लगेच हल्लेखोरांनी उमरी पोलीस स्टेशनच्या हद्दीत एका आडवळणाच्या खेडयात मारामाऱ्या घडवून आणल्या. दोन्ही हल्ल्यांचा योग्य परिणाम झाला. सर्वत्र खळबळ माजली. नांदेडच्या पोलीस खात्याने तर थैमान घातले. गस्तीवरील घोडदळ काढून तळणीला पाठविलं गेलं. उमरीचे अमीनसाहेब (फौजदार) जातीनं आडवळणाच्या खेडयात तपासाला गेले. उमरी ठाण्यातील पोलिसांची संख्या रोडावली तर दुसरीकडे मार्गही मोकळा झाला.

परंतु क्रांतिकारकांचे दुर्दैव अजून संपले नव्हते. हल्ल्याचा दिवस जवळ येऊ लागला आणि धसकटीने चिरलेला रांजणीकरांचा पाय अस्सा सुजून आला. जखम चिघळून पू झाला. आता नायबरावांना हल्ल्याचे नेतृत्व करता येणे शक्य नव्हते. सर्व हल्लेखोरांत पूर्वी शस्त्र चालविण्याचा अनुभव असलेले ते एकटेच सैनिक होते. पण दैवाने दावा साधला होता. आपल्याला ऑपरेशनमध्ये सहभागी होता येणे अशक्य आहे हें लक्षात येताच तो वीर पुरुष अक्षरशः मोठयाने रडला. पोलीसठाण्यावरील हल्ल्याचे नेतृत्व नागनाथराव परांजप्याकडे गेले.

अखेरीस नायबरावांना देवसरीलाच ठेवून हल्लेखोरांचा ताफा वेगवेगळया मार्गाने उमरीजवळील कामणगावच्या टेकडीजवळ जमला. कामाची उजळणी झाली. चौथी, पाचवी व सहावी या तुकडया परस्पर कामावर रवाना झाल्या.

होश्यार ! तैय्यार ! ४।। बजे ऑपरेशन शुरू होगा.

हल्लेखोरांच्यापूर्वी आपण उमरीत येऊ.

उमरी ही कापसाची मोठी पेठ. धान्य, कापूस यांच्या बाजारपेठेस इकडे मोंढा म्हणतात. उमरीच्या मोंढयाला चारीबाजूंनी वेशी आहेत व आत टॉवरबाग आहे. तटाच्या आत अडत्यांची दुकाने आहेत. त्यातच उजव्या कोपऱ्यात बँकेची इमारत होती. ३० जानेवारीस शुक्रवार होता. निदान दीड ते दोन हजार बैलगाडया व शेकडो उंटावर लादलेला कापूस आला होता. मोंढयांत सर्वत्र बैल गाडयांचा तळ पडला होता. कापूस विकून खिसे गरम झालेले शेतकरी मोंढयात फिरत होते. कुणाची खरेदी चालली होती तर कुणी हॉटेलात रमले होते. अशावेळी दोन बैलगाडया गर्दीतून वाट काढीत दुपारी पुढे सरकू लागल्या. दोन्ही गाडयांत कापसाच्या रिकाम्या बोंदऱ्या होत्या. गाडया होत्या थेरबनच्या. दोन्ही गाडीवाल्यांना बँकेच्या दारासमोरच जागा मिळाली. त्यांच्या चेहऱ्यावर हसू उमटले. बैल बाजूला बांधून दोघेही गाडीतच आडवे झाले.

३–३॥ वाजले तसतशी वर्दळ वाढू लागली. मुंडासे बांधलेली ' शेतकरी मंडळी ' येडचागबाळसारखी बँकेच्या दाराजवळ घोटाळू लागली. अरब लोक त्यांना शिव्या घालून हाकलू लागले. ओशाळले हसू करून हे लोक दूर जात व मेजवानीच्या दारा-जवळ भिकाऱ्याने घोटाळावे तसे पुन्हा तेथेच रेंगाळू लागत. आजूबाजूलाही बरेच ' शेतकरी ' होते. कुणी मिठाई खात होते तर कुणी दाढी करवून घेण्यासाठी ' ओपन हेअरकटींग सलून 'च्या चवाळ्यावर मांड ठोकून बसले होते.

बँकेसमोर दोन हॉटेले होती. एक हिंदूंचे तर दुसरे मुसलमानाचे. हिंदू हॉटेलात दोन मुंडासेवाले शिरले. एक होता किशोर शहाणे तर दुसरा साहेबराव देशमुख. पुढील ऑपरेशनमध्ये दोघांनाही मोठी महत्त्वाची कामगिरी बजवावयाची होती. परिस्थितीचा भयंकर ताण त्यांच्या मनावर पडला होता. मन स्थिरावे म्हणून त्यांनी खारा मागविला पण तो खाववेना. मिठाई मागविली पण तीही गोड लागेना. चहा-वर वासना राहिली नाही. केवळ पाणी पिऊन त्यांनी आपल्या पटक्याच्या शेवाने चेहऱ्यावरील घाम पुसला.

आणि समोरचे दृष्य पाहाताच घामाचा लोट पुन्हा सुरू झाला!

नांदेडचा एक चाऊस शेजारच्या मुसलमान हॉटेलच्या खुर्चीवर अंगणात येऊन बसला होता. त्याला पाहाताच साहेबरावांचे धाबे दणाणले. तो चाऊस साहेबरावाला चांगलाच ओळखत होता. आता साहेबरावाने वेषांतर केले होते ही गोष्ट वेगळी. पण वेषांतर म्हणजे नाटक-सिनेमातील बेमालूम नव्हे. केवळ मुंडाशाने माणूस बदलतो असे थोडेच आहे? त्याने साहेबरावांना ओळखले तर सारा डाव उधळला जाण्याची शक्यता होती.

–पण दैव यावेळी त्यांच्या बाजूला होते.

दारू पिऊन मस्त झालेला तो चाऊस आपल्याच धुंदीत होता. एका बोटावर खुर्ची तोलून दाखवून आपल्या कौशल्याचे तो लोकांसमोर प्रदर्शन करीत होता. त्यातच गाण्याच्या स्वैर लकेरीही सोडत होता.

साहेबराव किशोरला हळूच म्हणाले,

' बघ, हा चाऊस किंवा मी...आज कुणांच्या हातून कुणीतरी ठार होणार! आज कुणाचा शेवटचा दिवस आहे हे देवाला ठाऊक पण कुणाचीतरी घटका भरली अशी माझी मनोदेवता नक्की सांगते.

चार वाजले!

दुसरी आणि तिसरी तुकडी कामगिरीला निघाली. तिसऱ्या तुकडीने रेल्वे स्टेशनवर मोर्चा वळविला. सर्व वीर एकदम स्टेशनमास्तराच्या केबिनमध्ये शिरले. दोन गोळ्या उगाच झाडल्या. कागदपत्रे गोळा करून त्यावर पेट्रोल ओतले. यंत्र-सामग्रीची मोडतोड केली. या गडबडीत स्टेशनमास्तरने खिडकीद्वारे सूबाल्या केला. हल्लेखोर प्लॅटफॉर्मवर आले. बाबूराव कुंटुरकरांने पोलवर चढून तारा कापल्या.

इतरांनी रूळांवर जिलेनाइट कब्ज लावून त्यांचा स्फोट केला. हे होत असताना एक वेगळाच प्रकार झाला. रेल्वे कॉलनी जवळच होती. कॉलनीतील लोकांना वाटले, भुरट्यांचा हल्ला असावा. म्हणून ते हातात मिळेल ती वस्तु घेऊन स्टेशन-कडे जमावाने येऊ लागले. आता बाका प्रसंग आला. आपल्याच लोकांच्या हातून मरण ओढवले. एवढ्यात त्यांना युक्ती सुचली. हल्लेखोरांनी भारतमातेचा जय-जयकार केला. त्याबरोबर लोकांना खरा प्रकार उमगला व ते जागेवरच थांबले. मात्र करोडगिरीचा (कस्टम) एक जवान हातात बंदुक घेऊन पुढे पुढे येत होता. मनोहरने त्याच्या दिशेने हातबॉम्ब फेकला. त्याचा स्फोट होताच तो जवान पाठीला पाय लावून पळत सुटला. या गडबडीत हल्लेखोरही गर्दीत मिसळून बँकेकडे रवाना झाले ! एक हल्ला यशस्वी झाला.

याच वेळी उमरी पोलीस ठाण्यावर दुसऱ्या तुकडीने हल्ला केला होता. परांजपे, भीमराव आदिकांनी अचानक ठाण्याला गराडा घातला. पहिल्याच फेरीत संत्र्याला लोळविले. आतील पोलिसांनी पोझिशन्स घेण्यापूर्वीच त्यांच्यावर गोळ्यांचा वर्षाव झाला. कुणी जखमी झाले तर कुणी ठार. काहीजण कुंपणावरून उड्या टाकून पळाले. हल्लेखोरांनी सर्व शस्त्रे गोळा केली.

इकडे सर्व पोलिसांची गठडी वळणे पूर्ण होतें न होते तोच काशीनाथ शेट्टी बँकेकडे धावला. तेथे त्याला कुणीच दिसेना. कुठे आहेत अनंतराव, कुठे साहेबराव ? तो गांगरला. पण वेळ घालवून चालणार नव्हते. तो तेथूनच ओरडला,

'अनंतराव...! काम फत्ते !'

आणि त्याच्या कानाजवळच बंदुकीचा काडकन बार झाला. खुणेचा आवाज ऐकताच भोवतालचे 'शेतकरी' ताडकन उभे राहिले. कुणाच्या तोंडात मिठाईचा तोबरा भरलेला होता, तर कुणाची दाढी अर्धवट झाली होती. कुणी मुंडासे बांधत होता तर कुणी कुडत्याच्या गुंड्या लावत होता. खऱ्या-खोट्या शेतकऱ्यांचा एकच कालवा झाला असताना अनंतराव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पुढे धाव घेतली. दाराजवळ सोडलेल्या बैलगाड्यांतील बोंदऱ्या उडविण्यात आल्या. त्याखाली लपविलेल्या रायफली खेचून हल्लेखोर दरवाजाकडे पळू लागले. अनंतराव, साहेब-राव, आबासाहेब, मल्लिकार्जुन बर्डे, किशोर, बंशिलाल तोष्णीवाल, रघुनाथ आदि मंडळी आत शिरली. दिगंबरराव उत्तरवार यांनी स्टेनगन् घेऊन मुख्य वेस रोखून धरली.

काय घडले हे पहारेकऱ्यांच्या लक्षात येण्यास वेळ लागला नाही. त्यांनी मोर्चे सांभाळून गोळीबारास सुरुवात केली. परंतु दोन-तीन पहारेकऱ्यांचे मुडदे पाडून लोक आत घुसले. मॅनेजर घाबरला होता. त्याला किल्ल्या मागितल्या. त्याची भीतीने बोबडी वळली होती. त्याने निमूटपणे किल्ल्या हवाली केल्या. बाकीच्या किल्ल्या कॅशियरजवळ होत्या. गिरगावकर नावाचे गृहस्थ कॅशियर होते. किल्ल्या



काय होत आहे हे कळण्यापूर्वीच...

मागताच त्यांनी वेगळीच चाल सुरू केली. गिरगावकर नांदेडचेच होते व हल्लेखोरांपैकी काहीजणांना त्यांनी ओळखले होते. ही माणसे आपल्याला काही करणार नाहीत या समजुतीने त्यांना धीर आला होता. 'मजजवळ पैसे नाहीत...तुम्ही एवढे धन नेणार मग मला किती वाटा देणार...?' अशी त्यांनी चर्चा सुरू केली. यात त्यांचा खरोखर वाटा मागण्याचा हेतू होता, की कुमकेची वाट पाहात वेळ काढण्याचा डाव होता हे आज सांगता येणार नाही. पण त्यांची चाल पाहाताच आबासाहेब देशमुखांनी पुढे होऊन त्यांना गोळी घातली.

अरब रक्षकांपैकी एकजण वरच्या मजल्यावर गेला. मॅनेजरचे तेथेच राहणे होते. आतून कडी लावून त्याने खिडकीतून अंधाधुंद गोळ्या झाडण्यास प्रारंभ केला. पण समोर पिंपळाच्या आड मोर्चा लावलेल्या शंकरलाल शर्माने त्याला बरोबर टिपले. झाडावर चढून बसलेल्या दोन अरबांनाही कुणीतरी गोळ्या झाडून खाली पाडले. इकडे मघाचा खुर्चीचा खेळ करणारा चाऊस जखमी झाला होता. एका टेबलाच्या खाली दडून त्याने गोळ्या झाडण्याची पोज घेतली. तोच साहेबराव त्याच्या मागे पोचले. चाऊसाची लुंगी धरून त्याला बाहेर खेचले व गोळी घातली, मनोवांछित पूर्ण झाले !

इकडे धनजीभाईंनी मोंढ्यातून रिकामी बारदाने आणली होती. त्यात भराभर नोटा कोंबण्यास सुरुवात झाली. पायांनी तुडवून पोती गच्च भरण्यात आली. बंदे रुपये व चिल्लर नाणी ओझे नको म्हणून तेथेच टाकून दिली. सर्व लूट बाहेर आणताच मोंढ्यातील अठरा गाड्या पकडण्यात आल्या. शेतकऱ्यांनी खरिदलेला त्या गाड्यातील गूळ, ज्वारी आदि माल फेकून देण्यात आला. त्यावर सर्व लूट लादून वीर निघाले. रझाकार व पोलिसांनी आधीच धूम ठोकली होती. हल्लेखोर

आता निर्भय झाले. लोकांनी त्यांची अपूर्व मिरवणूक काढली. मिरवणुकीच्या आघाडीला एका खानसाहेबांच्या लुटलेल्या घोड्यावर एक वीर बसला होता. बंदुकीचे काड् काड् आवाज करीत व हुतात्मा उत्तरवार व हुतात्मा पानसरे यांचा जयजयकार करीत मिरवणूक वेशीबाहेर पार पडली. त्यावेळी सूर्य देवांनी क्षितिजाखाली बुडी मारली होती.

बाहेरच्या तुकड्यांनी तारा व सडकांची तोडमोड केल्याने फारच फायदा झाला. एका इसमाने मुदखेडपर्यंत पायी धावत जाऊन पोलीसांना या दुर्घटनेची खबर दिली. तेथून ही वार्ता नांदेडला पोचण्यास मध्यरात्र उलटून गेली. रेल्वेमार्ग विस्कळीत झाला होता व पक्की सडक तर नव्हतीच. शेवटी पहिली तुकडी कशीबशी उमरीला दुसरे दिवशी पोचली. तोवर लुटीचे धन घेऊन ते लोक पेणगंगेच्या पैलतीरावर सुरक्षित जागी पोचले होते. तेथे त्यांनी प्रत्येक गाडीवाल्यांला ५००।५०० रुपये व मालाची नुकसान भरपाई दिली. या लोकांनीही ऑपरेशनला एक प्रकारे मदतच केली होती की !

मंडळी उमरखेडला पोचली तेव्हा तेथे शोकाकुल वातावरण दिसून आले. हे क्रांतिवीर बँकेवर छापा घालीत होते, बरोबर त्याचवेळी दिल्लीत बापूजींवर गोळ्या झाडण्यात आल्या होत्या. सारा देश शोकात मग्न झाला होता. मुंबई इलाख्याचे हरिजन मंत्री श्री. गणपतराव तपासे यांच्या नेतृत्वाखाली पुसदला हरिजनांचा मंदिर प्रवेश होता. तो कार्यक्रमही रद्द करण्यात आला. जड अंतःकरणाने ही मंडळी पुसदला पोचली. श्री. गोधाजीराव मुखदे यांच्या घरी ती लूट नेण्यात आली. एका मॅजिस्ट्रेटसमोर त्याची मोजणी करता ती २० लाख ६५ हजारांची भरली ! (आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असलेले श्री. वसंतराव नाईक हे गोधाजीरावांच्या हाताखाली त्यावेळी राजकारणाचे धडे घेत होते. मोजणीच्यावेळी तेही बंगल्यात होते. पण रक्कम मोजली जात होती तेथे त्यांना प्रवेश मिळाला नव्हता.) बहुतेक रक्कम हाली (हैद्राबादी) चलनात होती. गोधाजीरावांनी सर्व रक्कम आपल्या कारमध्ये दडविली आणि अकोला, जळगाव, नगर मार्गे निजाम संस्थानाला निम्मा अधिक वळसा घालून ही लूट सोलापूरला नेण्यात आली. तेथे रक्कम पुन्हा मोजून ती श्री. फूलचंद गांधी, बाबासाहेब परांजपे, श्यामराव बोधनकर, गोविन्दभाई श्रॉफ यांच्या हवाली केली. नंतरच्या मोजणीत १६५ रुपये कमी आले !

येथून हैद्राबाद मुक्तिसंग्रामाच्या एका टप्प्याचा शेवट होऊन संगर पर्वाला सुरुवात होते. लुटीचा पैसा वरील लोकांच्या हवाली केल्यावर क्रांतिकारकांचे काम संपले. या मोहिमेसाठी केवढा आटापिटा करावा लागला होता. प्रत्यक्ष मोहिमेत कॅशियर, पोलीस, अरब व रझाकार मिळून ११ जण ठार झाले. क्रांतिकारकांपैकी देवराव पळशीकर या एकाच वीराला दडातून आरपार गोळी लागली. मोंढ्यातील जमावापैकी दोघेतिघे बघ्ये जखमी झाले. पावणे एकवीस लाखांच्या प्रचंड लुटीच्या

मानाने ही धाडशी मोहीम फारच स्वस्तात पार पडली !

या प्रचंड रकमेचे पुढे काय झाले ? बऱ्याच रकमेचे कटदार नाण्यांत रूपांतर करण्यात आले. उरलेली हाती रक्कम 'आत' कामे करण्यासाठी वापरण्यात आली. कटदार पैश्यातून मुंबई, पुणे, जबलपूर, मद्रास व बंगलोर येथून शस्त्रे खरीदण्यात आली. सरहद्दीवरील कँप्सच चालविण्यात आले. साप्ताहिक मराठवाडा हे हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसचे अधिकृत मुखपत्र होते. त्यासाठी पुण्याला एक इमारत बांधून 'मराठवाडा'चे मुंबईहून पुण्याला स्थानांतर करण्यात आले. १४ सप्टेंबरला पोलीस कारवाई झाली तेव्हा लुटीतील ७ लाखांची रक्कम शिल्लक होती. स्वातंत्र्यानंतर लुटीतील थोडा वाटा नांदेड जिल्हा कॉंग्रेस कमिटीला मिळाला. त्यातून कॉंग्रेस भवन बांधण्याची कल्पना होती. ती मूर्त स्वरूपात आली नाही. रक्कम मात्र संपून गेली. थोड्या रकमेतून नांदेड, कंधार, हदगाव येथे विचार विकास मंदीर नावाने वाचनालये काढण्यात आली. उरलेली रक्कम हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसचे माडपाटी रामचंद्रराव व जनार्दनराव देसाई यांच्या हवाली केली. त्यातून त्यांनी ३ लाख रुपये हैद्राबादच्या खादी ग्रामोद्योग संघाला दिले म्हणतात.

दै. मराठवाडा या लुटीच्या पैश्यावर उभारला गेला अशी लोकांची समजूत आहे. खरी घटना थोडी वेगळी आहे. पूर्वी आ. कृ. वाघमारे, वैशंपायन, अनंतराव भालेराव हे मराठवाडा साप्ताहिक स्टेट कॉंग्रेसचे मुखपत्र म्हणून चालवीत. हैद्राबाद सरकारने बंदी घातल्याने ते मुंबईहून प्रकाशित होऊ लागले. ऑपरेशन उमरीनंतर पुण्याला बिल्डिंग बांधून त्यात त्याचे स्थानांतर झाले हा इतिहास वर आलाच आहे. विमोचनानंतर 'मराठवाडा'चे हैद्राबादला स्थानांतर झाले व पुण्याची इमारत सर्व सेवासंघाला दान करण्यात आली. पुढे कॉंग्रेसमध्ये फाटाफूट झाली तेव्हा मराठवाड्याचे सर्व संचालक कॉंग्रेस बाहेर पडून 'लीग ऑफ सोशलिस्ट वर्कर्स'मध्ये गेले. 'मराठवाडा' कुणी ताब्यात घ्यावा यावर वाद झाला. यावर तोड म्हणून संचालकांनी ३४ हजार रुपये भरून 'मराठवाडा' व 'जयहिन्द प्रेस' विकत घेतला व त्याचा कॉंग्रेसशीसंबध तुटला. आजच्या दैनिक मराठवाड्याच्या प्रगतीला बँकेची रक्कम कामी आली हा समज चुकीचा असल्याचे यावरून दिसेल.

बँक लुटीच्या रकमेचा संपूर्ण जमाखर्च आत्ताही संबंधिताजवळ सुस्थितीत आहे. पहिल्यापासून अखेरपर्यन्त ही रक्कम विश्वासपात्र व्यक्तींनी हाताळली. पुण्याला अधिकृत ऑडीटरकडून तिचे हिशेब तपासून वल्लभ भाईंना तिची प्रत दिली होती. प्रवासातील १६५ रुपयांचा फरक सोडता एक पैची रक्कमही इकडे तिकडे झाली नाही. क्रांतीकारकांपैकी कित्येक जण पुढे हलाखीत मेले, कुणी आताही हलाखीत अहेत. पण रक्कम वैयक्तिक भलाईसाठी वापरण्याचे कुणाच्या मनातही आले नाही. एवढी मोठी मोहीम अगदी निष्कलंकपणे इतिहासाचा भाग बनली आहे.

उमरी बँक प्रकरण येथे संपते. स्वातंत्र्य युद्धात ज्यांनी आपला वाटा उचलला व

जे लोक एकेकाळी जनतेच्या गळ्यातील ताईत झाले होते ते आज काय करीत आहेत हे जाणण्याची बऱ्याच जणांची इच्छा असेल. त्यातील काहीजण आजही प्रसिद्धीच्या झगमगाटांत आहेत तर काहीजण गतविस्मृत झाले आहेत.

श्री. धनजीभाई पुरोहित यांनी काँग्रेससाठी आपले घरदार विकले होते. पुढे त्यांना विपन्नावस्था आली. ऊमरी बँकेचे लाखो रुपये हाती येऊनही त्यांनी तोंडचाचा लोभ धरला नाही. ५।६ वर्षांपूर्वी ते विकलांग अवस्थेत हिस्सार जिल्ह्यात (हरियाना) आपल्या जन्मगावी गेले. आज ते हयात आहेत की नाहीत हेही ठाऊक नाही. काशीनाथ शेट्टी लीग ऑफ सोशॅलिस्ट वर्कर्स पक्षाच्या विसर्जनानंतर कम्युनिस्ट पक्षात गेला आणि दारिद्र्य व आजाराशी झगडताना दोन वर्षांपूर्वी वारला. शंकरलाल शर्मा ४ महिन्यांपूर्वीच ऊमरीला कर्क रोगाने वारले. रघुनाथ हा तरुण आपल्या हसतमुख वागणुकीने सर्वांना प्रिय झाला होता. त्याला क्षयाने ग्रासले. श्री. फूलचंद गांधी हैद्राबादचे मंत्री झाल्यावर त्यांनी रघुनाथला आपल्याजवळ ठेवून उपचार करविले पण तो वाचू शकला नाही. नागनाथ परांजपे यांनी शिक्षण पूर्ण करून वकिली सुरू केली. नांदेड नगरपालिकेतही आघाडीतर्फे निवडून आले. पण पुढे दुर्धर रोगाने ग्रासल्याने आज सर्व व्याप सोडून घरी बसून आहेत. श्री. दिगंबरराव उत्तरवार आदि मंडळी पुन्हा व्यापारात शिरली. श्री. रघुनाथराव रांजणीकर प्रथम ली. सो. वर्कर्स ( L.S.W. ) मध्ये व नंतर प्रसोपात गेले. आज ते राजकारण सोडून अध्यात्मात रंगले आहेत. श्री. अनंतराव भालेराव हेही L. S. W. नंतर समाजवादी पक्षाकडे वळले. आज ते समाजवादी पक्षाचे विचारवंत नेते म्हणून व दैनिक मराठवाड्याचे संपादक म्हणून ख्यातनाम आहेत. श्री. साहेबराव देशमुख व आबासाहेब देशमुख प्रथमपासून अखेरपर्यंत काँग्रेसलाच चिकटून आहेत. साहेबराव आज नांदेड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष तर आबासाहेब नांदेड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष व विधानपरिषदेचे सदस्य आहेत.

या मोहिमेतील इतर वीरांची फारशी माहिती नाही. त्यांचे काय झाले ते परमेश्वरालाच ठाऊक. निदान त्याच्या दरबारी तरी या वीरांच्या कार्याची व त्यागाची नोंद असेल अशी अपेक्षा.

श्री. ज. जोशी

पुस्तके

# उपेक्षित द्रष्टा

र. धों. कर्वे यांच्याबद्दल लिहिताना श्रीमती शकुंतला परांजपे यानी म्हटले आहे. 'He was a great man – as great as his father.' त्यांच्या एकाहत्तराव्या वाढदिवसाच्या निमित्ताने न्यायमूर्ती छगला यांचे अध्यक्षतेखाली त्यांचा सत्कार करण्यात आला त्यावेळी छगला म्हणाले, 'The birth control clinics in the rural areas were as essential as, if not more essential than – primary schools and dispensaries.'

त्यांच्या मृत्यूनंतर टाईम्सने श्रद्धांजली वहाताना म्हटले, 'He learnt the noble example of suffering for a good cause, from his illustrious father, Prof. D. K. Karve'

समाजस्वास्थ्यकर्ते र. धों. कर्वे यांच्याविषयी लिहिता बोलताना त्यांच्या ख्यातनाम वडलांची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. महर्षींच्या कार्याला प्रथम विरोध झाला. परंतु त्यांना कोणी महारोग्या सारखे वाळीत टाकले नाही. त्यांच्याबद्दल अपशब्द फारसे कोणी बोलले नाही. महर्षींनी स्वतःच्या कार्याचा जय झालेला याची देही याची डोळा अनुभवला. विधवा-विवाह आणि स्त्री शिक्षण हे महर्षींचे ध्येय होते. अगदी कट्टर सनातन्यांखेरीज त्या ध्येयाला कोणाचा विरोध असण्याचे कारण नव्हते. परंतु संततिनियमन आणि गुप्त रोगापासून बचाव, या गोष्टींबद्दल कार्य करण्याचे असिधारा व्रत घेतलेल्या र. धों. कर्व्यांना मात्र आपल्या आयुष्यात प्रचंड वादळाला तोंड द्यावे लागले. धगधगत्या निखाऱ्यांवरून चालण्यात त्यांचा सारा जन्म गेला. टाईम्सने किंवा शकुंतलाबाईंनी र. धों. ना आण्णांचे सुपुत्र म्हणून गौरवले असले तरी मराठी समाजाने त्यांना बराच काळपर्यंत सूर्यापोटी शनेश्वरासारखेच वागवले.

रघुनाथराव कर्वे यांचा जन्म १८८३ साली जुन्या पद्धतीच्या ब्राह्मणी कुटुंबात झाला. त्यांनी १९२१ सालापासून संततिनियमन या विषयाला वाहून घेतले, १९२७ साली त्यांनी समाजस्वास्थ्य हे लैंगिक विषयाला वाहिलेले मासिक सुरू केले. अनेक आपदा सोसून आणि लोकनिंदा सहन करून मृत्यूपर्यंत त्यांनी ते मासिक एकट्याच्या बळावर चालवले.

रघुनाथरावांचा स्वभाव मनस्वी होता. देवभोळेपणाला त्यांच्याजवळ मुळीच वाव नव्हता. ते अपमान सहन करू शकत नसत किंवा एखाद्या विषयावर मत देताना कुणाचा मुलाहिजाही ठेवत नसत. या स्वभावामुळेच त्यांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. एल्फिस्टन कॉलेजात सरकारी नोकरी होती ती त्यांनी अशाच तिरिमिरीत सोडली. नंतर विल्सनमध्ये नोकरी करीत असताना त्यांनी उघडपणे संततिनियमनाचा प्रसार करण्यास सुरुवात केली. असले ' उद्योग ' विल्सनच्या अधिकाऱ्यांना मान्य होणे शक्य नव्हते. ' एक तर हे सर्व सोडून द्या. नाहीतर कॉलेजमधील आपल्या नोकरीचा राजिनामा द्या. ' असे त्यांनी रघुनाथरावांना बजावताच ते त्यागपत्र देऊन बाहेर पडले; आणि पुढे सर्व काळ संततिनियमनाचा प्रचार करीत राहिले. मृत्यूपर्यंत दारिद्र्याने त्यांना सोडले नाही. शेवटी शेवटी तर स्वतःच्या अपमानास्पद जिण्याचा कंटाळा येऊन आत्महत्या करण्याचाही त्यांच्या मनात विचार आला. परंतु हितचिंतकांनी त्यांना सहा हजार रुपयांची देणगी दिली आणि तसे घडले नाही. त्या काळाबद्दल शकुंतलाबाई परांजपे म्हणतात, ' His latter years were spent in want. He was too proud to live with his relations and friends and I know he had secured a lethal table or two from some where. '

स्वातंत्र्यानंतर भारतात संततिनियमनाला सरकारी पाठिंबा मिळाला आणि त्या दृष्टीने खेडोपाडी प्रचार होण्यास सुरुवात झाली. हल्ली तर तो प्रचार किळस येण्याइतका भडक झालेला आहे. परंतु पन्नास वर्षांपूर्वी कुणाचाही पाठिंबा नसताना सनातनी हिंदू समाजात तसा प्रचार करण्याचे धारिष्ट करणे किती अवघड होते याची सहज कल्पना येईल. लिंग शास्त्राबद्दल आपल्या समाजात उघड बोलण्याची चोरी होती. कुलस्त्रीयांनी तर त्या विषयाचा उच्चारदेखील करायचा नाही असा दंडक होता. लैंगिक उपभोग घेऊनही संततीला निरोध करणे ही गोष्ट परमेश्वरा विरुद्ध केलेला गुन्हा ठरे. अशा काळात स्वैर संभोगाचा, गुप्त रोगांच्या प्रतिबंधाचा किंवा नग्नसंघाचा पुरस्कार करणारा माणूस अलौकिकच म्हटला पाहिजे. श्री. र. धों. कर्वे हे एका दृष्टीने युगपुरुष ठरतात. परंतु त्यांची माहिती आजच्या तरुण पिढीला नाही. आज बहुतेक घरात दोन किंवा तीनच मुले दिसतात व पतिपत्नी मजेत राहातात. कुटुंब जीवनात हे सुख ज्या महापुरुषाने प्राप्त करून दिले त्याचे नावही आजच्या तरुण तरुणींना ज्ञात नाही.

श्री. दिवाकर बापट हे तरुण लेखक आहेत. त्याना र. धोंच्या कार्याविषयी आणि जीवन चरित्राविषयी औत्सुक्य निर्माण व्हावे आणि त्यांनी परिश्रमपूर्व ' उपेक्षित द्रष्टा ' या नावाचे त्यांचे चरित्र लिहावे ही कौतुकाची गोष्ट आहे. श्री. र. धों. कर्वे हे तसे फार अबोल गृहस्थ होते. समाजात मिसळण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता.

त्यामुळे त्यांच्याविषयीच्या सुरस आठवणी आणि आख्यायिका मिळवणे कठीण होते. समाजस्वास्थ्यातील भेदक विचारसरणीमुळे त्यांनी त्याकाळीतील भल्या भल्या विद्वानांची रेवडी उडवली होती. त्यांच्या लेखणीच्या मान्यातून लो. टिळक, न. चिं. केळकर, किंवा महात्मागांधीही सुटलेले नव्हते. ' तुम्हाला लिंग विज्ञानातले काही कळत नाही ' असे महात्माजींच्या तोंडावर सांगण्याचे धैर्य त्यांच्यात होते. त्यामुळेच तत्कालिन शिष्ट समाजाने र. धोंवर बहिष्कार पुकारलेला असावा. अशा अवस्थेत त्यांच्या चरित्राची जुळणी करण्याचे काम फार अवघड होते, श्री. दिवाकर बापट यांनी र. धों. ना या छोटेखानी चरित्रात न्याय दिलेला आहे. त्यांचे चित्रण फार ताकदीने केले आहे.

र. धों. चे चरित्र हा कादंबरीचा विषय आहे. आण्णांसारखा पिता आणि तत्कालिन बुरसटलेला काळ ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची पार्श्वभूमी आहे शालेय शिक्षण मुरुडला आणि कॉलेजशिक्षण पुण्याला झाले असूनही त्यांच्या स्वभावात जुन्या परंपरेविषयी प्रेम नाही. श्री. बापट यांनी लिहिलेल्या चरित्राची पृष्ठ संख्या फारच मर्यादित असल्यामुळे कित्येक प्रसंगी रस निष्पत्ती झालेली नाही. बापट यांनी परिश्रमपूर्वक तारखा आणि माहिती जमवली व ती आपल्या सुबोध साध्या शैलीत मांडली इतकेच! र. धों. चे चरित्र शकुंतलाबाई परांजपे यानीच लिहायला हवे; त्या चरित्राची ही फार तर पूर्व तयारी म्हणत येईल.

र. धों. चे वाङ्मय अफाट आहे. त्यातून दोन तीन उतारेच बापट यानी शेवटी दिलेले आहेत. र. धों.ची एक स्वतंत्र शैली आहे. समाजस्वास्थ्यामध्ये पत्रांना उत्तरे देताना ती दिसते. बापटांनी दिलेल्या दोन तीन उताऱ्यांमुळे त्या शैलीची कल्पना येणार नाही. त्यांचे लिखाण मुळातच वाचायला हवे.

वानगीदाखल त्यांचा एकच उतारा देतो.

' कामवासनेसंबंधी कितीही ढोंग माजवले, मनोनिग्रहाबद्दल महात्मागांधी व त्यांचे गुरु टॉलस्टाय यांनी कितीही उपदेश केला तरी मनोनिग्रहाचे दुष्परिणाम लांबणीवर टाकता येत नाहीत. अर्थातच खरोखर मनोनिग्रहाचा प्रयत्न करणारे लोक फारच थोडे असतात. टॉलस्टायसारखे ढोंगीच फार...कामवासना ही प्रचंड शक्ती आहे. ती दडपून दडपली जाणारी नाही. नपुसकांची गोष्ट वेगळी. परंतु इतरांस ती ताब्यात ठेवण्याचा एकच मार्ग आहे. तो म्हणजे तिचे नैसर्गिक रीतीने अतिरेकाशिवाय समाधान करणे. इतर कोणत्याही मार्गात धोका आहे.'

ऐंशी पानांच्या या पुस्तकात दिवाकर बापट यांनी फक्त पंचेचाळीस पाने र. धों. च्या चरित्रावर खर्च केली आहेत. बाकीच्या पृष्ठात त्यांच्या साहित्यातील उतारे आहेत. र. धों. चे ग्रंथ परीक्षण रोख ठोक असे. संगीत ताई तेलीण या पुस्तकावरील परीक्षण छापले आहे. त्याऐवजी विभावरी शिरूरकर यांच्या ' कळयांचे निश्वास ' या पुस्तकावरील परीक्षण छापले असते तर बरे झाले असते. र. धों. च्या लेखन

शैलीचे सर्व गुण त्या परीक्षणात आहेत.

श्री. बापट यांनी या उपेक्षित महापुरुषाच्या चरित्राला हात घातला याबद्दल त्यांचे अभिनंदन ! पुस्तक वाचून, ते फार अपुरे आहे याची मात्र चुटपुट लागते. ¤

# माझी प्रिया

## जयवंत चुनेकर

केवळ स्वत:साठी पुस्तके वाचायची म्हणजे मग त्यांत आवड-निवड नि:शंकपणे ठरविण्याचे स्वातंत्र्य असते. एखाद-दुसरे प्रकरण वाचून स्वत:पुरता निर्णय घेता येतो. परीक्षण लिहायचे म्हटले म्हणजे मात्र समोर येईल ते पुस्तक, इच्छा असो वा नसो आद्यंत वाचण्याची जबाबदारी टाळता येत नाही.

श्री. कुलकर्णी यांच्या प्रस्तुत कादंबरीसंबंधात असेच झाले आहे. कोणताही पूर्वग्रह मनात न धरता किंवा फारशी काही अपेक्षा न ठेवता ही कादंबरी वाचायला सुरूवात केली. पण पहिली एक दोन प्रकरणे वाचल्यानंतर पुढे अखेरपर्यंत कादंबरी वाचणे 'भाग आहे' यामुळेच वाचून पूर्ण केली.

प्रस्तुत लेखकाच्या यापूर्वीच्या बारा-पंधरा कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्याच्या पाहाण्यात आहेत. म्हणजे श्री. कुलकर्णी यांची ही काही पहिलीवहिलीच कादंबरी नव्हे. पण आश्चर्य असे, की या कादबरीच्या लेखनात नवखेपणाच्या खाणाखुणा भरपूर आहेत; कच्चेदुवे अनेक आहेत.

कादंबरीच्या विषयात नाविन्य काहीही नाही; मांडणीतही नाही. तोच तो प्रेमाचा त्रिकोण आहे, त्यात गुंतागुंत आहे आणि तिची 'धक्का' दायक (!) व सुखान्त उकलही आहे. अशाप्रकारची कथा रंगवण्यासाठी आवश्यक असलेला मसालाही भरपूर आहे. (तथाकथित) दरिद्री नायक-कम-व्हिलन आहे; सुंदर, सुडौल वगैरेवगैरे अशी तरुणी (अर्थातच नायिका) आहे, आणि एक लक्ष्मीपुत्रही आहे. नायिकेचे, नीता तेंडुलकरचे, सुरूवातीला दरिद्री नायकावर, राजा रिपोर्टरवर प्रेम; मग त्याच्या बदफैली वर्तनाची जाणीव (तीही त्या लक्ष्मीपुत्राच्या संगतीत), त्यातून त्याच्या प्रेमाचा धिक्कार आणि अर्थातच सोईस्करपणे लक्ष्मीपुत्र मदन दिवटे याजवर प्रेम ! त्याच्याबरोबरच्या लग्नापूर्वी विघ्नही आहेच. त्यासाठी मग पहिला प्रियकर व्हिलन बनतो. आता त्याला नायिकेच्या मार्गातून (= लग्नातून) दूर कसा करायचा ? काळजी नको. स्वत: नायिकेच्या बापानं त्याची जबाबदारी घेतली आहे ! त्यासाठी तो त्याचा खून घडवून आणतो आणि एका दगडात तीन

पक्षी सारून टाकतो. दुसरा पक्षी म्हणजे सदाशिवनामे कोणी एक व्यक्ती जी फक्त या कामासाठं च – म्हणजे त्या रिपोर्टरच्या खुनाला वहिमी पुरवण्यासाठीच त्या कथेत वावरते. त्याच्यावरच्या आरोपामुळे त्याच्या मालकीची जमीन कारखान्या-साठी आपल्या मालकाला मिळवून देऊन नायिकेच्या बापाने तिसरा पक्षी मारला आहे !

या कादंबरीसंबंधात अनुकूल काही लिहितायेण्यासारखे आहे काय, याचा सारखा विचार करतो आहे, पण सगळाच आनंद आहे ! कथानक, ते मांडण्याची शैली सारे कसे बटबटीत आहे. एक विशिष्ट वाचकवर्ग डोळ्यांसमोर ठेवून केलेले लेखन. मग त्यातून अपेक्षा ती काय करायची ? सबंध लेखनातच एक चीपनेस् आहे लेखन लोकप्रिय करण्यासाठी योजावयाच्या नाटकी प्रसंग (+संवाद), भाबडी सुभाषितांचा आभास निर्माण करणारी खोटी वाक्ये, एखाद्या प्रश्नाची अत्यंत उथळपणे केलेली उकल, एका प्रसंगातून दुसरा प्रसंग सुरू करताना (अकारण) चित्रपटकथेच्या तंत्राचा अवलंब यासारख्या एकानेक सामान्य क्लृप्त्या त्यात आहेत. या लेखनामागे कसलेही सूत्र नाही. त्यातल्या घटनांना, प्रसंगांना काहीही अपरिहार्यता नाही. उदाहरणार्थ राजा पटेलाचा (=रिपोर्टर) खून. कथेच्या Span मध्ये त्याला पुढे कोणते स्थान द्यायचे हा लेखकाला प्रश्न पडला असावा. पण त्याने तो पटकन सोडवूनही टाकला आहे. त्या रिपोर्टरचा खून करवून ! (मग त्यासाठी सोईस्कर रीत्या वीजकपात होऊन वसाहतीत शांतता निर्माण होते !) सदाशिव या व्यक्तिरेखेभोवतीही प्रथमपासूनच, अकारण गूढ ! असे या कादंबरीचे किती कच्चेदुवे सांगावेत ? प्रकरणशः लिहिली आहे, म्हणूनच केवळ तिला बाह्यतः कादंबरीचा घाट. अन्यथा एखाद्या अतिसामान्य कथेचाच मालमसाला ! बरे, या कादंबरीच्या लेखनशैली संबंधाततरी काही उल्लेखनीय दर्शविता येईल म्हणावे, तर तिथेही सारा आनंदच आहे ! अत्यंत ढिसाळ वाक्यरचना-शब्दयोजना; रूढ वर्णने, पाणचट-उथळ संवाद. सर्वच अत्यंत प्राथमिक दर्जाचे ?– यातले हे रिपोर्टर महाशय लग्नसमारंभाचे फोटो काढण्यासाठी पुरेशा प्रकाशाची वाट पाहात थांबतात म्हणे !

मराठी कादंबरीच्या वाटचालीतील ही खुरटलेली झुडपे बाजूला काढताना 'आमेन' म्हणायचे एवढेच ! ◻

---

| | |
|---|---|
| **उपेक्षित द्रष्टा** | **माझी प्रिया** |
| दिवाकर बापट | दत्ता जी. कुलकर्णी |
| अभिनव प्रकाशन, मुंबई | नीलकंठ प्रकाशन, पुणे |
| मूल्य ३ रुपये | मूल्य ६ रुपये |

---

सेवाश्रम सहकारी नागरिक रुग्णालय, मुंबई
या संस्थेने गेल्या महिन्यात
कर्करोग या विषयावर
तज्ज्ञ–डॉक्टर्स–संशोधक यांचा एक परिसंवाद
आयोजित केला होता....

# कर्करोग अनुवंशिक आहे का?

**प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी मुंबईच्या ' सेवाश्रम सहकारी नागरिक रुग्णालय मर्यादित (संकल्पित) ' या संस्थेने ' कर्करोग ' या विषयावर तज्ज्ञ डॉक्टर्सचा एक परिसंवाद आयोजित केला होता. त्या परिसंवादाचा आधार घेऊन, त्याचप्रमाणे सुप्रसिद्ध कर्करोगतज्ज्ञ व शल्यविशारद डॉ. पी. बी. देसाई यांच्याशी थोडी चर्चा करून हा लेख लिहिला आहे. याच लेखाचा दुसरा भाग म्हणून, मुंबईच्या ' कॅन्सर रिसर्च इंस्टिटयूट 'च्या बायोकेमिस्ट्रीच्या विभाग प्रमुख डॉ. (कुमारी) बो. एम्. ब्रॅगांझा यांच्या मुलाखतीवर आधारित कर्करोगावरील माहिती आहे. डॉ. ब्रॅगांझा यांनी, नागाच्या विषाचा कर्करोग बरा करण्याकरिता काही उपयोग होईल का यासंबंधीचे संशोधन नुकतेच हातावेगळे केले आहे. अजूनही त्याचे यश मर्यादित आहे, प्रयोगावस्थेत आहे. पण उद्या कदाचित ते जालीम उपायही ठरू शकेल...

कर्करोगा (कॅन्सर) संबंधी काही जाणून घेण्याची प्रत्येकाला भितीयुक्त उत्सुकता वाटते. पूर्वी क्षयरोग भयानक मानला जात असे तर आता त्याची जागा कर्करोगाने घेतली आहे. कर्करोग होणे म्हणजे जीवनसमाप्ती असेच गृहित धरले जाते आणि ते संपूर्णपणे खोटे नसले तरी इतर बाजूंचाही विचार करणे आवश्यक आहे. जो आपण सर्वसाधारणपणे करीत नाही.

कर्करोगपीडित रुग्ण अगदी खडखडीत बरे होणे वा योग्य त्या उपाययोजनेनंतर दीर्घकाळ जगणे असेही घडले आहे व घडत आहे. जगभरचे शास्त्रज्ञ, डॉक्टर्स

निरनिराळे संशोधन करून उपाय शोधण्यासाठी अविरत प्रयत्न करीत आहेत; पण आपण व्यक्ती म्हणून, व्यक्तिगत पातळीवर काही प्रमाणात का होईना याबाबत जागरूक आहोत का या प्रश्नाचे उत्तर आपल्या देशात तरी नाही असेच मिळेल. पाश्चात्य देशात कर्करोगासंबंधी माहिती करून घेणे वा ठराविक काळाच्या अंतराने वैद्यकीय तपासणी करून घेण्याची जागरूकता दाखविली जाते. आपल्या देशातही ही जागरूकता हळुहळू येऊ लागली आहे. मुंबईत अशा प्रकारची वैद्यकीय तपासणी करून रोगनिदान करणारी चार केंद्रे 'इंडियन कॅन्सर रिसर्च सोसायटी' चालविते. डॉ. देसाई यांच्या मतानुसार या देशातील कर्करोग होण्याचे प्रमाण ५० टक्के कमी होणे शक्य आहे. पण हा जो जनशिक्षणाचा (मास एज्युकेशन) भाग आहे तो वाढविला पाहिजे. हे येथे नसल्याने सुमारे १०० केसेसपैकी ८० केसेस शेवटच्या अवस्थेला पोहचलेल्या असतात.

पाश्चात्य देशात या जागरूकतेमुळे ३३ टक्के रोगनिदान लोकांना स्वतःला करता येते.

कर्करोग हा इतर रोगांप्रमाणे एक रोग नसून रोगांचा समूह आहे. प्रत्येक प्रकारचा कर्करोग होण्याची कारणे वेगवेगळी आहेत. त्यामुळे 'सब घोडे बारा टक्के' प्रमाणे त्यावर एकाच प्रकारचे औषध वा उपाययोजना नाही. काही वेळा रॅडिएशन थियरपीचा उपयोग करून कोबाल्टच्या किरणांनी कर्करोग पेशी नष्ट केल्या जातात, तर काही प्रसंगी औषधोपचाराचा (किमोथियरपी) उपाय केला जातो तर केव्हा केव्हा शस्त्रक्रिया आवश्यक ठरते.

कर्करोग म्हणजे काय व तो का होतो असा प्रश्न नेहमीच आपल्या मनात उद्भवतो. आपल्या शरीरातील सर्व नॉर्मल पेशींची होणारी वाढ काही काळाने थांबते. पण काही पेशींची वाढ ॲबनॉर्मली होते. कर्करोग म्हणजे अशीच पेशींची ॲबनॉर्मल वाढ. या वाढीची कारणे अज्ञात असतात. कर्करोग होण्याची बाह्य कारणे मात्र ज्ञात आहेत. उदा. धूम्रपान, यात कार्बन मोनॉक्साईड, हैड्रोजन सायनाईड, नैट्रोजन डायॉक्साईड हे अत्यंत घातक वायू (Gases) असतात. सिगरेटला फिल्टर असले तरीही हे वायू शरीरात जातातच. शिवाय धुराबरोबर आत जाणारी उष्णता ८० डिग्रीज् एवढी भयंकर असते. त्यामुळेच फुप्फुस, घसा, अन्ननलिका, घशातील ध्वनियंत्र यांचा कर्करोग होण्याची शक्यता असते. अनेकांना सिगरेट अगदी टोकापर्यंत जळत आली तरी ओढण्याची सवय असते हे तर अधिक भयानक. कारण वर उल्लेख केलेले सारे विषारी वायू तेथे एकत्र झालेले असतात.

ब्रिटनमध्ये केलेल्या एका पहाणीनंतर असे आढळून आले आहे की गेल्या वीस वर्षात फुफ्फुसाच्या कर्करोगाचे प्रमाण ७ टक्क्यांनी वाढले असले तरी ब्रिटनमधील डॉक्टर्सपैकी ५० टक्के डॉक्टर्सनी धुम्रपान सोडल्याने त्यांच्याबाबतीतील फुफ्फुसाचा कर्करोग होण्याचे प्रमाण ३८ टक्क्यांनी खाली आले आहे. आपण वातावरणातील

दुषितीकरणा ( Pollution ) बद्दल बोलतो. पण धुम्रपान हें त्याहीपेक्षा अधिक घातक दूषितीकरण आहे.

व्हायरस (रोगाचे विष) हेही कर्करोग होण्याचे कदाचित कारण असावे. त्याच-प्रमाणे हारमोन्समुळेही कर्करोग उद्भवण्याची शक्यता असते. विशेषत: स्तनाचा कर्करोग. संततीप्रतिबंधक गोळयाचा फाजिल व दीर्घकाळ वापर केल्यासही कर्क-रोग होण्याची शक्यता सुप्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. एम्. आर्. नार्वेकर यांनी बोलून दाखविली (संतती प्रतिबंधक गोळ्यांमध्ये हारमोन्स असतात.) ज्या स्त्रिया मुलांना जन्म देतात त्यांच्या बाबतीत गर्भाशयाच्या तोंडाचा तर ज्यांनी एकही मूल जन्माला घातले नाही त्या स्त्रियांना गर्भाशयाचा कर्करोग होण्याचे सर्वसाधारण प्रमाण आहे. म्हणूनच ४० वर्षे वयापुढील स्त्रियांनी सहामहिन्यांतून एकदा तरी वैद्यकीय तपासणी करून घ्यावी.

आपल्या देशात कॉफी सेवनाचे प्रमाण तसे अत्यल्प आहे, पण पाश्चात्य देशात हे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे मूत्राशयाचा कर्करोग होण्याचे प्रमाण तेथे अधिक दिसते.

धुलीकण व हवा आणि पाणी यांचे दूषितीकरण हे फुफ्फुसाच्या कर्करोगाचे कारण ठरू शकते.

कर्करोग हा आनुवांशिक आहे काय ? याचे उत्तर 'आहे' व 'नाही' असे आहे. स्तनाच्या कर्करोगाबाबत थोड्याफार प्रमाणात वरील प्रश्नाचे उत्तर 'आहे' असे आहे. विशेषत: पारशी स्त्रियांत हे प्रमाण अधिक आहे. ठराविक प्रकारच्या कर्क-रोगाचे प्रमाण ठराविक देशातच असते असे नाही. तरीही भारताबाबत म्हणायचे झाल्यास, जीभ, तोंड, गाल, अन्ननलिका वगैरेंचे प्रमाण इतर देशांच्या मानाने अधिक आहे. पान चघळणे, तंबाकू खाणे, धुम्रमान करणे वगैरेमुळे असे असण्याची दाट शक्यता तज्ज्ञ बोलून दाखवितात. त्यामानाने मद्यपानामुळे कर्करोग होण्याची शक्यता थोडी कमी असते. पण अतिरिक्त मद्यपानामुळे मात्र यकृत खराब होऊन कर्करोग होण्याची शक्यता असतेच.

कर्करोग संसर्गजन्य नाही. नाहीतर डॉक्टर्सनाच त्याने प्रथम ग्रासले असते.

लहान मुलांमध्ये, मूत्रपिंड, मेंदू व रक्ताचा (ल्युकेमिया) कर्करोग होण्याचे प्रमाण अधिक आहे.

साधारणपणे ४५० लोकांमागे एकाला कर्करोग होतो असे प्रमाण आहे.

प्राथमिक अवस्थेत कर्करोगाची लक्षणे लक्षात येत नाहीत असे होते. पण डॉ. देसाईंच्याच शब्दात सांगायचे तर निसर्ग कृपाळू आहे. कोणत्याना कोणत्या तरी स्वरुपात कर्करोग वा इतरही रोगासंबधी सूचना तो आपल्याला देत असतो पण आपणच निष्काळजी असतो. आपल्या प्रकृतीत काहीही ॲबनॉर्मल घडले तरी आपण तात्काळ वैद्यकीय सल्ला घेतला पाहिजे. स्तनात गाठ येण्याचा जरा जरी संशय

आला तरी स्त्रियांनी वैद्यकीय सल्ला घ्यावा. कदाचित तो कर्करोग नसेलही. अपचन, गिळायला त्रास होणे वा तत्सम काहीही घडले तरी आपण न घाबरता वैद्यकीय तपासणी व सल्ला घेणेच योग्य आहे. कारण अत्याधुनिक वैद्यक शास्त्रांच्या आधारे

---

## सेवाश्रम

गिरगाव, ग्रँटरोड, नानाचौक येथील काही नागरिकांनी एकत्र येऊन एक अद्ययावत साधन सामुग्रीने युक्त असे सहकारी तत्वावर एखादे रुग्णालय उभारण्याची कल्पना सत्तर सालच्या आक्टोबरात पुढे आली. त्याचे प्रमुख प्रवर्तक आहेत डॉ. सुरेश नाडकर्णी हे एक तरुण व उत्साही डॉक्टर.


सामान्य, व मध्यम वर्गातील कोणत्याही जमातीतील लोकांना माफक व सवलतीच्या दरात सर्व प्रकारची वैद्यकीय सोय उपलब्ध करून देण्याच्या ईर्षेने 'सेवाश्रम सहकारी नागरिक रुग्णालय मर्यादित (संकल्पित)' संस्था स्थापन करण्यात आली. ही संस्था रजिस्टर आहे. संस्थेच्या २४७ सभासदांपैकी ६० तज्ज्ञ डॉक्टर्स आहेत. भागधारकांना (शेअर होल्डर्स) दहा रुपयात तज्ज्ञ डॉक्टरकडून रोगचिकित्सा व इतर साऱ्या सोई उपलब्ध होणार आहेत. याशिवाय आरोग्य, व्यायाम, रोगप्रतिबंधक इलाज, कुटुंब नियोजन यासंबंधी महत्वाची माहिती देणारे 'सेवाश्रम' नावाचे नियतकालिकही सुरू करण्यात येणार आहे. संस्थेने इंटरसायन्स पास झालेल्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल असा निरनिराळ्या व्यावसायिक क्षेत्राची माहिती देणारा परिसंवाद तसेच 'युथनेशिया' (दयान्ती मरण) 'कर्करोग' यावर लोकशिक्षणाला आवश्यक असणारे परिसंवाद आयोजित केले होते. बांगला देशसाठी, डॉक्टर्सकडे आलेल्या औषधांची सॅम्पलस् गोळा करण्याचे कामही त्यांनी केले.

मुंबईत इतरत्रही अशीच पाच-सहा सहकारी तत्वावरील रुग्णालये स्थापन करायची व सर्वच मोठी ऑपरेशन्स होऊ शकतील असे एक मध्यवर्ती रुग्णालयही उभारण्याची महत्वाकांक्षी योजना संस्थेच्या मनात आहे. याशिवाय महाराष्ट्रात स्टेट को-आपरेटिव्ह हॉस्पिटल असोसिएशन स्थापन व्हावे व त्यासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात तरतूद असावी (सध्या अशी तरतूद नाही) व अशा सहकारी रुग्णालयांना कमी खर्चात घाऊक प्रमाणात औषधे विकत घेता येण्याची सोय व्हावी, की ज्याद्वारे माफक दरात औषधोपचार उपलब्ध होऊ शकेल अशीही संस्थेची सूचना आहे. रतन टाटा ट्रस्टप्रमाणे एखादी संस्था उभारून गरीब व गरजू स्त्रियांना स्वयंपाक करण्याच्या व इतर नोकऱ्या उपलब्ध करून देण्याचीही योजना त्यांच्याकडे आहे. अगदी खऱ्या अर्थाने 'सेवाश्रम' ही सहकारी संस्था आहे. ◻

---

# तुम्ही पेरता, जोपासता, पीक घेता ... ते काय उंदरांसाठी?

CMI-1932



तुमच्या बहुमाल धान्योत्पादनांवर उंदरांना का पोसता? ए सी सी सीमेंटचे कणगे बांधून त्यात धान्य साठवा. असे कणगे किडी, उंदीर आणि आग यांपासून सुरक्षित असतात. शिवाय ते जलाभेद्यही असतात.

ए सी सी सीमेंट वापरून धान्य साठविण्याची सर्वोत्तम सोय करा.

तुम्हाला लागणारे सीमेंट मिळविण्यासाठी तुमच्या नजीकच्या **ए सी सी** स्टॉकिस्टचा अथवा दि सीमेंट मार्केटिंग कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड, १२१, महर्षी कर्वे मार्ग, मुंबई २०, यांचा संपर्क साधा.

तज्ज्ञांची **मोफत तांत्रिक मदत** दि कॉंक्रीट असोसिएशन ऑफ इंडिया, १२१, महर्षी कर्वे मार्ग, मुंबई २०, यांचेकडून मिळेल.

**ACC**

**शेतकऱ्यांचा सखा**

**दि ॲसोसिएटेड सीमेंट कंपनीज लिमिटेड**
**दि सीमेंट मार्केटिंग कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड**

प्राथमिक अवस्थेतील कर्करोगाच्या ८० टक्के केसेस बऱ्या करता येतात किंवा निदान काही वर्षे तरी त्यावर नियंत्रण ठेवता येते.

सायटालॉजी (Cytology)–शरीरातील पेशींची तपासणी करण्याची पद्धती–मुळे तर गर्भाशयाचा कर्करोग होणार असल्यास त्याआधी पाचवर्षे त्याची सहज चाहूल लागते व खात्रीची उपाययोजना करता येते.

जगभर चाललेल्या संशोधनातून हळुहळू उपाय पुढे येतात. काही वर्षांनी असेही घडेल की देवी प्रतिबंधक लस आपण जशी टोचून घेतो तशीच कर्करोग प्रतिबंधक लसही टोचून घेण्याइतपतही शास्त्र प्रगती करील. ◻

कॅन्सर रिसर्च इन्स्टिटयूटच्या बायोकेमिस्ट्रीच्या विभागप्रमुख

# डॉ. बी. एम. ब्रॅगांझा यांच्या मते....

अलिकडच्या काळात कर्करोगाबाबतच्या संशोधनात खूपच प्रगती झाली असून कर्करोग होणे व त्याची कारणे याबाबत अधिक माहितीही उपलब्ध झाली आहे. संशोधकांच्या अविरत परिश्रमांमुळे हे सारे शक्य झाले आहे. जगभर चाललेल्या संशोधनाच्या एकत्रीकरणाच्या आधारे ही प्रगती शक्य झाली आहे व पुढील संशोधन चालू राहिले आहे.

आतापर्यंतच्या ज्ञात माहितीच्या आधारे असे म्हणता येईल, की कर्करोगाची ८० टक्के कारणे ही आपल्या भोवतालची परिस्थिती व वातावरण ही होत. आपल्या सामाजिक सवई, हवा, अन्न, वगैरे याला कारणीभूत आहेत. उदाहरणच घ्यायचे झाले तर धूम्रपानाचे घेता येईल. सुमारे दहा लाखांपेक्षा अधिक लोकांबाबतचा केला गेलेला अभ्यास व प्रयोगशाळेतील संशोधन यांच्या आधारे असे सिद्ध झाले आहे की धूम्रपान हे फुफ्फुसाच्या कर्करोगाचे महत्वाचे कारण आहे व त्यातही पाईप वा सिगार ओढणाऱ्यांपेक्षा सिगारेट ओढणाऱ्यांना तो अधिक प्रमाणात होतो.

मानवी शरीरातील सर्वसामान्य पेशींतूनच कर्करोगपेशींचा उद्भव होतो व साधारणपणे त्यांच्यातील गुणधर्म सारखेच असतात. पण यामुळेच अडचणी व प्रश्न निर्माण होतात. कारण कर्करोगावरील उपाय म्हणून दिलेली औषधे कर्करोगपेशीबरोबरच चांगल्या पेशींनाही हानी पोचवतात. कर्करोगपेशींचा वेगळेपणा

दाखविणारे गुणधर्म अद्यापी अज्ञात आहेत, त्यामुळेच हा प्रश्न गंभीर झाला आहे.

नवीन संशोधनाप्रमाणे रोगजंतू ( virus ) मुळे कर्करोग होतो असा थोडा फार पुरावा हाती आला आहे पण तो संशयातीत नाही. प्राण्यांमध्ये याच कारणामुळे कर्करोग होतो असे ठामपणे सिद्ध झाले आहे. आफ्रिकेतील काही भागात लहान मुलांच्या जबड्यात आलेल्या कर्क रोगाच्या गाठींवरून त्या प्रकारचा मानवी कर्करोग–बरकिट ल्यामफोमा–व्हायरसमुळे होतो असे म्हणायला जागा आहे.

गेल्या वर्षी अमेरिकेतील टेमिन येथील संशोधनामुळे जगभरच्या शास्त्रज्ञात एक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. प्राण्यांमध्ये व्हायरसमुळे होणाऱ्या कर्करोगाच्या एक प्रकारच्या व्हायरसमध्ये सजीव पेशींमध्ये असलेल्या ऑरगॅनिक केमिकल सबस्टन्स ( enzyme )चा शोध लागला. त्यामुळे एक महत्वाची कामगिरी बजावली गेली आहे. प्राण्यांमधील वाढीवर परिणाम करणाऱ्या व चांगल्या पेशी खराब करणाऱ्या व्हायरसवर यामुळेच प्रकाश पडायला मदत होणार आहे.

मुंबईच्या ' कॅन्सर रिसर्च इंन्स्टिटयुट 'च्या बायोकेमिस्ट्री विभागाने कर्करोगावरील संभाव्य उपाय म्हणून नागाच्या विषावर प्रयोग चालविले होते.

अनेक जुन्या लिखाणांवरून असे आढळून आले, की नागाचे विष सौम्य करून दिले असता आर्थ्रिटिस ( सांध्यांचा आजार) व कर्करोगामुळे होणारे दुःख कमी होते. प्रयोगशाळेत प्राण्यांवर केलेल्या अशाच प्रकारच्या प्रयोगांवरूनही काही प्रकारचे कर्करोग बरे झाल्याचे आढळले. पूर्वीच्या लिखाणावरून असे दिसते की त्या सौम्य विषाच्या डोसातील जालीमपणा ही त्या काळची फार मोठी अडचण होती. पण नागाच्या विषातील विषारी प्रथिने विभक्त करण्याचे प्रयोग यशस्वी झाले आणि ही सजीवाला ठार मारणारी विषारी प्रथिने (प्रोटीन्स) व कर्करोगाच्या पेशी नष्ट करणारी नागाच्या विषातील प्रथिने यांचे वेगळेपण सिद्ध झाले. त्यांचा उपयोग करून केलेल्या प्रयोगांवरून असे दिसले की प्राण्यांमधील काही प्रकारचे कर्करोग (गाठी) पेशी नष्ट झाल्या. हे प्रयोग अजूनही चालच आहेत. मानवावर मात्र याचा प्रयोग अजूनपर्यंत करण्यात आलेला नाही.

याच प्रयोगात असे आढळून आले की नागाच्या विषातील वेगळे केलेले प्रथिने कर्करोग पेशीच्या पातळ त्वचेवर (membranes ) आघात करून त्या नष्ट करतात आणि हे करीत असताना चांगल्या पेशी व कर्करोग पेशी यांच्यातील वेगळेपणा ते प्रथित ओळखू शकते. यावर डॉ. ब्रॅगांझा व त्यांचे सहकारी अधिक संशोधन करीत आहेतच. याचाच आधार घेऊन टयूमर सेल (पेशी) नॉर्मल पेशीच्या पृष्ठभागावरील त्वचेतील वेगळेपणाचा अभ्यास केला जाणार आहे. प्राणघातक ठरणाऱ्या कर्करोग पेशींचा नायनाट करणाऱ्या या प्रथिनाद्वारे सातत्याने प्रयोग चालूच रहाणार आहेत. कदाचित ही एक महत्वाची घटना ठरू शकणार आहे.

कर्करोगावर उपयुक्त ठरणारी अनेक औषधे सध्या उपलब्ध आहेत. त्यांच्याद्वारे,

इतर उपचार आणि प्रथमिक अवस्थेत असतानाच कर्करोगाचे निदान करणारी साधने यामुळे आता कर्करोगावर नियंत्रण ठेवून रोग्याला अधिक काळ जिवंत ठेवणे शक्य झाले आहे. गेल्या वर्षीच्या आंतरराष्ट्रीय कर्करोग काँग्रेसच्या अहवालावरून असे दिसते की तिनांपैकी एक कर्क रोगी आता बरा करता येतो.

अलिकडच्या संशोधनामुळे कर्करोगावर मात करण्याचा काळ आता अधिक जवळ आला आहे. पण पेनिसिलिनसारखे कर्करोगावरील ठाम औषध मात्र अजूनही सापडलेले नाही. तरीही ते प्राप्त करून घेण्यासाठी जगभरचे शास्त्रज्ञ व संशोधक जिवापाड प्रयत्न करीत आहेत हा एक फार मोठा दिलासा आहे.

□ □ □


## मुसाफिर

- एस. टी., रेल्वे, एअर लाइन्स तिकिटांची रिझर्वेशन्स मिळवून देऊ.
- सिनेमागृहे व नाटयगृहे ह्यांची तिकिटे मिळवून देऊ.
- धार्मिक-क्षेत्रे व प्रेक्षणीय पर्यटनस्थळे ह्यांच्या प्रासंगिक सहली आयोजित करतो.
- शाळा-कॉलेज, महिला मंडळे, क्लब्स यांस टी संपूर्ण सहली आयोजित केल्या जातील.
- महाबळेश्वर-माथेरान येथील हॉटेल बुकिंग, तसेच स्वतंत्र बंगले वा खोल्या भाडयाने मिळविण्यासाठी व्यवस्था केली जाते.
- मुंबईत अथवा परगावी जाण्यासाठी आलिशान अॅम्बेसेडर गाडया भाडयाने देऊ.
- आर. टी. ओ टॅक्स, टेलिफोन व इलेक्ट्रिक बिले भरणे व तत्संबंधी कामे केली जातात.

वरील उपलब्ध सेवांसाठी अथवा अधिक माहितीसाठी संपर्क सांधा—

मुसाफिर

गणेश निवास, गणेश पेठ लेन, खांडके बिल्डींग नं. ९ समोर प्लाझा सिनेमानजिक, दादर, मुंबई २८.
टेलिफोन नंबर ४५८४६७

कार्यालयाची वेळ—सायंकाळी ५ ते ८ फक्त.



# ब्रह्मी फ्रंट

लेखांक : चार

कर्नल आ. भा. जाधव

# सीमोल्लंघन

## ४ जानेवारी ४५



दोन महिने मणिपूर भागात विश्रांती घेऊन आमची बटालियन परत आघाडीवर नव्या दमात निघाली. 'बी', 'सी' आणि 'डी' या रायफल कंपन्या (लढाऊ पथके) आणि बटालियन हेडक्वार्टर्स यांनी आघाडीकडे गेल्याच आठवड्यात कूच केले. 'ए' कंपनी आणि मॉर्टर प्लटून आज पहाटे तीन वाजता निघाले. थंडी म्हणजे मी म्हणत होतो. टामूपर्यंतचा रस्ता मोठमोठ्या पहाडांतून वळणं घेत जातो. पलेल ते टामू हे ४२ मैलांचे अंतर कापायला आमच्या कॉनव्हॉयला बारा तास लागले. डनलॉप कॉलम लीड करत होता. मी सर्वांत शेवटी होतो. माझी जीप टमूच्या हद्दीत दुपारी तीन वाजता पोचली. टामू, भारत आणि ब्रह्मदेश यांच्या सरहद्दीवर आहे. या सीमेवर मी आज शेवटची रात्र काढणार आहे.

रात्री बिछान्यात पडल्यावर माझ्या मनात विचार आला, आज आपण केवळ मातृभूमीच्याच सीमेवर नसून जीवन मरणाच्याही सीमेवर येऊन पोचलो आहोत. उंच कड्याला लगटूनच खोल दरी असते. समरांगणावर जाणाऱ्या सैनिकाचं जीवन मरणाशी असलेलं नातं इतकंच निकटचं नसतं का? उद्यापासून पुन्हा आपला जीवन मरणाच्या तारेवरील नाच सुरू होणार.

## ८ जानेवारी ४५

आज आम्ही बर्मातील एका प्रसिद्ध नदीच्या किनाऱ्यावर येऊन पोचलो. लांबच लांब आणि रुंद पात्राची, संथपणे वहाणारी ती शालीन चिदवीन नदी पाहून मला प्रसन्न वाटलं. तिच्या विपुल, दाट, थंड पाण्यात मी मनसोक्त डुंबलो. सारा शीण निघून गेला. तरतरीत वाटलं. संध्यासमयीच्या मावळत्या सोनेरी सूर्यप्रकाशात चिदवीनच्या पात्रावर अलगद पडलेला 'बेली ब्रिज' उठून दिसत होता. आतापर्यंत बांधलेल्या बेली ब्रिजमध्ये हा लांबीच्या दृष्टीने सर्वांत मोठा पूल आहे असं एक इंजिनियर ऑफिसर मला म्हणाला.

त्या पुलाच्या संरक्षणासाठी मोठ्या आकाराची सोळा बलून्स आकाशात तरगत होती. त्यांच्याही पुढे चारी दिशांना आमची विमाने, शत्रूच्या विमानांनी हल्ला करून हा पूल बरबाद करू नये म्हणून डोळयांत तेल घालून लक्ष ठेवीत होती. नदीच्या दोन्ही किनाऱ्यांवर अनेक विमानविध्वंसक तोफा आकाशाकडे टक लावून पहात होत्या. त्या पुलावरून दिवसा वहातुक करण्याची बंदी होती. ती फक्त रात्रीच चाले.

चिदवीनने तिच्या मऊ मखमली अंगावर अलगद उचलून धरलेलं हे बाळ संग्राम पुढं पुढं रेटत नेण्याचं काम तप्तरतेनं पार पाडीत होतं.

## १४ ते २७ जानेवारी ४५

१० तारखेला मुताईक या ठिकाणी आम्ही पोचलो. तेथे बटालियन हेटक्वार्टर्सचा कँप होता. हेडक्वार्टर्स कंपनी कमांडर कॅप्टन रॉन हॉचकिसच्या हवाली मॉर्टर प्लटून केले.

मेकॅनिकल ट्रान्सपोर्ट प्लटून कमांडर लेफ्टनंट डी सिल्व्हा १५ दिवसांच्या वॉर लीव्हवर निघाला होता म्हणून त्या प्लटूनचा चार्ज मला देण्यात आला.

कॅप्टन प्रेमचंदच्या डेऱ्यात मी आपला बाडबिस्तरा लावून टाकला. त्याची नि माझी खूप गट्टी जमली. प्रेम गिड्ड्या बांध्याचा आणि चांगला जाडजूड आहे. मोठा आनंदी प्राणी. टाईम्स ऑफ इंडियात पॉपची जी कार्टून्स येतात त्या पॉपशी प्रेमचा चेहरा, मोहरा आणि आकार जुळतो. फक्त फरक इतकाच की, पॉपपेक्षा प्रेमच्या डोक्यावर थोडे जादा केस आहेत. प्रेमचं एक वैशिष्ट्य म्हणजे तो रागावला, की त्याला सपाटून भूक लागते व राग शमवण्यासाठी तो लंगरमधून पराठे, भजी, अंडी, सुकं मटन वगैरे पदार्थ मागवतो आणि त्यावर तुटून पडतो. तो नेहमी आमच्यावरच रागावत असल्यामुळे या खाद्यपदार्थांत आमची भागी असतेच.

मुताईकच्या कँपमध्ये असताना आमच्या बटालियनच्या जुन्या फिफ्टीन हंड्रेडवेट ट्रक्स आणि थ्री टन लॉऱ्यांच्या जागी संपूर्ण डॉज गाड्यांचे नवीन फ्लीट आले. यात फिफ्टीन हंड्रेडवेट व थ्री टन लॉऱ्या कमी प्रमाणात होत्या. जवानांची वाहतूक करण्यासाठी ट्वेंटी हंड्रेडवेट लॉऱ्यांचे प्रमाण जादा होते. स्काऊट प्लटूनची कॅरियर्स-ही बदलून नवीन मिळाली. नव्या गाड्यांची चाचणी करून त्यांचे स्पेअर पार्टस् व किटसह त्या घेण्यात आणि जुन्या गाड्या परत करण्यात हे दिवस गेले.

## २८ जानेवारी ते ४ फेब्रुवारी ४५

बटालियन हेडक्वार्टर्स, हेडक्वार्टर्स कंपनी आणि अॅडमिनिस्ट्रेटिव्ह कंपनी २८

जानेवारीला मुताईकडून श्वेबोला हलली. बटालियनच्या चारी रायफल कंपन्या (ए, बी, सी आणि डी) या पूर्वीच वेगवेगळ्या टँक स्क्वाड्रन्सबरोबर हलल्या होत्या. नवीन कँप लावण्यात आणि डिफेन्स ऑर्गनाईझ करण्यात हा आठवडा निघून गेला. ३ फेब्रुवारीला लेफ्टनंट डी सिल्व्हा परत आला. त्याला एम. टी. प्लटूनचा चार्ज हँड ओव्हर केला. नव्या गाड्या आणि कॅरियर्स पाहून तो खूष झाला.

# इरावतीचे काठावर

**५ फेब्रुवारी ४५**




'ए' कंपनी संग्रामात गेली होती. मेजर डनलॉपने बटालियन हेडक्वार्टर्सला वायरलेस मेसेज पाठवून माझी मागणी केली. काम करायला 'ए' कंपनीसारखी तगडी कंपनी, ज्युनियर डनलॉपसारखा झकास कंपनी कमांडर आणि बटालियन हेडक्वार्टर्सपासून दूर रहायला मिळणार म्हणून मी खूष आहे. आज सकाळीच मी कंपनीकडे जायला निघालो, नंबर १५० रॉयल आर्मर्ड कोअर टँक रेजिमेंटच्या 'सी' स्क्वाड्रनबरोबर आमची कंपनी काम करत आहे.

मेजर डनलॉप 'ए' कंपनीची दोन प्लटून्स घेऊन इरावती नदीच्या पूर्वेकडील किनाऱ्यावर टिट या गावाजवळ बनवलेल्या ब्रिज हेडवर गेला होता.

बराचसा दुष्मन इरावती नदीच्या पूर्वेला असल्यामुळे त्याच्याशी सामना करण्यासाठी नदी पार करून जाणे जरूर होते. नदीसारखं ऑबस्टिकल (अडथळा) पार करणाऱ्या सेनेचे पलीकडील किनाऱ्यावर दबा धरून बसलेला शत्रू मोठ्या प्रमाणावर नुकसान करू शकतो. यासाठी त्या किनाऱ्यावर प्रथम पाय रोवण्यासाठी थोडीशी जागा करून घ्यावी लागते. जसजशी सेना येईल तसतशी ती वाढवून शत्रूशी सामना करावा लागतो. या पाय रोवण्यासाठी केलेल्या जागेला 'ब्रिज हेड' म्हणतात.

एक प्लटून आणि कंपनीचं रीअर हेडक्वार्टर्स घेऊन मी टँक स्क्वाड्रनच्या रीअर हेडक्वार्टर्सला होतो.

मेजर डनलॉपबरोबरच्या प्लटूनमधले आठ जवान जखमी झाले होते आणि चार मारले गेले होते. कंपनीचे सेकंड-इन-कमांड सुभेदार पृथ्वीसिंग डाव्या पायाला


उत्तर
टीट ब्रिजहेड
ब्रिजहेड ते मंडाले
चाँग
कुले
वेटागॉन
ड्वाथेट
सिंगू
केजी
झेगॉन
श्वेले
मिनेवा
निनावी गाव
नियॉनगॉन
चाँग
चाँगीवा
सेथी
केजी
येदॉ
टाँजी
चाँग
येले
सिंथे
कानलेवाथीट
पिनया
मियांग
मंडाले
आराकान योमा पर्वतांची रांग
पेगू योमा पर्वतांची रांग

गोळी लागून जखमी झाले होते. म्हणून माझ्याजवळ असलेले प्लटून घेऊन मला पुढे जाणे क्रमप्राप्त होते.

इरावती नदीवरील ब्रिज हेड ६०० यार्ड लांब आणि ४०० यार्ड रुंद होते. ब्रिज हेडच्या पूर्व आणि दक्षिणेकडील पहाडावरून शत्रूच्या तोफा अविरत बबारी करत होत्या. गेले दहा-बारा दिवस पायदळ पथकांनी अहोरात्र प्रयत्न करूनही एक पाऊलही ते पुढे सरकू शकले नव्हते. त्यामुळे चार दिवसांपूर्वी रात्री तराफ्यावर घालून 'सी' स्क्वाड्रनची टँक्स् नदीपार करून ब्रिज हेडवर आणून लपवून ठेवली.

आज मी माझ्या प्लॅटूनसह इरावती पार करून समरांगणांत उतरलो. आमच्या स्वागतासाठीच की काय दुष्मनाच्या १०५ मिलिमिटर तोफा, ७५ मिलिमिटर तोफा आणि चार इंची उखळी तोफा नौबती झडवीत होत्या. त्यांच्या सवालाला आमच्या २५ पौंडर तोफा, मोठ्या पल्ल्याच्या मिडीयम तोफा आणि ३·७ हॉविट-झर तोफा तितक्याच ठसक्यात जबाब देत होत्या. आम्ही ब्रिजहेडमध्ये आल्यावर थोड्या वेळाने शेलिंग थांबले. मेजर डनलॉप बंकरच्या बाहेर येऊन मोकळ्या हवेत बसला. त्याने पुढ्यात नकाशा पसरून मला बॅटल सिच्युएशन (लढाईची परि-स्थिती) समजावून दिली.

मी बटालियन हेडक्वार्टर्सचे टपाल, बटालियन रूटीन ऑर्डर्स, वर्तमानपत्रे आणि समरांगणावरील जवानांना उत्सुकतेने वाट पाहायला लावणारी घरची पत्रेही बरोबर आणली होती ती वाटून दिली. डनलॉपला बरंच टपाल आलं होतं. त्यांत लॉरा कॉटमनची (मेजर कॉटमनची बहीण) चार पत्रे होती. पठ्ठ्याने ती सर्वांत आधी वाचली. लॉराची नी त्याची खूप गट्टी होती.

संध्याकाळचे पाच वाजले होते. आम्ही दोघांनी चहा घेतला. डनलॉप "नंबर टू"ला जायला उठला. आघाडीवरचे शौचकूप म्हणजे आठ-दहा फूट खोलीचा, दोन फूट रुंदीचा आणि जरूरीपुरता लांबीचा खणलेला एक चर. त्यावर लाकडी फळ्या टाकून बसायला सोय केलेली असते. कनात किंवा धान्य भरून आलेल्या रिकाम्या फाटक्या पोत्यांनी तात्पुरता आडोसा केलेला असतो. एवढ्या माल मसाल्यावर फौजी डीप ट्रेंच लॅट्रिन तयार होतो. एखाद्या ठिकाणी मुक्काम जर तीन, चार दिवसांपेक्षा कमी असेल तर छोटे छोटे "शॅलो ट्रेंच लॅट्रिन्स"चर खोदून त्यावर काम भागवतात.

डनलॉप दोन चार पावले चालून गेला नी थबकून म्हणाला "बच, चल माझ्या-बरोबर."

मी म्हटलं– "छट, मला नाही जायचं. मी येथेच बसतो वर्तमानपत्र वाचीत.'

–"चल रे. तुला गमती सांगतो अगदी खास." तो म्हणाला.

मीही पोक्त विचार केला की, रात्री अपरात्री पेरिमिटरच्या बाहेर जाण्यापेक्षा आपणही आत्ताच आटोपून घ्यावे. चहाचा शेवटचा घोट घेऊन मी मग (कान

असलेला पेला) खाली ठेवला आणि बंकरपासून फार तर दहा, बारा पावलेच चालून गेलो असेन नसेन, इतक्यांत आम्ही बसलो होतो त्या ठिकाणी शत्रूच्या तोफेचा एक गोळा दाणकन येऊन आदळला. आमचे रिकामे झालेले चहाचे मग उचलायला आलेला डनलॉपचा ऑर्डली रामधारी तुकडे तुकडे होऊन चौफेर फेकला गेला. माझं सामान, डनलॉपची पत्रं, मपकेस, दुर्बीण, कपास, वॉटर बॉटल, इक्विपमेंट वगैरे कोठे गडप झाले ते कळलेच नाही. त्या ठिकाणी एक मोठा खड्डा निर्माण झाला. ताबडतोब सर्वांनी मोर्चे, बंकर वगैरेचा आश्रय घेतला. शत्रूने पुन्हा आमच्या प्रदेशावर शेलिंग करायला सुरवात केली होती, आणि सलामीच्या गोळ्याने रामधारीचा बळी घेतला होता. शेलिंग जवळ जवळ अर्धा तास चालू होते. ते बंद झाल्यावर सर्व जवान बाहेर आले व रामधारीचे जे काय मिळतील ते अवयव त्यांनी एकत्र केले. फौजी इतमामाने त्याचा अंत्यसंस्कार केला.

गेली चार वर्षे रामधारी डनलॉप जवळ होता. अक्षरशः त्याची सावली बनून राहिला होता. डनलॉपची सेवा त्यानं निष्ठेने केली. रामधारी राजस्थानातील झुनझुनुचा. तीनच वर्षांपूर्वी त्याचं लग्न झालं होतं. मेजर डनलॉप नसीराबादहून झुनझुनुला मुद्दाम गेला होता. रामधारीच्या वरातीत जाट पद्धतीचा साफा आणि धोतर नेसून मिरवला होता. या नवदांपत्याबरोबर त्यानं फोटो काढून घेतला होता. डनलॉपची हुकुमत साऱ्या कंपनीवर चालायची पण त्याचं रामधारीपुढे


नाण्याला
तिन बाजू असतात...
दोन नेहमीच्याच आणि तिसरी बाजू परीघ (जाडी)
युनायटेड वेस्टर्न बँकेत रक्कम गुंतविल्याने नाण्याचा परीघ वाढतो म्हणजेच रकमेत वाढ होते. आकर्षक व्याज दराच्या गरजेनरूप विविध ठेव योजना.
दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.
मुख्य कचेरी: चिरमुले निकेतन, राजपथ, सातारा.
स्थापना: १९३६ महाराष्ट्रांत सर्वत्र शाखा शेड्युल्ड बँक
वेस्टर्न इंडिया ट्रस्टी अँड एक्झीक्युटर कंपनी लि.
बँकेच्या या सलग्न संस्थेमार्फत विश्वस्त निधी व व्यवस्थापनाची कामे केली जातात

काही चालायचं नाही. त्याचे पैसे, अडके, सिगारेटस, ड्रिंक्स वगैरे रामधारीच्या ताब्यात असायचे. तो डनलॉपला रोज ठराविक सिगारेटस द्यायचा. त्याचप्रमाणे ड्रिंक्सवरही त्याचे रॅशन असायचे. रामधारीवर डनलॉपचा फार जीव. रामधारी जेव्हा जेव्हा रजेवर जाई तेव्हा तेव्हा त्याच्या आई, वडील आणि बायकोला कपडे घ्यायला पैसे देई. तो रामधारीला म्हणायचा.

–" रामधारी, बुढ्ढेको धोती, बुढ्ढीको साडी और बहुको चुन्नी, हमारे तरफसे',

रामधारीच्या झाकलेल्या शवावर पडून डनलॉप ढसढसा रडला.

# समर प्रसंग

**८ फेब्रुवारी ४५** **झुंज : १**



कालच्या लढाईत सुभेदार कंवलसिंग दंडात गोळी लागून जखमी झाले. कंपनीत एकही व्ही. सी. ओ. राहिला नाही. मेजर डनलॉप आणि मी याना प्लॅटून्स कमांड करण्याची पाळी आली.

आज इरावती ब्रिज हेडच्या दक्षिणेला तीन मैलांवरील कूले या गावावर उत्तरेकडून व पश्चिमेकडून हल्ला चढवायचे ठरले. हल्ल्यात 'सी' स्क्वाड्रनची तीन टँक ट्रूप्स, आमची कंपनी आणि गुरखा रायफल्सची बटालियन भाग घेणार होती.

दोन टँक ट्रूप्स आणि आमची दोन प्लटून्स मेजर डनलॉपच्या नेतृत्वाखाली उत्तरेकडून जाणार होती. तिसरं टँक ट्रूप आणि माझं प्लटून पश्चिमेकडून जाणार होतं.

"झीरो अवर" ११ वाजून ५ मिनिटाने होता. कोणताही हल्ला चढवायचा झाला, की तो कुठून सुरू करावयाचा ही जागा ठरवतात. त्या पॉईटवर दुष्मनाच्या, पोझिशनला समांतर अशी एक इमॅजिनरी लाईन मारतात. ही लाईन सेना पार करण्याची जी ठरवलेली वेळ असते त्याला "झीरो अवर" म्हणतात.

"झीरो आवर" पूर्वी हरीकेन बाँबर्सनी वीस मिनिटे बाँबिंग केले. त्यानंतर दहा मिनिटे तोफखान्याने शत्रूच्या पोझिशनवर शेलिंग केले. ठीक अकरा वाजून पाच मिनिटाने गुरखा रायफल्सच्या थ्री इंच मॉर्टराच एक धूर टाकणारा गोळा

इशाऱ्यासाठी सोडल्याबरोबर टँक ट्रूपस व आमची कंपनी स्टार्ट लाईन क्रॉस करून गेली. स्टार्ट लाईन क्रॉस करून शक्य तेवढे शत्रूच्या पोझिशनजवळ जाऊन मोक्याची जागा पकडून टँकच्या फायरने त्याच्यावर सरबत्ती करायची व गुरखांच्या पायदळ कंपन्यांना ऑबजेक्टीव्हवर हल्ला करायला वाट करून द्यायची असा प्लॅन होता.

जवळ जवळ १५ मिनिटे झाली. शत्रूची काहीच हालचाल दिसेना. त्याने एकही गोळी फायर केली नाही. टँक्स मागून येत होती. आम्हाला वाटलं की शत्रू बहुतेक या भागातून निघून गेला असावा. या विचारानं खुषोत येऊन आपली जागा सोडून सोडून मी प्लटूनच्या आघाडीवरली सेक्शन कमांडर नाईक मथुरारामबरोबर चालू लागलो. रणजीत माझ्याच मागे चार सहा पावलांचे अंतर ठेवून चालू लागला.

थोडे अंतर चालल्यावर पूर्वेकडे असलेल्या एका झुडुपाआडून आमच्या रोखानें तीन चार गोळ्या आल्या. मथुरारामला झुडुपामागे काही हालचाल दिसली. त्याने डाव्या दंडाने मला एका झटक्यांत दूर लोटून दिलं आणि स्टेन गनच्या तीन चार बर्स्टस फायर करून ताबडतोब एका बांधाच्या बाजूला बसला व झुडुपाच्या दिशेने एका पाठोपाठ एक अशी दोन हँड ग्रिनेडस फेकली. मी व रणजीतने तात्काळ जमीनी-सरशी सरपटत जाऊन आडोसा पकडला. व्यवस्थित पोझिशन घेऊन मी स्टेनगनचा फायर सुरू केला. रणजीतनेही आपली रायफल चालवायला सुरूवात केली. टँक नजरेच्या टप्प्यांत आल्यावर मी टँक कमांडरला, स्टेन गनचा एक लांब बर्स्ट फायर करून शत्रूची दिशा दाखविली. टँकने त्याच्या ७५ मिलिमिटर गन, ३७ मिलिमिटर गन व ब्राउनिंग गनच्या फायरने लगादार मारा करून ते झुडूप, त्याच्या मागे लप-लेला भला दांडगा बंकर व त्या मागच्या झोपड्या उध्वस्त करून टाकल्या झोप-ड्यांना आगी लागल्या. मथुराने प्रसंगावधान राखून मला पाडले म्हणून मी वाचला. टँकस फायर करत असताना मथुरा स्वत: ब्रेनगनर आणि एका जवानासह दूरचा वळसा घेऊन शत्रूच्या पिछाडीला गेला. टँकच्या फायरची बिलकूल तमा न बाळगता पांच जपानी मारून त्यांची स्वयचलित हत्यारे व बराच दारूगोळा त्याने हस्तगत केला. झाडा, झाडावर व मोक्याच्या ठिकाणी दबा धरून बसलेले शत्रूचे स्नायपर्स आमचे जवान टिपून त्यांना गारद करत होते. जिकडे तिकडे टँकच्या गोळ्यांचा, जवानांच्या वेगवेगळ्या प्रकारच्या हत्यारांतून सुटणाऱ्या गोळ्यांचा, हँडग्रिनेडांचा, असे असंख्य आवाज तमाम इलाखा दणाणून सोडत होते. गावातल्या झोपड्यांना, पेट्रोल आणि अॅम्युनिशन साठ्याला आगी लागल्या. आगीत होरपळलेली झाडे कडाडून मोडून पडत होते. टँक्सनी व आमच्या प्लटूनसनी मोक्याच्या जागा पकडल्या. गुरख्यांच्या दोन रायफल कंपन्यांच्या जवानांनी बंदुकीवर संगीनी चढवून बेदरकारपणे आंत घुसून शत्रूचा समाचार घ्यायला सुरूवात केली. त्यांनी पळणाऱ्या

शत्रूचाही समाचार घेतला व कुलेच्या पूर्वेला आणि दक्षिणेला .डिफेंस घेऊन मोर्चे खोदायला सुरूवात केली.

माझे प्लटूनही मी री–ऑर्गनाईझ करून टँक हंटिंग पार्टयांनी टँकवर हल्लाकरून ती बरबाद करूं नयेत म्हणून त्यांच्या भोवती कडे करून मोर्चे खोदले. मी हा बंदोबस्त करून बाहेर आलो. समोरच एक पेरूचे झाड दिसले. त्याला बरेच पेरू लागले होते. त्यांतील तीनचार मी तोडले. टँक ट्रुप कमांडर पॅडी ओकॉनर टँकच्या कॉप्युलातून माझ्याकडे मिष्किलपणे हसत पाहात होता. त्याच्या दिशेने मी दोन पेरू फेकले ते त्याने अलगद झेलले.

या झटापटीत दुष्मनचे ५१ जवान मारले गेले. गुरख्यांचे १४ मारले गेले व २२ जखमी झाले. आमचे दोन मारले गेले व ५ जखमी झाले. मथुराने स्वतःच्या प्राणांची पर्वा न करता धैर्य, शौर्य आणि प्रसंगावधान दाखवून उत्कृष्ट कामगिरी बजावली म्हणून मी त्याची आय. डी. एस. एम. (इंडियन डिस्टिंगविश सर्व्हिस मेडल) या पदकासाठी शिफारस केली.

संध्याकाळी हारबरला परत आल्यावर आपल्या झुंजीला सुरूवात तर मोठी छान झाली, म्हणून मी खुषीत होतो.

## ९ फेब्रुवारी ४५

कुलेची चढाई यशस्वी झाल्यावर टँक स्क्वाड्रन कमांडर मेजर न्यूमनने आज टिटहून कूलेला हारबर हलवण्याचे ठरवले. आमची कंपनी अर्थातच त्यांच्याबरोबर हलली.

टँकस जेंव्हा एखाद्या जागी हारबर करतात त्यावेळेस हारबरची रचना एका विशिष्ट पद्धतीने करावी लागते. चारी दिशांना तोफा डागून झाडाझुडुपांच्या आसऱ्याने (जेथे शक्य असेल तेथे) टँक्स उभी करतात. एका मीडियम टँक रेजिमेंटमध्ये तीन फायरिंग स्कवाड्रन्स, एक हेडक्वार्टर्स स्कवाड्रन आणि इतर ॲडमिनिस्ट्रेटिव्ह डिटॅचमेंटस् असतात. एका फायरिंग स्क्वाड्रनमध्ये चार टँक ट्रुप्स असतात, आणि एक हेडक्वार्टर्स ट्रुप असते. ट्रुपमध्ये तीन टँक्स असतात. ट्रुप कमांडरचा हुद्दा ब्रीटिश टँक रेजिमेंटमध्ये लेफ्टनंटचा असतो.

टँकची तोंडं ज्या दिशेला असतील त्या दिशेच्या आघाडीचे रक्षण करण्याची जबाबदारी त्या, त्या टँकची असते. स्क्वाड्रन हेडक्वार्टर्समध्ये कमांडर मेजर व त्याचे हस्तक दोन कॅप्टन्स यांची टँक्स चारी ट्रुप्समध्ये असतात अशा पद्धतीने टँक हारबर केल्यानंतर इन्फंट्री रायफल कंपनी (पायदळ पथक) त्यांच्याभोवती चारी बाजूने एक कडे बनवते. शत्रूच्या लहान लहान टोळ्यांचा वा इन्फंट्रीचा हल्ला परतवून लावण्याचं काम या कंपनीचं असतं. ही कंपनी आपल्याभोवती काटेरी तारेचं

कुपण घालते. (कॉसर्टिना वायर) कंपनीत तीन प्लटून्स असतात. प्लटूनमध्ये तीन सेक्शन्स असतात. सेक्शनमध्ये दहा जवान असतात. त्यांत एक ब्रेन गन दोन स्टेनगन्स व उरलेल्या जवानांजवळ रायफल्स असतात. प्रत्येक जवानांजवळ दोन हँडग्रिनेडस सतत असतात. प्लटूनमध्ये एक टू इंच मॉर्टर (छोटी उखळी तोफ) असते. या इतरांच्या साहाय्याने हारबरभोवतीची जमीन काबूत ठेवण्याचं काम ही कंपनी करत असते. कंपनी हेडक्वार्टर्स स्क्वाड्रन हेडक्वार्टर्सच्याजवळ असते. शत्रूच्या विमाने, तोफा, मॉर्टर्स, डिसचार्जर कप्स वगैरेमधून फायर होणाऱ्या बाँबपासून रक्षण करण्यासाठी हारबरमध्ये गेल्याबरोबर प्रथम मोर्चे, खंदक वगैरे खोदून बंकर बांधावे लागतात. विषेशत: टँक हारबर हे एकदम उठून दिसणारे बडे सावज असल्यामुळे शत्रूच्या पाहाण्यात बहुधा हे सतत असते. यामुळे जागरूकतेने डिफेंस ठेवावा लागतो. सर्वसाधारणपणे आघाडीवर पन्नासटक्के जवान आणि टँकचे सवार यांना सतत पहाऱ्यावर ठेवावे लागते. अशा तऱ्हेने कडेकोट बदोबस्तात ठेवलेल्या हारबरला 'बॉक्स' म्हणतात. (क्रमश:)

---

## अय्यय्यो मदरास्स....

पृष्ठ १५ वरून

कपडे काढून नागडे झाले म्हणं. हे मी कसं सांगणार? तोपर्यंत ते स्नेहीच विचारते झाले—

'पण स्टडंटस् चिडले का? त्याचा कुणी विचार केला? का सत्ता हातात आहे. पोलीस आहेत म्हणून दडपादडपीच करायची? आज विद्यापीठाने मुख्यमंत्र्यांना 'डॉक्टरेट' पदवी अर्पण केली, उद्या मिनिस्टरच्या पोराला डीग्री का नको? पेपर्स देण्याचं नाटक केलं की पुरे! तिकडे कुठेतरी अपॉइंटमेंट ऑर्डर तयारच असेल त्याच्यासाठी!'

'मग काय करायचं होते युनिव्हर्सिटीने?'—मी विचारले.

'सत्तारूढ पक्षाकडून जे दडपण आलं असेल त्याला, नम्रपणे नकार द्यावा. सांगावं बाबारे, तुमच्या त्या एन. एस. फडक्याइतकी पुस्तके लिही...चार दोन पुस्तकं न् लोकगीते लिहून डॉक्टरेट...'

'अन् समजा, विद्यापीठानेच उस्फूर्तपणे ठरविले असेल तर?'

'तर घेणाऱ्या व्यक्तीने नाकारावी. त्यामध्ये त्याचा मोठेपणा वाढणारच होता. पोलीसबंदोबस्तात, अन् किरकोळ उपस्थितीत पदवी घेण्यापेक्षा ती साभार परत करणे बरं नव्हे का?'—त्याचा सवाल बिनतोड होता. आम्ही गप्प झालो.

शांतपणे मी कपबशा गोळा केल्या अन् आत आले. त्या दोघांनी मग विषय बदलला गप्पांचा. कपबशा विसळताना मी विचार करीत होते. पुण्याला नुकतीच शेतकी विद्यापीठात गडबड झालेलीच आहे. मग पुण्याच्या वाचकांना हा सर्व संवादच लिहून कळवला तर? ◻ ◻ ◻

ते २ ऑक्टोबर १९६९ या काळातील अंकविक्रीतून एकेक पैसा बाजूस काढून 'साप्ताहिक माणूसने' हा निधी दुष्काळनिवारण व अन्नधान्योत्पादन या कार्यांसाठी जमवला होता. दुष्काळात त्यावेळी हाती घेतलेल्या सुपे येथील एका विहीरीचे काम या निधीतून पार पाडण्यात आले. ग्रामीण क्षेत्रातील एका कार्यकर्त्याच्या आर्थिक अडचणीच्या वेळीही या निधीचा थोडा उपयोग झाला. अन्नस्वतंत्रता आंदोलनातील वरकड खर्च जवळजवळ या निधीतून भागविला गेला. बहुतांश निधी माणूस साप्ताहिकाने स्वयंप्रेरणेने जमविलेला असल्याने तसे इतरांचे कसलेही, कोणतेही बंधन या निधीवापराबाबत 'माणूस'वर नाही. तरी पण सूचना येत राहातात, त्यावर विचारविनिमय चालू असतो. 'ग्रामायन'ने योजलेल्या सुरुवातीच्या उपक्रमांसाठी या निधीतून प्रतीकात्मक काही रक्कम दिली जावी अशी एक सूचना पुढे आली व साप्ताहिक माणूसच्या संपादकमंडळालाही ही सूचना मान्य झाली. त्याप्रमाणे — पाटीलवाडी-म्हसावद प्रकरणी उद्‌भवलेल्या कोर्टकामकाजखर्चाप्रीत्यर्थ सातपुडा सर्वोदय मंडळाला (मु. पो. ता. धडगाव, जि. धुळे) रुपये तीनशे व 'अनिल बर्वे-पायगुडे न्याय संपादन सहाय्यता समिती'ला रुपये दोनशे असे एकूण रुपये पाचशे माणूस प्रतिष्ठानतर्फे दिले जात आहेत.

इत्यलम्.

ग्रामीण व नागरिक भागातील थकबाकीप्रकरणे व करचुकवेगिरी हेही आघाताचे एक नवे क्षेत्र ठरू शकते. शासनच आता याबाबत हालचाल करू लागले आहे हे एक जागृतीचे लक्षण समजायला हवे. पण अखेरीस ही शासनाची जागृती आहे. अनेक त्रुटी, अनेक पळवाटा, दाबादाबी आणि भ्रष्टाचार यातून शेवटी शासनाच्या पदरात प्रत्यक्ष काय उरते हे अनिश्चितच आहे. एवढी सत्ता हाती असताना भारताच्या अर्थमंत्र्यांनी करबुडवेगिरी चालू द्यावी, थकबाकीदारीबद्दल फक्त हळहळ व्यक्त करून सभा जिंकाव्यात, हे दृश्य फार केविलवाणे आहे. ग्रामीण भागात जेथे शक्य आहे तेथे थकबाकीदारांच्या घरांवर यासाठी मोर्चे निघाले पाहिजेत. नागरी भागातही प्राप्तीकर व इतर कर चुकविणाऱ्या, बुडविणाऱ्या व्यक्ती व संस्था यांना लोकांनी धारेवर धरले पाहिजे. शासनाला हा जनतेचा उपक्रम पूरक ठरतो, संघर्षाची धार बोथट होते असा आक्षेप याबाबत काही जहाल मंडळीकडून घेतला जाईल. पण शासनपक्ष व लोकपक्ष यांचे नाते नेहमी प्रतियोगी सहकारिता या तत्वावर अवलंबून ठेवायला हवे, हे येथे ध्यानात घेतले जावे. बिनशर्त सहकार किंवा

शंभर टक्के असहकार ही दोन टोके आहेत व ती प्रसंगविशेषी हाती घेणेच इष्ट व शक्य असते. नित्याचे धोरण म्हणून जेवढ्यास तेवढे, जितक्यास तितके, चांगल्याशी चांगले, वाईटाशी वाईट ही प्रतियोगी सहकारिता अधिक श्रेयस्कर व व्यवहार्य आहे. शासनाने हाती घेतलेल्या एखाद्या चांगल्या उपक्रमाचे लोकपक्षाकडून स्वागत झाले पाहिजे, शक्य व अवश्य तेथे या उपक्रमाला लोकपक्षाकडून साथही मिळाली पाहिजे. अनिष्टला अनिष्ट म्हणणे, त्याविरुद्ध आवाज उठविणे हे तर लोकपक्षाचे जन्मसिद्ध कर्तव्यच आहे. या कर्तव्याचरणाशी प्रतारणा न करता, मूलभूत स्वातंत्र्याचा संकोच व गळचेपी होऊ न देता जेवढे व जिथे शासनाशी सहकार्य करणे शक्य व अवश्य आहे तेवढे व तिथे ते चालू ठेवण्यात हानी अशी काहीच नाही. प्रतियोगी सहकारितेने लोकपक्ष व शासनपक्ष हे दोन्ही स्वतंत्र व स्वयंप्रतिष्ठ मानलेले आहेत. सहकार्य किंवा विरोध हे परिस्थितीवर व प्रसंगावर अवलंबून ठेवलेले आहेत. लोकशाही समाजवादाच्या सद्य:स्थित चौकटीला गांधींच्या असहकारितेपेक्षा टिळकांची प्रतियोगी सहकारिता म्हणूनच अधिक मानवण्यासारखी आहे. चांगल्या कामापुरती एकी, अन्यायापुरता संघर्ष, बाकी तुम्ही स्वतंत्र, आम्ही स्वतंत्र, हे नाते दीर्घकाल टिकू शकणारे आहे. यात लोकांची शान आहे, शासनसत्तेचा मान आहे. यापेक्षा अधिक जवळ येणे किंवा दूर जाणे यात लोकशाहीचे मरण आहे. शासनसत्तेचाही गैरवापर आणि अध:पात आहे.

लहान जमीन धारकांना, लघुउद्योगवाल्यांना दीर्घमुदतीची विकासकर्जे मिळावीत यासाठी पतपुरवठासंस्थांवर मोर्चे वगैरे नेणे ठीकच आहे. पण प्रश्न असा आहे, की बँका सरकारी असल्या तरी पैसे आणणार कुठून ? बँकांनी, सरकारी व सहकारी संस्थांनी एकदा दिलेली मोठी मोठी कर्जे परत फिरत नसतील, सरकारी करवसुली यंत्रणेत अनंत दोष व शेकडो ठिकाणी गळती असेल तर सरकारचेसुद्धा दिवाळे वाजायला उशीर लागणार नाही. एतद्देशीय राज्ये कर्जात बुडालेली होती म्हणून ती शेवटी इंग्रजांना सहजगत्या गिळंकृत करता आली, हा इतिहास इतक्यातच विसरला जाऊ नये. दिल्लीच्या मोगल बादशहाला तर शेवटी एकदा आपला जनानखाना गहाण ठेवून आपली पैशांची चणचण भागवावी लागली होती. आज असे जनानखानेही नाहीत, म्हणून इतिहासाची जशीच्या तशी पुनरावृत्ती होण्याचा धोकाही नाही हे वेगळे. पण मुंबई येथे, मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानासमोरच, आजवरचे सर्व राजनैतिक प्रघात मोडून, रशियन दूतावासाची कचेरी बांधण्याची परवानगी महाराष्ट्र राज्यासारख्या एका मिजासखोर राज्याला मुकाटपणे द्यावी लागते, हाही इतिहासाच्या पुनरावृत्तीचा नव्या काळातील एक नवा आविष्कार ठरणार नाही, असे कुणी सांगावे ?

ऋणमुक्त भारत हे ' ग्रामायन 'चें अंतिम उद्दिष्ट आहे. यासाठी अंतर्गत ऋणमुक्ती हाही एक अनिवार्य असा कार्यक्रम आहे. ग्रामायन कार्यकर्त्यांनी या कार्य-

क्रमाचाही जारीने विचार करावा असे म्हणून आग्रहाने सुचवावेसे वाटते. कार्यकर्त्यांच्या आगामी मुंबई बैठकीने याबाबत काही भरीव निर्णय घेतला तर ते अधिकच कालोचित ठरण्याची खूप शक्यता आहे.

शेवटी मुक्तिसंग्राम म्हणजे तरी काय ?

' तुझे आहे तुझपाशी ' हे ओळखणे. मागासलेला म्हणून जरी सर्वत्र गाजावाजा झालेला हा देश असला तरी नैसर्गिक व मानवनिर्मित साधनसंपत्तीत तसा हा काही कमी नाही. याने हीनदीन व लाचार बनावे अशी तर मुळीच परिस्थिती नाही. ' योजकस्तत्र दुर्लभ: ' अशी खरी अडचण आहे. योजना चांगल्या असल्या तरी त्या राबवणाऱ्या, संघटित करणाऱ्या कार्यकर्त्यांची मुख्य अडचण आहे. दोनाचार बसगाड्या जाळल्या, एखाद्या इमारतीची तावदाने फोडली की आम्ही आमच्या तरुणपिढीवर ताबडतोब आगपाखड करतो. पण यापेक्षा कोटीपटींनी जे राष्ट्रीय संपत्तीची लूट करीत आहेत, चैनबाजीत आणि उधळपट्टीत तिची धूळदाण उडवीत आहेत, त्यांच्याविरुद्ध मात्र ब्र उच्चारण्यापलीकडे आपण काही करीत नाही. श्रीकैलास ते सिंधुसागर हा अन्नस्वतंत्रतेचा मोर्चा निघाला त्याच सुमारास मुंबईलाही राष्ट्रीय संपत्तीचा नाश होऊ नये यासाठी काही थोर थोर मंडळींनी एक मोर्चा आयोजित केलेला होता. या मोर्चात काही साहित्यिक होते, विद्यापीठाचे उपकुलगुरू होते, बडे बडे समाजवादी नेतेही होते. मग एखादा मोर्चा त्या सटोडियांच्या, काळाबाजारवाल्यांच्या, राष्ट्रीय संपत्ती हडपगडप करणाऱ्या 'देशशत्रूंच्या फोर्टातल्या उंचउंच वातानुकुलित इमारतींवर का नेला जाऊ नये ? तळाशी गाडल्या गेलेल्या त्या भूमिहीन आदिवासींचे, गरीब शेतमजुरांचे, छोट्या किसानांचे रक्त शेवटी या इमारतीत गोठवले गेलेले आहे. इथून ते अशाच परदेशांतल्या उंचउंच इमारतींकडे पाठविले जात असते. तिथून ते पुढे चंद्रावर पोचते. गरीब व अप्रगत देशातील तो तळचा श्रमिक मात्र अधिकाधिक खोल खोल रुतत जातो. तो वर यायला हवा असेल तर या गगनचुंबित इमारतींमध्ये दडलेला काळा पैसा बाहेर खेचला गेला पाहिजे, मोकळा करून त्याचे पाट दशदिशांना खेडोपाडी वाहवले पाहिजेत. पस्तीस वर्षांपूर्वी, १९३६ च्या फैजपूर कॉंग्रेस अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून पंडित नेहरूंनी हे स्वप्न पाहिलेले होते. त्यावेळी ते म्हणाले होते : ' ही ध्येये आमच्यासमोर असली तरी डोळ्यांसमोर दिसणारी परिस्थिती आणि हरघडी आमच्यापुढे येणाऱ्या अडचणी ह्यांना डावलून चालावयाचे नाही. लक्षावधी लोकांची उपासमार आणि बेकारी असे या परिस्थितीचे वर्णन करता येईल. तिच्या तावडीत मध्यमवर्गसुद्धा सापडलेला आहे. ही भीषण परिस्थिती वणव्यासारखी फैलावत चाललेली दिसते. अनेक दुःखदायक विरोधांनी हे जग भरलेले आहे. पण हिंदुस्थानात आश्चर्यमूढ करून सोडणारे जे विरोध आढळतात तसे इतरत्र सापडणार नाहीत. साम्राज्यशाही सत्तेच्या व्यक्त चिन्हांप्रमाणे हीन प्रवृत्तीच्या द्योतक अशा कलेने नटलेली नवी

दिल्ली पाहा ! तिच्यासाठी पाण्यासारखा पैसा खर्च झाला आहे. पण तेथून चार-दोन मैलांच्या आत हिंदुस्थानातील उपाशी शेतकऱ्यांच्या चंद्रमोळी झोपड्या उभ्या असलेल्या दिसतील. त्यांच्याच चार-सहा आण्यांच्या मिळकतीतून हे महाल उभारले जातात आणि गलेलठ्ठ पगार दिले जातात...'

पंडितजी ! आपण स्वप्न तर फार मोठे पाहिले. पण प्रत्यक्ष दिल्ली जेव्हा आपल्या ताब्यात आली तेव्हा महाल अधिकच उचउच होत गेले. त्या चंद्रमोळी झोपड्यांची संख्याही अफाट वाढली. ब्रिटिश शोषक गेले. पण त्यांची जागा नव्या शोषकांनी घेतली. आपल्याला प्रिय असणारी ध्येये हे नवे शोषक कधीच वास्तवात आणू देणार नाहीत. आपण ज्या स्वातंत्र्यसंग्रामात लढलात आणि अखेरीस विजयी झालात तो स्वातंत्र्यसंग्राम म्हणूनच अपूर्ण राहिलेला आहे. सत्तांतर झाले, पण स्वातंत्र्याचा प्रकाश त्या चंद्रमोळी झोपडीपर्यंत अद्यापही पोचलेला नाही. आपल्याला आणि आपल्यासारख्या अनेक स्वातंत्र्यवीरांना, पूर्वसूरींना स्मरून म्हणूनच पुन्हा नव्या स्वातंत्र्यसंग्रामाची तयारी भारतीय जनतेला केली पाहिजे, नवा व्यूह रचला पाहिजे. पहिले स्वातंत्र्ययुद्ध विदेशी शोषकांविरुद्ध होते. आता शोषक स्वदेशी आहेत. म्हणूनच ही लढाई जास्त अवघड आहे. रामरावण युद्धापेक्षा कौरवपांडवांचे भ्रातृयुद्ध अधिक क्लेशदायक व धर्मसंकटात टाकणारे होते. कोण श्रीकृष्ण आता गीता सांगण्यासाठी उभा राहातो ते पाहायचे. युद्ध तर अटळच आहे आणि चिखलामातीत बुडालेल्या खोपटातील करोडो भूमिपुत्रांनी आपल्या लंगोट्यांचे ध्वज त्या अस्मानभेदी महालांच्या शिखरांवर फडकविल्याशिवाय या युद्धाचा शेवटही होणार नाही. भारत तोवर ऋणमुक्तही होणार नाही. समोर फेसाळणारा अथांग सिंधुसागर तोवर भारतविजयाची स्तोत्रे मुक्त स्वरात गाऊ शकणार नाही. ती हिमालयाची शुभ्र शिखरे बर्फाचे तट म्हणून तोवर अभेद्य राहाणार नाहीत. तो हिंदुकूश पर्वत भारताचे निशाण डौलाने फडकविण्याचे तोवर नाकारीतच राहील. हिंदुस्थानच्या या विजयोत्सवासाठी, भूमिपुत्रांनो आणि सिंधुपुत्रांनोहो ! सर्वांनाच आता एक झाले पाहिजे. कारण विजय अखेर याच शक्तींचा व्हायला हवा, लक्ष्मीपुत्रांच्या शक्तीचा नाही. या श्रमशक्ती विजयी झाल्या तरच लक्ष्मी लक्ष्मीच्या ठिकाणी नांदेल, भारत भारत ठरेल. जागतिक संस्कृतींच्या सरित्संगमावर आपलाही एक सुंदरसा, भव्य घाट बांधू शकेल. केवळ प्रगत भारत नको. व्यक्तित्वसंपन्न भारत हवा. आणि यासाठी एका नव्या मुक्तिसंग्रामाची उभारणीही हवी.

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Weekly ) : 50 Paise : Regd. No. M–H 649

घरात पुन्हा पाळणा हलण्यापूर्वी

# विचार करा

प्रथम पहिल्या मुलीची
सर्व तरतूद
नीट करायला
नको का ?



[illegible]चे दूध, सकस अन्न, कपडे, खेळणी पुस्तके व इतर अनेक लहानसान गोष्टी या सर्वांची निश्चित [illegible] [illegible]साठी करणारच. आणि हे सर्व सोपे नसले तरी कसेही करून तुम्ही ते पुरवाल. पण इतक्यातच [illegible] [illegible]ची जबाबदारी वाढली म्हणजे ! अशी वेळ येऊ न देणे हेच योग्य नाही काय !

[illegible] [illegible]आवधि थोडपी हेच करीत आहेत. ती परिस्थिति अनुकूल होईपर्यंत दुसरे मूल होणे पुढे [illegible]. [illegible] [illegible] तुम्हालाहि हे सहज करता येईल. निरोध हे जगातील फार लोकप्रिय असे, पुरुषांनी वापरायचे [illegible] [illegible] [illegible]क साधन आहे. लक्षात ठेवा पाळणा लांबविण्याचा सर्वात सोपा व बिनधोक मार्ग म्हणजे निरोध [illegible] [illegible] [illegible] [illegible]शी रीत्या अनुसरलेला आहे. मग तुम्हीहि निरोध का नाही वापरीत !

[illegible] मिळते. फक्त 15 पैशांला 3 (सरकारी मदतीने).




लांबविण्यास पाळणा, उपाय साधा, सोपा [illegible]

# निरोध ▼

लक्षावधींच्या पसंतीचे साधे, बिनधोक संतति-प्रतिबंधक!

केमिस्ट, वाणी, जनरल स्टोअर्स, पानाची [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible]

[illegible] 71/[illegible]